- *ब्रिटिश सत्तेचे एकत्रीकरण.*
- *दत्तक वारसा नामंजूर.*
- *सहाय्यक सैन्य पद्धती.*
- *अँग्लो-शीख युद्धे.*

कार्नाटिक युद्धाद्वारे इतर कोणत्याही युरोपियन राष्ट्रांनी भारतात इंग्रजांना आव्हान देवू नये याचा ब्रिटिशांनी पूर्ण बंदोबस्त केला. प्लासी व बक्सारच्या लढायांमुळे बंगाल हा प्रांत पूर्णपणे ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली आला. 1765 च्या दरम्यान पूर्व भारताचा बहुतांश भाग ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली आला परंतु पश्चिम भारतात मराठे व दक्षिणेकडे म्हैसूरमध्ये प्रबळ सत्ता असल्याकारणाने ब्रिटिशांचा अंमल फक्त बंगाल व मुंबई प्रांतापुरताच मर्यादित राहिला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ब्रिटिशांच्या या विस्तारीकरणाच्या मार्गात मराठ्यांच्या पेशव्यांसह, म्हैसूरचा हैदर अली व त्याचा मुलगा टिपू सुलतान हे महत्त्वाचे अडसर होते. या व्यतिरिक्त वायव्येकडील शीखसुद्धा प्रखर विरोधक होते. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी रणजितसिंगने ब्रिटिशांना प्रचंड विरोध केला. शिखांना संघटित करण्यात तो प्रचंड यशस्वी झाला.

ब्रिटिशांनी भारतात आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अठराव्या शतकाच्या मध्यापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत वारंवार अनेक युद्धे केली. या व्यतिरिक्त सहाय्यक सैन्य पद्धती, दत्तक वारसा नामंजूर यासारख्या कुटील नीतीचा वापर करून अनेक राज्ये बळकावली. या काळात ब्रिटिशांनी तीन अँग्लो - मराठा युद्धे, चार अँग्लो-म्हैसूर युद्धे आणि दोन अँग्लो-शीख युद्धे केली. अँग्लो (इंग्रज)-म्हैसूर युद्धाबद्दलची सविस्तर माहिती चौथ्या प्रकरणात असल्यामुळे येथे आपण मराठे आणि शीख यांच्या विरुद्ध इंग्रजांचे युद्ध समजून घेऊ.

**अँग्लो- मराठा युद्धे :**

**पहिले अँग्लो मराठा युद्ध (1775-1782):** बक्सारच्या लढाईत पराभूत होवून ब्रिटिशांच्या आश्रयाला आलेल्या दुसऱ्या शाह आलमने मराठ्यांशी हातमिळवणी केली आणि त्याला मुघलांच्या गादीवर म्हणजेच दिल्लीच्या तख्तावर बसविले. इंग्रजांच्या ताब्यात असलेले होरा आणि अलाहाबाद हे प्रांत शाह आलमने मराठ्यांना दिले यामुळे इंग्रज व मराठ्यांमध्ये वैर निर्माण झाले. याच दरम्यान माधवराव पेशवे या शूर व बलाढ्य योद्ध्याच्या मृत्यूने मराठ्यांना जबरदस्त फटका बसला. नंतर त्यांचे बंधू नारायणराव सत्तेवर आले. परंतु त्यांचे काका राघोबा (रघुनाथराव) यांनी त्यांची हत्या केली. यामुळे पेशवे पदासाठी त्यांच्यामध्ये अंतर्गत कलह सुरू झाले. मराठा सरदारांच्या गटाने राघोबादादांऐवजी नारायणरावांचा मुलगा दुसरा माधवराव याला पेशवेपद दिले. यामुळे निराश झालेला राघोबा ब्रिटिशांच्या आश्रयाला गेला. या संधीचा आपल्याला पुरेपूर फायदा घेता येईल असा ब्रिटिशांचा अंदाज होता. 1775 ते 1782 दरम्यान मराठे व ब्रिटिशांमध्ये प्रदीर्घ युद्ध झाले. सुरूवातीस मराठ्यांना यश आले. परंतु नंतर त्यांना अलाहाबाद ब्रिटिशांना देणे भाग पडले. ब्रिटिशांपुढे मराठ्यांचा टिकाव लागला नाही. त्यामुळे त्यांना 'सालबाईचा करार' करणे भाग पडले आणि हे युद्ध संपुष्टात आले. दुसऱ्या माधवरावाला पेशवा' म्हणून घोषित करण्यात आले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**लॉर्ड वेलस्ली (1798-1805) आणि सहाय्यक सैन्य पद्धती :** लॉर्ड वेलस्ली भारतात गव्हर्नर जनरल म्हणून आल्यानंतर ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार फार मोठ्या प्रमाणात झाला. या दरम्यान मराठा व म्हैसूरची बलाढ्य राज्ये दुर्बल झाली होती. त्यामुळे आपल्या साम्राज्याचा विस्तार करणे ब्रिटिशांना सोपे झाले. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वेलस्लीने तीन धोरणांचा अवलंब केला. 1. सहाय्यक सैन्य पद्धती 2. नवीन राज्यांशी युद्ध पुकारणे. 3. ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली असणाऱ्या राज्यांचा राज्यकारभार थेट पाहणे.

**सहाय्यक सैन्य पद्धती :** भारतातील राज्यांना स्वतःच्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी 1798 मध्ये लॉर्ड वेलस्ली याने सहाय्यक सैन्य पद्धती अंमलात आणली. हा भारत व ईस्ट इंडिया कंपनी यामधील एक लष्करी करार होता.

**सहाय्यक सैन्य पद्धतीतील अटी :**

1. सहाय्यक सैन्य पद्धती स्विकारणाऱ्या भारतीय राजांना ब्रिटिश सैन्य त्यांच्या राज्यात ठेवावे लागले.

2. सैन्याची देखभाल आणि सैनिकांच्या वेतनाचा खर्च संबंधित राजाने करावा किंवा जमिनीवरील ठराविक महसूल द्यावा.
3. राजाला त्याच्या दरबारात ब्रिटिशांचा वकील ठेवणे आवश्यक होते.
4. ब्रिटिशांच्या परवानगीशिवाय राजाला इतर कोणत्याही युरोपियनांची नेमणूक करता येणार नाही.
5. राज्यकर्त्यांनी इतर राज्यांशी तसेच इतर संस्थानांशी स्वतंत्र करार करावयाचे नाहीत. त्यासाठी त्यांना गव्हर्नरची परवानगी घेणे बंधनकारक होते.
6. वरील सर्व सेवांच्या बदल्यात त्या राजाला ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी कडून अंतर्गत किंवा बाह्य आक्रमणापासून संपूर्ण संरक्षण मिळेल.

यामुळे इंग्रजांना स्थानिक राज्यकर्त्यांच्या अंतर्गत व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे सहज शक्य झाले. तसेच सैन्याची तैनात करणेही सुलभ झाले. यामुळे भारतीय राज्यकर्त्यांचे तीव्र आर्थिक शोषण होऊ लागले. ही पद्धती स्वीकारणारा पहिला राजा हैदराबादचा निजाम होय. यापाठोपाठ म्हैसूर, अवध, तंजावर, मराठे, बिरार, अर्काट, पुणे, ग्वालियर आणि इतर काही राज्यांनी या पद्धतीचा स्वीकार केला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**दुसरे अँग्लो - मराठा युद्ध (1803-1805) :** मराठा सरदारांमधील अंतर्गत संघर्ष हेच या युद्धाचे मूळ कारण होते. इंदूरचे यशवंतराव होळकर व ग्वाल्हेरचे दौलतराव शिंदे यांच्यात शत्रुत्व होते. दोघानांही दुसऱ्या बाजीराव पेशव्यांवर वर्चस्व ठेवायचे होते. 1802 मध्ये होळकरांनी शिंदे (सिंदिया) व पेशव्यांचा पराभव केला. अशा बिकट परिस्थितीत पेशव्यांनी ब्रिटिशांकडे मदत मागितली व बासेनच्या (वसई) तहाद्वारे सहाय्यक सैन्य पद्धती स्वीकारली. याबरोबरच लॉर्ड वेलस्लीला मराठा साम्राज्यामध्ये चंचूप्रवेश करण्याची संधी आपोआपच मिळाली. या कराराबरोबरच पेशव्यांना विरोध करण्यासाठी शिंदे, होळकर व भोसले ही मराठा घराणी एकत्र आली आणि त्यांनी इंग्रजांविरुद्ध युद्ध घोषित केले. 1803 ते 1805 दरम्यान लॉर्ड वेलस्लीने अनेक मराठा घराण्यांचा पराभव केला. परंतु त्यांच्या या युद्धपिपासू धोरणामुळे कंपनीवरील आर्थिक बोजा वाढला. यावरून त्याच्यावर कडक टीका झाली आणि आपल्या पदाचा राजीनामा देवून लॉर्ड वेलस्ली इंग्लंडला परत गेला. परिणामतः सर्व राज्यामध्ये तात्कालिक शांतता प्रस्थापित झाली.

**तिसरे अँग्लो-मराठा युद्ध (1817-1818) :** स्वतःची पत व स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी मराठा घराण्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. ईस्ट इंडिया कंपनीच्या कचाट्यातून

सुटका करून घेण्यासाठी पेशव्यांनीसुद्धा आटोकाट प्रयत्न केले. 1817 साली पेशव्यांनी पुण्यातील इंग्रजांच्या रेसिडेन्सीवर हल्ला चढवून तेथे जाळपोळ करण्याचा प्रयत्न केला. नागपूरच्या आप्पासाहेबांनी व मल्हारराव होळकरांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले व ते पराभूत झाले. शेवटी दुसऱ्या बाजीराव पेशव्यांने ब्रिटिशांविरुद्ध कोरेगांव व आष्टी येथे 1818 मध्ये युद्ध केले आणि तो ब्रिटिशांना शरण आला. ब्रिटिशांनी पेशवा हे पद रद्द करून बाजीरावला निवृत्तीवेतन दिले. छत्रपती शिवाजीचा वंशज प्रतापसिंह याला साताऱ्याच्या गादीवर बसविले आणि त्याला मराठ्यांचा वारसदार म्हणून घोषित केले अशा रीतीने त्यांनी मराठ्यांचा विरोध पूर्णपणे दडपून टाकला.

**ब्रिटिश सत्तेचे एकत्रीकरण (1818-1857) :** 1818 ते 1857 पर्यंत इंग्रजांनी संपूर्ण भारतावर अधिराज्य करण्याचा त्यांचा मानस पूर्ण केला. त्यांनी पंजाब, सिंध, अवध यासारख्या प्रमुख राज्यांबरोबरच आणखी काही लहान राज्येही काबीज केली.

**अँग्लो-शीख युद्धे :** 1839 मध्ये 'पंजाबचा सिंह' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रणजितसिंह या राजाच्या निधनामुळे तेथे राजकीय अराजकता माजली. 1809 च्या कायमस्वरूपी मैत्री कराराचे उल्लंघन करुन पंजाब प्रांत काबीज करण्यासाठी इंग्रजानी कट रचला. डिसेंबर 1845 मध्ये इंग्रज व पंजाबी सैन्यामध्ये लढाई सुरु झाली. परकीयांकडून होणारा धोका वेळीच ओळखून हिंदू, मुसलमान व शीख एकत्र आले. व इंग्रजांना पराभूत करण्यासाठी ते त्वेषाने लढले परंतु काही देशद्रोही फितुर नेत्यांमुळे त्यांना पराभव पत्करावा लागला आणि 1846 मध्ये त्यांना अपमानास्पदरित्या लाहोर करारावर स्वाक्षरी करावी लागली पंजाबवर ब्रिटिशांची सत्ता आली. अशा रीतीने पंजाब प्रांत संपूर्णपणे ईस्ट इंडिया कंपनीच्या आधिपत्याखाली आला.

पंजाबवर स्वतः थेट राज्य कारभार करण्यासाठी शिखांनी 1848 मध्ये ब्रिटिशांना कडाडून विरोध केला. या बंडाचे नेतृत्व लाहोरमध्ये चत्तार सिंग अट्टारिवाल याने तर मुलतानमध्ये मूलराजने केले होते. परंतु पुन्हा पंजाबचा पराभव झाला. शेवटी लॉर्ड डलहौसीने पंजाब प्रांत ब्रिटिश साम्राज्यात विलीन केला.

**लॉर्ड डलहौसी आणि खालसा धोरण (दत्तक वारसा नामंजूर) :** 1848 मध्ये लॉर्ड डलहौसी 'गव्हर्नर जनरल' बनून भारतात आला. त्यांने भारतातील सर्व संस्थाने ब्रिटिश साम्राज्यामध्ये विलीन करून घेण्यासाठी प्रयत्न चालू केले. त्यांनी खालसा धोरण म्हणजेच दत्तक वारसा नामंजूर हे धोरण अवलंबिले ज्याद्वारे दत्तक घेतलेल्या राजांच्या मुलांना वारसा हक्क नाकारण्यात आला. यानुसार जर एखाद्या निपुत्रिक राजाचा मृत्यू झाला तर त्याच्या दत्तक पुत्रांना गादीवर बसण्याचा कायदेशीर हक्क नव्हता आणि असे राज्य

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आपोआपच ब्रिटिश साम्राज्यामध्ये विलीन केले जात असे. या धोरणा अंतर्गत सातारा, नागपूर, संबळपूर, उदयपूर, झाशी, जैतपूर यासारखी अनेक संस्थाने खालसा करण्यात आली. गव्हर्नर जनरलचा या धोरणाबद्दल सखोल अभ्यास असल्याकारणाने याचा वापर त्यांने राजकीय अस्त्राप्रमाणे केला.

हे धोरण काटेकोरपणे तसेच अत्यंत कठोरपणे अवलंबल्यामुळे फक्त संस्थानेच नव्हे तर ब्रिटिशांबद्दल सहानुभूती असणारी छोटी-मोठी राजघराणी, आपापल्या राजाप्रती प्रेम असणारे सामान्य लोक सुद्धा ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध पेटून उठले. आपल्या राजाप्रती असलेल्या प्रेमाखातर आणि निष्ठेखातर या विरोधाने जोर धरला आणि 1857 च्या बंडाला सुरुवात झाली.

**तुम्हाला माहित आहे का?**

***रणजितसिंग :*** *रणजितसिंग यांचा जन्म 1780 मध्ये पंजाब प्रांतात झाला. सुखरचाकिया या मिस्लचा (तालुका) राजा असणाऱ्या महासिंगचा तो पुत्र होता. पंजाबमध्ये एकूण 12 मिस्ल होते. वयाच्या 10 व्या वर्षीच त्यांच्या पित्याचे निधन झाले. जेव्हा काबूलचा जमानशहा भारतात आला तेव्हा रणजितसिंगने त्याला मदतीचा हात दिला. जमानशहाने त्याला लाहोरचा गव्हर्नर बनविले व 'राजा' ही पदवीदेखील बहाल केली. यावेळी त्याचे वय अवघे 19 वर्षांचे होते. यानंतर त्याच्या जीवनाला आश्चर्यकारकरित्या कलाटणी मिळाली. सर्व शिखांवर अधिराज्य करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यांने पश्चिमेकडील सतलज प्रांतातील सर्व शिखांवर ताबा मिळवून स्वतःचे शीख साम्राज्य निर्माण केले. त्यांने 1809 मध्ये अमृतसर येथे ब्रिटिशांशी अमृतसर करार केला. त्यांने आपले सैन्य ब्रिटिशांच्या सैन्यात समाविष्ट केले. त्याच्या सैन्यात गुरखा, बिहारी, पठाण आणि काही मुस्लीमांचाही समावेश होता. त्यांने लाहोरमध्ये तोफ कारखाना सुरू केला. त्या काळातील एक 'सर्वश्रेष्ठ सैन्य' अशी रणजितसिंगच्या सैन्याची गणना केली जात असे. तो निधर्मी वृत्तीचा होता. हिंदू व मुस्लीम संतांना समान समजून त्यांचा आदर करत असे. त्याच्या कारकीर्दीत सर्व धर्माच्या लोकांनी आपापल्या धर्माची केंद्रे स्थापन केली होती. ब्रिटिशांशी त्याचे मैत्रीपूर्ण संबंध असल्याने आपले राज्य तो शाबूत राखू शकला. वायव्येकडील घुसखोरी रोखण्यासाठी इंग्रजांनाही अशा भक्कम आणि प्रतिबंधात्मक राज्याची गरज होतीच. थोडक्यात, सांगायचे म्हणजे रणजितसिंगने शिखांचे स्वतंत्र साम्राज्य स्थापन करून 1839 पर्यंत म्हणजेच त्याच्या मृत्यूपर्यंत स्वतंत्रपणे राज्य केले.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा :**

1. पहिल्या अँग्लो-मराठा युद्धाच्या शेवटी ब्रिटिश व मराठ्यांमध्ये __________ हा करार झाला.
2. 'सहाय्यक सैन्य पद्धती' __________ यांने अंमलात आणली.
3. पंजाब संस्थान ब्रिटिश साम्राज्यात विलीनीकरण करणारा ब्रिटिश जनरल __________
4. खालसा धोरण (दत्तक वारसा नामंजूर) __________ यांने अवलंबिले.

**II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

5. पहिल्या अँग्लो - मराठा युद्धाची कारणे द्या.
6. सहाय्यक सैन्य पद्धतीमधील अटी सविस्तरपणे लिहा.
7. तिसऱ्या अँग्लो - मराठा युद्धाचे वर्णन करा.
8. खालसा धोरण (दत्तक वारसा नामंजूर) भारतातील ब्रिटीश साम्राज्याच्या विस्ताराला कसे पूरक ठरले?
9. खालसा धोरणांतर्गत कोणकोणती संस्थाने विलीन झाली?

**III. उपक्रम :**

1. भारतामध्ये आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी ब्रिटिशांनी कोणकोणती धोरणे अवलंबिली याचे विश्लेषण करून थोडक्यात निबंध लिहा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण - 3

# भारतावरील ब्रिटिश सत्तेचे परिणाम

Y3J8D4

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *प्रशासकीय आणि न्यायालयीन पद्धत - नागरी सेवा, न्यायालयीन पद्धत, पोलीस खाते, लष्करी खाते.*
- *जमीन महसूल व्यवस्था - कायमधारा जमीनदारी पद्धत, महलवारी पद्धत, रयतवारी पद्धत.*
- *आधुनिक शिक्षणपद्धती - लॉर्ड मॅकॉले, वुडस कमिशन (1854)*
- *ब्रिटिशकालीन कायदे - रेग्युलेटिंग ॲक्ट, पिट्स इंडिया ॲक्ट, चार्टर ॲक्टस*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने सुरुवातीला एक सर्वसामान्य व्यापारी कंपनी म्हणून भारतात शिरकाव करून आपल्या व्यावसायिक गरजांची पूर्तता करून घेतली. भारतभर विखुरलेल्या राज्यव्यवस्थेचा त्यांनी अभ्यास केला आणि स्वतःचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू केले. भारतातील अनेक राज्यकर्ते एकमेकांशी स्पर्धा करुन आपापले साम्राज्य वाढविण्यासाठी भांडणतंटे करण्यात मग्न झाले होते. याच संधीचा फायदा घेवून ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब करून बऱ्याच राजांना वश करून घेतले. भारतावर संपूर्णपणे आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी युद्ध व वाटाघाटी या धोरणांचा शिताफीने वापर केला.

वेगवेगळ्या धूर्त व कावेबाज धोरणांद्वारे जवळजवळ संपूर्ण भारत इंग्रजांच्या आधिपत्याखाली आला. परंतु भारतावर कायमचे वर्चस्व गाजविण्यासाठी ब्रिटिशांचे प्रयत्न सुरू झाले. त्यावेळी भारतीयांच्या मनामध्ये 'एक संघराज्य' ही संकल्पना अजून निर्माण झाली नव्हती. भारतातील राज्ये छोट्या-मोठ्या संस्थानांमध्ये विखुरलेली होती. म्हणून भारतामध्ये एकसूत्री प्रशासन व राजकीय व्यवस्था निर्माण करीत. शिक्षण पद्धती, न्याय व्यवस्था, जमीन महसूल पद्धती, व्यापार आणि कृषी क्षेत्रात नवीन प्रशासकीय यंत्रणा राबवून त्यांनी उभारलेल्या राज्यव्यवस्थेला एकत्र आणण्यात ते यशस्वी ठरले. परिणामतः भारतात नवीन व्यवस्था दिसून आली. या सर्वांची अंमलबजावणी करीत असताना ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या आर्थिक नफ्याकडे त्यांनी कधीही दुर्लक्ष केले नाही. भारतामध्ये नवीन सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी कंपनीने विविध प्रशासकीय प्रयोग करून पाहिले.

## प्रशासकीय आणि न्याय व्यवस्था :

**नागरी सेवा:** लॉर्ड कॉर्नवॉलिसने भारतामध्ये नागरी सेवा सुरू केल्या. भारतामध्ये व्यवसाय करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनी अनेक लोकांची भाडेतत्त्वावर नेमणूक करत असे. परंतु त्या लोकांना अत्यंत कमी वेतन दिले जात असे पण त्यांना खासगी स्तरावर व्यावसायिक उलाढाली करण्याची परवानगी असे, या संधीचा फायदा घेवून अनेकांनी अनैतिक व्यवहारांद्वारे प्रचंड फायदा मिळविला व ते अतिशय भ्रष्टाचारी बनले. हा प्रश्न सोडविण्यासाठी कंपनीने 1773 मध्ये रेग्युलेटिंग ॲक्ट भारतामध्ये लागू केला. भ्रष्टाचारी नोकरवर्गाला रोखणे हेच या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होते.

1801 मध्ये लॉर्ड वेलस्लीने लोकांना नागरी सेवेत समाविष्ट होण्यासाठी; प्रोत्साहित करण्यासाठी कलकत्त्यामध्ये फोर्ट विल्यम कॉलेज सुरू केले परंतु ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांकडून याला फारसा पाठिंबा मिळाला नाही. परिणामत: 1853 पर्यंत सर्व नेमणुका कंपनीच्या संचालकांकडूनच होत असत. 1853 नंतर मात्र नागरी सेवांतर्गत नेमणुका करण्यासाठी स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात येऊ लागले. सुरुवातीला भारतीयांना याचा फारसा फायदा झाला नाही. ब्रिटिशांच्या मनात अद्याप भारतीयांच्या क्षमतेविषयी संशय होता. ''सर्व भारतीय लोक भ्रष्टाचारी आहेत'', असा आरोप लॉर्ड कॉर्नवॉलिसने केला. म्हणून भारतीयांना खालच्या दर्जाच्या नोकऱ्या दिल्या जावू लागल्या.

**न्यायव्यवस्था:** मोंगलांकडून ब्रिटिशांना टप्प्याटप्प्याने अधिकारांचे हस्तांतर करण्यात येऊ लागले. त्यावेळी भारतात न्याय व्यवस्थेची सुरुवात झाली होती. 1764 च्या बक्सारच्या लढाई नंतर मोंगल सम्राट दुसऱ्या शाह आलमने दिवाणी हक्क नावाचा महसूल वसुलीचा हक्क ब्रिटिशांना दिला. बंगालच्या प्रांतात दुहेरी राज्यव्यवस्था अंमलात आली. या व्यवस्थेमध्ये महसूल वसूल करणे, दिवाणी व फौजदारी न्याय व्यवस्थापनाचे अधिकार भारतीय अधिकाऱ्यांना दिले गेले. तर जमा झालेल्या महसुलाचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार ब्रिटिशांनी आपल्याकडे कायम ठेवले. पुढे ब्रिटिशांनी भारतात टप्प्याटप्प्याने केंद्रीकृत न्यायव्यवस्था अंमलात आणण्याचा निश्चय केला परिणामतः ब्रिटिशांनी ही व्यवस्था लागू करुन मोगलांची सत्ता सोडून काढली आणि भारतात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. भारतात नवीन न्यायव्यवस्था अंमलात आणल्यामुळेच त्यांना हे शक्य झाले.

1772 मध्ये गव्हर्नर पदावर आलेल्या वॉरन हेस्टींग्जने नवीन योजना अंमलात आणली. या योजनेनुसार प्रत्येक जिल्ह्यात दोन प्रकारची न्यायालये असणे सक्तीचे होते. ती

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

म्हणजे - 'दिवाणी अदालत' म्हणजेच नागरी न्यायालय व 'फौजदारी अदालत' म्हणजेच गुन्हेगारी न्यायालय. येथे हिंदूना हिंदू धर्मग्रंथानुसार व मुस्लीमांना शरीयतनुसार न्याय दिला जात असे. गुन्हेगारी प्रकरणात सर्वांची चौकशी, इस्लाम कायद्याप्रमाणे केली जात होती. हळूहळू फौजदारी न्यायालयांमध्ये ब्रिटिश कायदेशीर प्रक्रिया सुरू झाल्या. ब्रिटिश कायदे अंमलात आणून गुन्हेगारी कायद्यात आवश्यक ते बदल करण्यात आले. दिवाणी न्यायालये युरोपियन अधिकाऱ्यांच्या आधिपत्याखाली आली. फौजदारी न्यायालये काझींच्या नियंत्रणाखाली असली तरी ती युरोपियन अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कार्यरत होती.

**पोलीस व्यवस्था :** अंतर्गत कायदे व सुव्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे हे पोलिसांचे महत्त्वाचे काम होते. लॉर्ड कॉर्नवॉलिसने भारतात प्रथमच अत्यंत प्रभावी पोलीस यंत्रणा राबविली. त्यांनी पोलीस अधीक्षक (Superintendent of Police) हे नवीन पद निर्माण केले. त्यांने 1793 मध्ये प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस ठाणी निर्माण केली व प्रत्येक ठाण्यावर 'कोतवालाची' नेमणूक केली. त्याचप्रमाणे प्रत्येक खेड्यात एका चौकीदाराची नेमणूक केली. गावपातळीवरील चोरी, गुन्हे आणि इतर कायद्याच्या उल्लंघनासाठी कोतवालला जबाबदार ठरविण्यात आले.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

1770 च्या भीषण दुष्काळामुळे कायदा व सुव्यवस्था डळमळीत झाली. म्हणून संपूर्ण पोलीस खाते ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या अंमलाखाली आणण्यात आले. 1781 मध्ये ब्रिटिश दंडाधिकारी नेमण्याची पद्धत सुरू झाली. पोलीस अधिकारी या दंडाधिकाऱ्याच्या आधिपत्याखाली कार्यरत असत. अशा रीतीने पोलीस व्यवस्थेमध्ये सतत बदल घडत होते. 1861 मध्ये स्वतंत्र भारतीय पोलीस कायदा अंमलात आणला गेला. हा कायदा एक उत्तम प्रशासनाचा व कायद्याचा मूलभूत पाया होता. परंतु अजूनही भारतीयांची अधिकारीपदावर नेमणूक केली जात नसे. 1902 मध्ये पोलीस आयोगाने पोलीस अधिकाऱ्यांच्या पदासाठी योग्य भारतीयांची नियुक्ती करण्यास परवानगी दिली. या सर्व उपाययोजना करूनही ब्रिटिशांच्या मनातील भारतीयांबद्दल असणारा भेदभाव यत्किंचितही कमी झाला नाही.

**लष्करी व्यवस्था :** लष्कर हा ब्रिटिश सत्तेचा व प्रशासनाचा मूळ पाया होता. ब्रिटिशांनी बऱ्याच भारतीयांना लष्करी सेवेत सामावून घेतले आणि लष्कराच्या मदतीने संपूर्ण भारतावर स्वतःचा अंमल सुरू केला. लष्कराच्या सहाय्याने ते भारतातील तसेच

भारताबाहेरील शक्तींना आव्हान देवू लागले. पुन्हा येथेही अधिकारी पदावर ब्रिटिशांचीच नेमणूक केली गेली. भारतीय सैनिकांना सुभेदार पदापर्यंतच बढती मिळत असे. त्यांच्यासाठी उपलब्ध असलेला हा सर्वोच्च हुद्दा होता. बहुतेक भारतीय मजूर सैनिक होते. ब्रिटिश सरकारने 1857 मध्ये पील कमिशनच्या शिफारशी स्विकारल्या. या शिफारशींच्या आधारे लष्करी व्यवस्थेची पुनर्रचना करण्यात आली.

**जमीन महसूल व्यवस्था:**

बंगाल प्रांतावरील अंमलासाठी ईस्ट इंडिया कंपनीला ब्रिटिश सरकारला 4 लाख पौंड द्यावे लागत. याची पूर्तता करण्यासाठी कंपनीला आर्थिक नफ्याचे नियोजन अत्यंत सुव्यवस्थितपणे व सुरक्षितपणे करावे लागे. म्हणून कंपनीने जमिनीवर विविध प्रकारचे नवनवीन कर लादले.

**(कायमधारा) जमीनदारी पद्धती:** लॉर्ड कॉर्नवॉलिसने 1793 मध्ये बंगालमध्ये वार्षिक स्थिर महसूल निर्माण करण्यासाठी नवीन जमीन कर धोरण लागू केले. याला कायमधारा जमीनदारी पद्धत असे म्हणतात. या व्यवस्थेनुसार जमीनदार हा जमिनीचा मालक झाला. जमीनदार कराची रक्कम दरवर्षी ठराविक मुदतीत कंपनीकडे जमा करीत. या पद्धतीमध्ये करवसुली करणाऱ्यांना जमिनीचे मालकी हक्क देण्यात आले. व त्यांच्यामार्फत सरकारने निश्चित केलेली कराची रक्कम वसूल करण्याची व्यवस्था केली गेली. हे जमीनदार शेतकऱ्यांकडून निश्चित केलेल्या करांपेक्षा जादा रक्कम वसूल करीत आणि स्वतः ऐष आरामाचे, सुखाचे जीवन व्यतीत करीत. यामुळे जमीनदार गबर झाले. महापूर व दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे जर शेतकरी कर भरण्यास असमर्थ ठरले तर त्यांच्या जमिनीचा मालकी हक्क सरळ कंपनीकडे जात असे. कंपनी व जमीनदार दोघांचाही फायदा होत असे परंतु शेतकरी मात्र पूर्णपणे जमीनदोस्त होत असे. या प्रणालीने एक नवीन सामाजिक गट तयार केला ज्याने ब्रिटिशांना मदत केली. शेतजमिनींमध्ये कामाच्या अनियमित संधींमुळे शेतकरी, शेतमजुरांचे हाल झाले. त्यांचे शोषण झाले आणि त्यांना असुरक्षिततेचे जीवन जगावे लागले. गरीब शेतकऱ्यांचे शोषण होऊन त्यांच्या यातनेत भर पडली मात्र सरकारी खजिन्यामध्ये पुरेसा पैसा येऊ लागला. नंतर ही पद्धत बिहार, ओडिसा, आंध्र आणि वाराणसीमध्येही लागू करण्यात आली. चार्ल्स मेटकॉफच्या मते, ''भारतीय शेतकरी कर्जात जन्मत असत. कर्जात रहात असत आणि ब्रिटिशांच्या जमीन कर धोरणामुळे कर्जातच मरत असत.''

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**महलवारी पद्धत:** या पद्धतीनुसार कंपनी सरकारने जमीन महसुलाबाबत महलदारांबरोबर एक विशिष्ट करार केला. याची सुरुवात उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशातील बराचसा भाग, पंजाब आणि दिल्ली येथे झाली. 'महल' म्हणजे तालुका. या पद्धतीची सुरुवात आर.एम. बेऊर्ड आणि जेम्स थॉम्पसनने केली. याची अंमलबजावणीही वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या पद्धतीने होत होती. लहान मोठे जमीनदार या व्यवस्थेचा भाग होते. येथे उत्पादनाच्या आधारावर कर आकारणी केली जात असे. BEI (ब्रिटिश ईस्ट इंडिया) कंपनीचे अधिकारी अपेक्षित उत्पादनापेक्षा जादा कर लादत असत. त्यामुळे बऱ्याच जमीनदारांना आपल्या जमिनीची मालकी गमवावी लागली. या जमीनदारांवर अवलंबून असलेल्या अल्प भूधारक शेतकरी आणि शेतमजूरांनाही यामुळे त्रास सहन करावा लागला.

**रयतवारी पद्धत:** 1792 मध्ये अलेक्झांडर रीड यांनी रयतवारी पद्धतीची सुरुवात पहिल्यांदा बारामहल प्रांतामध्ये केली. 1801 मध्ये थॉमस मन्रोने ही पद्धत मद्रास व म्हैसूर प्रांतात तशीच चालू ठेवली. या प्रांतातील बराचसा भाग ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा होता. या पद्धतीमध्ये शेतकरी व कंपनीचा एकमेकांशी थेट संबंध आला. जो जमीन कसत असे तोच जमिनीचा मालक म्हणून ओळखला जात असे. उत्पादनाच्या पन्नास टक्के रक्कम मालकाला कराच्या स्वरुपात कंपनीला द्यावी लागे. या जमीन महसुलाला 30 वर्षांची मुदत असे. या मुदतीनंतर कर आकारणीमध्ये बदल केला जाऊ शकत असे.

लहान शेतकऱ्यांना जमिनीची मालकी दिली असली, तरी भरमसाठ जमीन कर आकारणीमुळे त्यांना ते परवडत नसे. करवसुलीसाठी अधिकारी दंडात्मक कारवाई करीत. जरी जास्त पीक पिकले नसले, पिके करपली तरी कर भरावाच लागे. म्हणून शेतकऱ्यांना सावकाराकडून (Money lender) कर्ज काढावे लागे. कर्जाची रक्कम फेडता आली नाही तर त्यांना आपली जमीन विकावी लागे. असे असूनही नवीन करपद्धती शेतकऱ्यांसाठी हितावह आहे; असा कंपनी दावा करीत असे. वास्तव असे होते की या पद्धतीमध्ये बऱ्याच शेतकऱ्यांना आपल्या जमिनी विकाव्या लागल्या.

**ब्रिटीश जमीन महसूल पद्धतीचे परिणाम:**

1. शेतकऱ्यांचे शोषण करणारा जमीनदारांचा नवा वर्ग निर्माण झाला.
2. जमीनदारांच्या शोषणाला बळी पडलेले शेतकरी हळूहळू भूमिहीन झाले.
3. जमीन म्हणजे एक वस्तू समजली जाऊ लागली - जमिनी गहाण ठेवून कर्ज उपलब्ध होऊ लागले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

4. अनेक जमीनदारांना जमिनीचा कर भरण्यासाठी त्यांच्या जमिनी गहाण ठेवाव्या लागल्या.
5. कृषी क्षेत्र हे इंग्लंडमधील कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचे उत्पादन करणारे व्यावसायिक क्षेत्र बनले.
6. सावकार लोक गबर झाले.

**आधुनिक शिक्षण पद्धती:**

*भारतीयांचे पारंपरिक शिक्षण अविरतपणे चालू होते. मध्ययुगीन काळात मुस्लिम राजांच्या राजवटीत पारंपरिक शिक्षण पद्धतीत काही बदल झाले. 18 व्या शतकात ब्रिटिश राजवटीत काही नवीन बदल घडून आले. भारतात राहणाऱ्या ब्रिटिश व युरोपियनांच्या मुलांसाठी नवीन शाळा सुरू करण्यात आल्या. परंतु या सुविधा स्थानिक लोकांसाठी नसल्यामुळे त्यांना काहीच फायदा नव्हता. वॉरन हेस्टींग्जने भारतात आधुनिक शिक्षण पद्धतीचा विस्तार करून भारतीयांना या सुविधा उपलब्ध करून दिल्या. 1781 मध्ये 'कलकत्ता मदरसा' ची स्थापना झाली. 1792 मध्ये जोनाथन डंकन या ब्रिटिश नागरिकाने बनारसमध्ये संस्कृत महाविद्यालय सुरु केले. परंतु भारतामध्ये ब्रिटिश शिक्षणाचे सार्वत्रिकरण मात्र चार्ल्स ग्रँटनी केले.*

19व्या शतकाच्या सुरुवातीनंतर इंग्रजी शिक्षण पध्दतीला गती मिळाली 1828 मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिंक जेव्हा भारताचे गव्हर्नर झाले; तेव्हा खऱ्या अर्थाने ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा भारतात विस्तार झाला. बेंटिकने मेकॉले यांची गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती केली. तसेच शिक्षण समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांना नेमले. 1835 मध्ये मेकॉले यांनी सादर केलेला अहवाल भारतीय आधुनिक शिक्षण पद्धतीचा मूलभूत पाया ठरला. शरिराने भारतीय, पण बुद्धिमत्तेने, मताने आणि अभिरुचीने ब्रिटिश असलेल्या भारतीयांचा एक नवा वर्ग निर्माण करणे हे त्यांच्या धोरणाचे उद्दिष्ट होते. भारतीय शिक्षण पद्धतीत इंग्रजी माध्यमाचा वापर 1830 नंतर सुरू झाला.

भारतामध्ये विद्यापीठांची स्थापना हे शिक्षणाच्या प्रगतीचे अत्यंत महत्त्वाचे असे पाऊल होते. चार्ल्स वुड आयोगाच्या (1854) शिफारसीनुसार गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने 1857 मध्ये कलकत्ता, बाँबे आणि मद्रास येथे विद्यापीठाची स्थापना केली. यानंतर भारतात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण सुरू झाले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भारतावर झालेले ब्रिटिश शिक्षण पद्धतीचे परिणाम :**

1. भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाबरोबरच आधुनिकता, निधर्मीपणा, लोकशाही वृत्ती आणि विवेकबुद्धी जागृत झाली.
2. स्थानिक साहित्य व भाषांना उत्तेजन मिळाले. यामुळे सुशिक्षित वर्गात ऐक्याचे विचार निर्माण होण्यास मदत झाली.
3. नियतकालिकांचा उदय झाला. यामुळे सरकारी कामकाजाची व धोरणांची छाननी होऊ लागली आणि भारतीय लोक विविध विषयांवर आपली टीकात्मक मते व्यक्त करू लागले.
4. नवनवीन सामाजिक व धार्मिक चळवळी सुरू झाल्या.
5. जे.एम.मिल, रूसो आणि माँटेस्क्यू सारख्यांच्या थोर विचारांमुळे सुशिक्षित भारतीय तरुणांमध्ये नव्या विचारांची उत्पत्ती होवू लागली.
6. जगभरात सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळींचा प्रभाव भारतीयांवरही पडला.
7. भारतीयांमध्ये आपल्या थोर परंपरा समजून घेऊन त्यांचे संवर्धन करण्याची जाणीव निर्माण झाली.

अशा रीतीने ब्रिटिश शिक्षण पद्धतीमुळे नवीन विचार आणि सांस्कृतिक धारणा उदयास आली. ब्रिटीश शिक्षण व्यवस्थेमुळे पुरोगामी वृत्तीची भारतीयांची नवीन पिढी निर्माण झाली. भारतीय आधुनिक पिढी तयार झाली.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## घटनात्मक विकास

घटनात्मक विकास ब्रिटिश प्रशासनाबरोबरच भारतामध्ये काही समस्या सुद्धा निर्माण झाल्या. त्यांचे निवारण करण्यासाठी प्रशासनामध्ये सुधारणा करणे अत्यंत महत्त्वाचे होते. यासाठी भारतीयांच्या गरजा व मागण्या लक्षात घेणे अनिवार्य होते, ब्रिटिशांनी नवनवीन कायद्यांची निर्मिती करून ते कायदे लागू करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारच्या कायद्यांनी भारतीय घटनेच्या उत्क्रांतीला पुष्टी दिली या कायद्याबद्दलची आपण थोडक्यात माहिती घेऊया.

**ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात अमलात आणले गेलेले कायदे (1773-1858)**

**1773 चा रेग्युलेटिंग ॲक्ट**

1765 मध्ये दिवाणी हक्क लागू झाल्यानंतर, कंपनीच्या लोभी अधिकाऱ्यांनी या तरतुदीचा गैरवापर केला आणि भ्रष्ट मार्गाने ते श्रीमंत झाले. दिवसेंदिवस हा भ्रष्टाचार

वाढतच गेला. ब्रिटिश संसदेचे सदस्य एडमंड बर्क यांनी ईस्ट इंडिया कंपनीतील या भ्रष्टाचारावर कडाडून टीका केली. ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश सरकारला मिळणारा कर भरणा हा गुन्हेगारी कर असल्याची टीका त्यांनी केली. कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराबाबत ब्रिटिश सरकारने मौन पाळल्यामुळेच त्यांना अशा पद्धतीने टीका करणे भाग पडले. कंपनीचे बरेच अधिकारी गडगंज श्रीमंत झाले आणि इंग्लंडमधील अनेकांना भीती होती की हे लोक इंग्लंडची राजकीय व्यवस्था बिघडू शकतात. या पार्श्वभूमीवर 1773 मध्ये 'रेग्युलेटिंग ॲक्ट हा कायदा लागू करण्यात आला.

**या कायद्यातील प्रमुख तरतुदी :**

1. या कायद्याच्या अंमलबजावणीपूर्वी ब्रिटिश राजवटीत बंगाल, मद्रास व बाँबे अशा तीन प्रेसिडेन्सीज होत्या. या तिन्ही प्रेसिडेन्सीजमध्ये स्वतंत्र राज्यकारभार चालत असे. रेग्युलेटिंग ॲक्ट अंतर्गत बंगाल प्रेसिडेन्सीने इतर दोन प्रेसिडेंसींवर नियंत्रण मिळवले.
2. बंगालचा गव्हर्नर हा तिन्ही प्रेसिडेन्सीजचा गव्हर्नर जनरल बनला.
3. गव्हर्नर जनरलला इतर दोघांवर निर्देश, नियंत्रण आणि देखरेख करण्याचे अधिकार देण्यात आले होते.
4. कंपनीच्या संचालक मंडळाच्या तसेच बंगालच्या गव्हर्नर जनरलच्या मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय बाँबे व मद्रास प्रेसिडेन्सीज कोणावरही युद्ध घोषित करू शकत नव्हते किंवा शांतता करार करू शकत नव्हते. अगदीच आणिबाणीच्या परिस्थितीत स्वतंत्रपणे कार्य करण्याचा अधिकार त्यांना होता.
5. या कायद्यानुसार कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. या मध्यवर्ती न्यायालयात एक सरन्यायाधीश आणि तीन सामान्य न्यायाधीश होते.

अशा रीतीने नावाप्रमाणेच कंपनीच्या भारतातील कारभारावर नियंत्रण ठेवणे हेच या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होय.

**1784 चा पिट्स इंडिया ॲक्ट :**

1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टमध्ये बऱ्याच विसंगत बाबी असल्यामुळे त्या दुरुस्त करण्याकरिता तसेच ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांच्या कामाची रूपरेषा ठरविण्यासाठी 'पिट्स इंडिया ॲक्ट' लागू करण्यात आला. ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारांवर मर्यादा आणली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

या कायद्याची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे संचालक मंडळाऐवजी सहा सभासदांचे एक नियंत्रक मंडळ (Board of control) स्थापण्यात आले. या मंडळाला जमीन महसूल, लष्करी व नागरी क्षेत्रांशी संबंधित काही बाबींवर नियंत्रण ठेवण्याचे तसेच सल्ला देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. संचालक मंडळाच्या जागी नियंत्रण मंडळ अस्तित्वात आले.

हा कायदा असे जाहीर करतो की भारतीयांना हे श्रेष्ठ अधिकार केवळ ब्रिटिश साम्राज्यामुळेच प्राप्त झाले आहेत, त्यांच्या स्वकर्तृत्त्वामुळे नव्हे. म्हणूनच त्यांचे राजकीय हक्क कमी केलेले आहेत. तसेच भारताचा जो भाग ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आहे. तो ब्रिटिश साम्राज्याचाच भाग आहे. त्यामुळे इंग्लंडचे सरकार हे भारताचे अंतिम शासक होते.

## चार्टर ॲक्टस

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

चार्टर ॲक्टचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीला ब्रिटिश सरकारकडून भारतात व्यापार करण्यासाठी मिळालेल्या सनदेचे ठराविक काळानंतर नूतनीकरण करणे. 1793, 1813, 1833 आणि 1853 चे चार्टर कायदे हे उद्दिष्ट गाठण्यासाठीच अंमलात आणले गेले. 20 वर्षातून एकदा चार्टर ॲक्ट अंमलात आणताना ब्रिटिश सरकार यामध्ये नवीन कायद्यांचा समावेश करीत असे. यापैकी 1813 व 1833 चे चार्टर कायदे विविध ऐतिहासिक कारणांमुळे महत्त्वाचे आहेत.

**1813 चा चार्टर ॲक्ट :**

1. या कायद्याअंतर्गत ईस्ट इंडिया कंपनीला आणखी 20 वर्षे भारतात राहून व्यापार करण्याचा परवाना देण्यात आला. हा कायदा अंमलात आणण्यापूर्वी भारतामध्ये व्यापारासाठी इच्छुक असणाऱ्या कुणालाही परवानगी दिली जावी अशी मागणी होती परंतु परवानगी दिली जात नव्हती. या कायद्यान्वये ती परवानगी देण्यात आली आणि भारतात मुक्त व्यापाराचे एक नवे पर्व सुरू झाले.
2. अधिकृत परवानगी व परवान्याचे नवे पर्व सुरू झाले.
3. संचालक मंडळ गव्हर्नर जनरल व सरसेनापतींची (Commander-in-Chief) नेमणूक करीत असे.
4. भारतात चर्चना अधिकृतरित्या प्रवेश दिला गेला. ख्रिश्चन मिशनरीजना भारतीयांना ज्ञानसमृद्ध बनवून त्यांचे नैतिक व धार्मिक जीवन वृद्धिंगत करण्याचे आदेश दिले गेले.

या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर बऱ्याच मिशनरीजनी भारतात येण्यास सुरुवात केली. यानंतर ख्रिस्ती धर्माचा व इंग्रजी शिक्षणाचा विस्तार व प्रसार होण्यास सुरुवात झाली.

वरील सर्व सुधारणांमुळे 1813 चा चार्टर ॲक्ट हा एक ऐतिहासिक कायदा म्हणून ओळखला जातो.

**1833 चा चार्टर ॲक्ट :**

भारतातील परिस्थिती सुधारणे हे या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. या कायद्यांतर्गतसुद्धा ईस्ट इंडिया कंपनीला आणखी 20 वर्षे भारतात राहून व्यापार करण्याचा परवाना देण्यात आला. या कायद्यातील प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे -

1. बंगालच्या गव्हर्नर जनरलला भारताचा गव्हर्नर जनरल असे संबोधण्यात येवू लागले.
2. गव्हर्नर जनरलला भारतातील सर्व व्यापारावर नियंत्रण ठेवण्याचे, देखरेख करण्याचे व सल्ला देण्याचे अधिकार देण्यात आले.
3. भारतातील संस्थानांशी युद्ध, शांतता किंवा परराष्ट्रविषयक धोरणे ठरविण्याचे संपूर्ण अधिकार बंगालच्या केंद्र सरकारला होते.
4. जेव्हा गव्हर्नर जनरलचे मत कार्यकारी समितीतील सदस्यांच्या बहुमताशी जुळत नसे, तेव्हा त्याला स्वतःचे मत लेखी स्वरूपात देणे बंधनकारक होते.
5. या कायद्यानुसार धर्म, जन्म, जात व वर्णावर आधारित भेदावर बंदी होती.
6. गव्हर्नर जनरलच्या सल्लागार मंडळात (कार्यकारी समिती) एका कायदे पंडिताची नेमणूक करणे बंधनकारक होते.
7. सर्व ब्रिटिश कंपन्यांना भारताशी व्यापारी संबंध ठेवण्याची मुभा होती.

1833 चा चार्टर कायदा भारतातील अंतर्गत परिस्थितीवर प्रकाश टाकतो. तसेच 1830 च्या दरम्यान इंग्लंडमध्ये असलेल्या विविध राजकीय सुधारणांवरही भर देतो.

**ब्रिटिशांच्या राजवटीत अंमलात आणलेले कायदे (1858-1947)**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या दुराग्रही प्रशासन व भारतविरोधी कायद्यांमुळे 1857 मध्ये 'शिपायांचे बंड' घडून आले. यामुळे (BEI) कंपनीचा राज्यकारभार ब्रिटनच्या राणीकडे हस्तांतरित करण्यात आला. या कालावधीत अंमलात आणलेले प्रमुख कायदे म्हणजे भारत

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

सरकारचा कायदा 1858, 1861, 1892, 1909, 1919 व 1935. भारतात विविध कालखंडात घडलेल्या राजकीय घडामोडीवर प्रभाव टाकणारे हे कायदे इतिहासामध्ये अतिशय महत्त्वाचे ठरतात.

**भारत सरकारचा कायदा 1858 :**

1857 च्या शिपाई व नागरिकांच्या क्रांतीचा परिणाम म्हणून हा कायदा अस्तित्वात आला. त्यामुळे प्रत्यक्षरित्या भारत ब्रिटिशांच्या अंमलाखाली आला. 1 नोव्हेंबर 1858 रोजी ब्रिटनच्या व्हिक्टोरिया राणीने भारतातील सर्व प्रदेशांचा विकास करण्यात येईल अशी घोषणा केली. या कायद्यातील प्रमुख तरतुदी :

1. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची मान्यता रद्द करण्यात आली व भारत देशावर ब्रिटनच्या राणीचा राज्यकारभार सुरू झाला.
2. गव्हर्नर जनरल या हुद्दयाचे नाव बदलून त्याला 'व्हाईसरॉय' असे संबोधण्यात आले. लॉर्ड कॅनिंग हे भारताचे पहिले व्हाईसरॉय बनले.
3. ब्रिटिश सरकारमध्ये 'सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया (राज्यसचिव)' नावाचे नवीन पद निर्माण करण्यात आले. सचिव हा ब्रिटिश मंत्रिमंडळाचा भाग होता आणि भारताचा राज्यकारभार पाहण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविण्यात आली.
4 प्रशासनात सचिवांना मदत करण्यासाठी 15 सदस्यांची एक भारतीय परिषद (Council of India) अस्तित्वात आली.

**1861 चा भारतीय शासनाचा कायदा (The Indian council Act of 1861):**

1857 च्या घटनेनंतर अंमलात आलेला हा प्रमुख कायदा आहे. या कायद्यामुळे भारतीयांना कायदे तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची मुभा देण्यात आली. ब्रिटिशांबद्दल भारतीयांच्या मनात असलेला अभिप्राय समजून घेण्यासाठी भारतीयांना प्रतिनिधीत्व देण्यात आले. याला प्रतिपादन धोरण (Policy of Assertion) असे म्हणतात.

**या कायद्यातील प्रमुख तरतुदी :**

1. व्हाईसरॉयच्या कायदेमंडळात भारतीयांची अशासकीय सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली.
2. आणीबाणीच्या काळात तातडीचा आदेशी (अध्यादेश) काढण्यासाठी व्हाईसरॉय यांना संपूर्ण अधिकार देण्यात आले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**1892 चा भारतीय शासनाचा कायदा :**

1861 च्या कायद्याचा हा पुढील भाग आहे. 1892 च्या कायद्यात भारतीयांना दिलेल्या कायदेमंडळातील निवड प्रक्रियेमधील प्रतिनिधीत्वामध्ये वाढ करण्यात आली. ब्रिटिश राजवटीविरुद्ध काँग्रेस संघटनेने व्यक्त केलेल्या टीकात्मक दृष्टिकोनामुळे राज्यकारभारात भारतीय प्रतिनिधित्वाचा विस्तार झाला.

**या कायद्यातील प्रमुख तरतुदी :**

1. केंद्र व प्रांतीय कायदेमंडळातील अतिरिक्त सदस्याची संख्या वाढविण्यात आली.
2. कायदेमंडळाचे अधिकार वाढविण्यात आले व त्याला अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार देण्यात आला.
3. सहा दिवसांची पूर्व सूचना देऊन सार्वजनिक हितरक्षणाबद्दलचे प्रश्न सरकारला विचारण्याचा हक्क देण्यात आला.

**1909 चा भारतीय शासनाचा कायदा (Indian Council Act):**

या कायद्याला 'मिंटो-मोर्ले सुधारणा कायदा' असेही म्हणतात. या कायद्याची निर्मिती आणि अंमलबजावणी दरम्यान लॉर्ड मिंटो भारताचे व्हाइसरॉय होते आणि लॉर्ड मोर्ले भारताचे राज्य सचिव (सेक्रेटरी ऑफ स्टेट) होते. भारतीयांमध्ये फूट पाडून राज्यकारभार करण्यासाठी 'फोडा व राज्य करा' या ब्रिटिश धोरणान्वये हा कायदा अंमलात आणला गेला.

**या कायद्यातील प्रमुख तरतुदी :**

1. केंद्रीय कायदेमंडळामधील सदस्यांची संख्या 16 वरून 60 करण्यात आली.
2. प्रांतीय कायदेमंडळातही सदस्यांची संख्या वाढविण्यात आली.
3. प्रथमच निवडणुकीतून कायदेमंडळावर निवडून येण्याची संधी देण्यात आली.
4. मुस्लिमांना वेगळे प्रतिनिधीत्व देण्यासाठी त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्यात आले.

**1919 चा भारतीय शासनाचा कायदा :**

या कायद्याला 'माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा' असेही म्हणतात. पहिल्या महायुद्धात (1914-1918) भारतीयांनी ब्रिटिशांच्या बाजूने युद्धात सक्रिय सहभाग घेतल्याने, भारताचे राज्य सचिव असलेले लॉर्ड माँटेग्यू यांनी प्रशासनाच्या बाबतीत भारतीयांना अधिक प्रतिनिधित्व देण्याच्या बाजूने युक्तिवाद केला. हळूहळू सरकार स्थापनेत लोकांचा सहभाग

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

घेण्यास ते अनुकूल होते. व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड, ज्यांनी नंतर 20 ऑगस्ट 1917 रोजी ब्रिटिश संसदेत विविध सुधारणात्मक उपायांची घोषणा केली. हा अहवाल स्वीकारून 1919 चा भारतीय शासनाचा कायदा तयार करण्यात आला.

**या कायद्यातील प्रमुख तरतुदी :**

1. केंद्रात दोन गृहांचे सरकार (Bi cameral) स्थापण्याची पद्धत सुरू झाली त्यांना वरिष्ठ सभागृह व कनिष्ठ सभागृह असे म्हणतात.
2. प्रांतामध्ये पण केंद्राप्रमाणेच दोन गृहे निर्माण करण्यात आली.
3. भारतासाठी एका उच्चायुक्तांची नेमणूक करण्यात आली.
4. स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास करण्याची हमी देण्यात आली.
5. प्रांतीय अर्थसंकल्प केंद्रीय अर्थसंकल्पापासून वेगळा करण्यात आला.
6. मुसलमान, शीख, अँग्लो इंडियन व युरोपियन यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघ सुरू करण्यात आले.

**1935 चा भारत सरकारचा कायदा:**

या कायद्याने भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचा आधार म्हणून काम केले. 1928 मध्ये मोतीलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेला अहवाल या कायद्याच्या निर्मितीमध्ये महत्त्वाचा ठरला. भारतीय राज्यघटनेतील बहुतांश तरतुदी या कायद्यावर आधारित आहेत. या कायद्याने भारतीयांना पूर्णपणे जबाबदार सरकार स्थापन करण्याची परवानगी दिली. हा कायदा भारतातील ब्रिटिश प्रांतापुरता मर्यादित नसून स्थानिक संस्थानांना पण तो लागू होणार होता

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**या कायद्यातील प्रमुख तरतुदी :**

1. ब्रिटिश शासित प्रदेश, स्थानिक संस्थाने व मांडलिक राज्ये मिळून भारतीय संघ राज्याची कल्पना मांडण्यात आली.
2. भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्यात आली.
3. केंद्रामध्ये दुहेरी राज्यव्यवस्था (Dyarchy) स्थापन करण्यात आली.
4. प्रांतातील दोन गृहांचे सरकार रद्द करून त्यांना संपूर्ण स्वायत्तता देण्यात आली.
5. भारतात संघराज्य न्यायालय (Federal Court) स्थापन करण्यात आले.

वरील सर्व कायदे भारतीय घटनेच्या विकासाला पूरक ठरलेले आहेत हे कायदे म्हणजे भारतीयांनी वेळोवेळी केलेल्या संघर्षाचा परिणामच होय. भारतीयांच्या संघर्षाचे फलित स्वरूप म्हणजे हे कायदे होत. ब्रिटिशांच्या वसाहतशाही राजवटीत हे कायदे अंमलात आले असल्याने ब्रिटिशांनी स्वतःचे हित जोपासले असले तरी भारतीयांना दुर्लक्षून आपल्याला शासन चालविता येणार नाही याची जाणीव त्यांना झाली ही लक्षात ठेवण्यासारखी बाब आहे.

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा:**

1. दिवाणी अदालत (नागरी न्यायालय) ची स्थापना ___________ कडून झाली.
2. पोलिस अधीक्षकाचे पद ___________ कडून निर्माण केले गेले.
3. बंगाल व बिहारमध्ये (कायमधारा) जमीनदारी पद्धती ___________ मध्ये सुरू करण्यात आली.
4. अलेक्झांडर रीडने सुरू केलेली जमीन महसूल पद्धत ___________ होय.
5. भारतामध्ये आधुनिक शिक्षण पद्धती पुरस्कृत करणारा ब्रिटिश अधिकारी ___________ होय.
6. रेग्युलेटिंग ॲक्टची अंमलबजावणी ___________ या वर्षी झाली.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे समूहात चर्चा करून लिहा:**

7. ईस्ट इंडिया कंपनीद्वारे ब्रिटिशांनी भारतात सुरु केलेल्या न्यायव्यवस्थेबद्दल चर्चा करून माहिती लिहा.
8. भारतामध्ये ब्रिटिश राजवटी दरम्यान पोलीस व्यवस्थेमध्ये कोणकोणत्या सुधारणा करण्यात आल्या?
9. ब्रिटिश जमीन महसूल पद्धतीने भारतीय शेतकऱ्यांना 'कर्जात जन्मण्यास, कर्जातच राहण्यास, कर्जातचं मरण्यास' कसे भाग पाडले? ते स्पष्ट करा.
10. रयतवारी पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

11. ब्रिटिशांच्या जमीन महसूल पद्धतीचे परिणाम कोणते?

12. भारतामध्ये आधुनिक शिक्षणपद्धतीमुळे झालेल्या परिणामांची माहिती लिहा.

13. 'रेग्युलेटिंग ॲक्ट' मधील तरतुदी कोणत्या?

14. 1858 च्या भारत सरकारच्या कायद्यातील प्रमुख तरतुदी कोणत्या?

15. 1935 चा भारत सरकारचा कायदा म्हणजे भारतीय संविधानाचा मूळ पाया होय' याचे समर्थन करा.

16. 1919 च्या कायद्यातील प्रमुख तरतुदी कोणत्या?

## III. उपक्रम :

1. भारतामध्ये प्रशासकीय सुधारणा घडवून ब्रिटिशांनी स्वत:साठी मैत्रीचे वातावरण निर्माण केले - या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करा.

2. तुमच्या शिक्षकांच्या सहाय्याने या प्रकरणात नमूद केलेल्या कायद्याव्यतिरिक्त अन्य कोणकोणते कायदे ब्रिटिशांनी अंमलात आणले त्याबद्दल चर्चा करा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

✲✲✲

प्रकरण - 4

# म्हैसूरचे वडेयर आणि ब्रिटिश सत्तेला कर्नाटकातून झालेला विरोध

D2Y5X3

**या प्रकरणात आपण खालील घटकांचा अभ्यास करुया.**

- *म्हैसूरचे वडेयर*
- *हैदर अली आणि टिपू सुलतान अँग्लो-म्हैसूर युद्ध*
- *धोंडिया वाघ*
- *कित्तूरचे बंड - आणि चेन्नम्मा व संगोळ्ळी रायण्णा*
- *अमर सुळ्याचे बंड*
- *हलगलीच्या बेरडांचे बंड*
- *सुरपूरचे बंड*

NOT TO BE REPUBLISHED
©KTBS

सध्याचे कर्नाटक राज्य, एकीकरणापूर्वी विविध संस्थानांमध्ये विखुरलेले होते. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याव्यतिरिक्त ब्रिटिशांनी स्वतःच्या फायद्यासाठी शेतकरी व व्यापाऱ्यांची पिळवणूक करण्यास सुरुवात केली. यामुळे संपूर्ण कर्नाटकात असुरक्षितता निर्माण झाली. स्थानिक राजांना असुरक्षित वाटू लागले. परिणामतः कर्नाटकातील बहुतांश भागात ब्रिटिशांविरुद्ध बंडखोरी झाली. प्रारंभी राजे व जमीनदार आपापसात एकी न करता ब्रिटिशांविरुद्ध स्वतंत्रपणे लढले.

## म्हैसूरचे वडेयर (1399-1947)

विजयनगर साम्राज्याच्या पतनानंतर, तिची परंपरा आणि हरवलेले वैभव म्हैसूरच्या वडेयरांनी पुनरुज्जीवित केले आणि वैभवशाली परंपरा पुढे चालू ठेवली. म्हैसूर शहराजवळील हदीनाडू या पाळेयपट्टीवर श्रीरंगपट्टणचा मांडलिक असलेला चामराजा राज्य करीत होता. तो मरण पावला तेव्हा त्याला वारसदार म्हणून मुलगा नसल्यामुळे करुगल्लीचा दळवाई मारनायकाने त्याचा राज्यकारभार पाहिला आणि राजकन्येने आपल्याशी लग्न करावे यासाठी तिला लग्नाची मागणी घातली. परंतु त्याच्या या मागणीला कोणीही सहमती दर्शविली नाही.

यावेळी गुजरातमधील द्वारका येथील यदुराय आपला भाऊ कृष्णरायासह म्हैसूरला आला. स्वेच्छेने तो महाराणीच्या मदतीला आला आणि त्याने मारनायकाला ठार मारले.

यामुळे महाराणीला आनंद झाला आणि तिने आपल्या मुलीचा विवाह त्याच्याशी करून दिला. अशा प्रकारे वडेयर घराण्याची सुरुवात झाली. या वंशातील यदुरायापासून जयचामराज वडेयरपर्यंत 25 वडेयरांनी म्हैसूरवर राज्य केले. यातील काही महत्त्वाचे वडेयर समजून घेऊ.

**राजा वडेयर (1578-1617):** छोट्या पाळेयपट्टीचे मोठ्या म्हैसूर राज्यामध्ये विस्तार करण्याचे श्रेय त्यांना जाते. श्रीरंगपट्टण हे विजयनगरच्या प्रतिनिधीकडून त्यांने जिंकून घेतले आणि त्याला आपली राजधानी बनविली. पुढे आजूबाजूचा प्रदेश ताब्यात घेतला आणि आपल्या राज्याचा विस्तार केला.

त्यांने श्रीरंगपट्टण, म्हैसूर आणि मेलुकोट येथील मंदिरांचे पुनरुज्जीवन केले. 'राजामुडी' हा मुकुट त्याने भगवान चेलुवनारायण स्वामींना अर्पण केला. म्हैसूरमध्ये त्यांने नवरात्र (दसरा) उत्सवाची सुरुवात श्रीरंगणपट्टण येथे केली.

**चिक्कदेवराज वडेयर (1673-1704):** तो एक कार्यक्षम योद्धा आणि प्रशासक होता. मदुराई, इक्केरी आणि विजापूर येथे शिवाजींच्या सैन्याचा हल्ला परतावून लावला. त्याने मागडी, मधुगिरी, कोराटगेरे व इतर ठिकाणे काबीज केली. त्यांने मोगल सेनापतीकडून बंगलोर विकत घेतले. त्यांना कर्नाटक कविचक्रवर्ती, अप्रतिम वीर, तेंकनराजा आणि नवकोटी नारायण या पदव्या होत्या. प्रशासनात मदत करण्यासाठी त्यांनी मंत्रिपरिषद (अठरा कचेरी) सुरू केली. त्यांच्या काळात टपाल व्यवस्था अस्तित्वात आली. कावेरी नदीवर एक धरण बांधण्यात आले आणि सिंचनासाठी चिक्क देवराज आणि दोड्डु देवराज कालवेही बांधण्यात आले. त्याने आपल्या दरबारात तिरूमलार्य, सांची होनम्मा आणि इतर अनेक कवींना आश्रय दिला होता.

**म्हैसूरवर कमिशनरांचे राज्य (1831-1881) :** 1799 मध्ये टिपू सुलतानच्या मृत्यूनंतर तिसरा कृष्णराज वडेयर यांनी ब्रिटिशांच्या संमतीने म्हैसूरचा महाराजा म्हणून पदभार स्विकारला. जागुरी नगर (शिमोगा जिल्हा) येथील बंडखोरीमुळे 1830 मध्ये ब्रिटिशांनी म्हैसूर राज्य आपल्या नियंत्रणाखाली घेतले. पुढील 1831 ते 1881 पर्यंतच्या काळाला कमिशन काळ म्हणून ओळखले जातो. या काळात कृष्णराज वडेयर यांनी पुन्हा सत्ता मिळविण्यासाठी वारंवार प्रयत्न केले. शेवटी 1867 मध्ये ब्रिटिश सरकारने म्हैसूरच्या वडेयर कुटुंबांला म्हैसूर परत करण्याचा निर्णय घेतला. या

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

निर्णयावेळी एक अट घालण्यात आली, अट अशी होती की राजा म्हणून कृष्णराज वडेयर यांच्या वारसांचा विचार केला जाईल, कृष्णराज वडेयर यांचा विचार केला जाणार नाही. पुढील वर्षीच कृष्णराज वडेयर यांचा मृत्यू झाला. त्यांचे वारस दहावे चामराजेंद्र वडेयर गादीवर बसले. परंतु ते प्रौढ होयीपर्यंत कमिशनरांनीच राज्य चालविले.

1831-1881 पर्यंत सात कमिशनरांनी राज्यकारभार सांभाळला. त्यापैकी महत्वाचे म्हणजे मार्क कब्बन आणि एम.बी. बोरिंग यानी अनुक्रमे 27 आणि 8 वर्षे राज्य केले. कब्बनच्या प्रशासकिय काळात इंग्रजी शिक्षण, न्याय व्यवस्था आणि अनेक क्षेत्रांचे आधुनिकरण केले. या दोन कमिशनरांच्या कार्याचा दिर्घकालीन परिणाम म्हैसूर राज्यावर झालेला दिसतो. शेवटचे कमिशनर जेम्स जार्डन यांनी म्हैसूरची राज्यव्यवस्था दहावा चामराजेंद्र वडेयर यांच्याकडे 1881 साली हस्तांतरित केली.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**दहावा चामराजेंद्र वडेयर (1881-1894):** दिलेल्या वचनानुसार ब्रिटिशांनी, 1881 मध्ये म्हैसूरची गादी दहावा चामराजेंद्र वडेयर यांच्याकडे सोपविली. याबरोबरच म्हैसूरमधील कमिशनर राजवट संपुष्टात आली. याठिकाणी एका कायमस्वरूपी ब्रिटिश अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यासोबतच सी. रंगाचार्लू यांची दिवाण म्हणून नेमणूक करण्यात आली. ते एक कार्यक्षम प्रशासक आणि उदारमतवादी होते. त्यांनी म्हैसूर प्रातिनिधीक सभेची स्थापना केली. 1881 मध्ये कोलार येथे सोन्याच्या खाणी, 1882 मध्ये बेंगळुरू-म्हैसूर रेल्वे देखील सुरू झाल्या.

1883 मध्ये रंगाचार्लू यांच्या मृत्यूनंतर के. शेषाद्री अय्यर दिवाण झाले. वेगवेगळ्या पदांवर काम केल्याचा मोठा अनुभव त्यांच्याकडे असल्याने त्यांना समस्या समजून घेता आल्या. त्यांनी राज्याची आर्थिक स्थिती सुधारली. अनेक नवीन रेल्वे मार्गाची जबाबदारी त्यांच्यावर होती. विविध प्रशासकीय पदांसाठी हुशार तरुणांची निवड करण्यासाठी त्यांनी म्हैसूर नागरी सेवा परीक्षा सुरू केल्या त्यांच्याच प्रयत्नामुळे 1894 मध्ये **'बालविवाह प्रतिबंध कायदा'** लागू करण्यात आला (Infont prevention Regulation-1894) शिंशा जलविद्युत प्रकल्पही त्यांच्याच काळात प्रारंभ करण्यात आला. त्यांनी सिंचनाला अधिक महत्त्व दिले. महाराणी गर्ल्स हायस्कूलची स्थापना करून मुलींच्या शिक्षणाला विशेष महत्त्व दिले.

विवेकानंद म्हैसूरला आले असताना ते चामराजेंद्र वडेयर यांच्याकडे ते राहिले होते. शिकागो येथील जागतिक धर्म संसदेत भाग घेण्यासाठी विवेकानंदांना त्यांनी मदत केली.

त्यांचे कन्नड आणि संस्कृत भाषेवर प्रेम असल्यामुळे त्यांनी अनेक विद्वानांना आपल्या राजदरबारात आश्रय दिला होता. त्यापैकी ज्यांनी अनेक पुस्तके लिहिली होती असे बसाप्पा शास्त्री महत्त्वाचे होते. त्यांना ''अभिनव कालिदास'' म्हणून ओळखले जाते. म्हैसूरचे राज्यगीत, 'कायोश्री गौरी' त्यांनी रचले होते.



**चौथा कृष्णराज वडेयर**

**चौथा कृष्णराज वडेयर (1894-1940):** हा वयाने लहान असल्यामुळे त्याची आई महाराणी वाणीविलास सन्नीधान केंप संजूमणी त्याच्यावतीने राज्यकारभार पहात होती. राज्य प्रशासनात तिला दिवाण आणि त्यांच्या सल्लागार समितीच्या सदस्यांनी मदत केली. त्यामुळे विकासकामे वाढली. सोन्याच्या खाणींमध्ये सुधारणा, महाविद्यालयाची स्थापना, मारीकणीवे जलाशयाचे बांधकाम, रेल्वे, रुग्णालये आणि शिवनसमुद्र येथे जलविद्युत प्रकल्प सुरू करण्यात आले. या वीज प्रकल्पामुळे कोलार सोन्याच्या खाणीला आणि नंतर बेंगळूर शहराला वीज पुरवठा करण्यात आला. भारतात विद्युतीकरण झालेले बेंगळूर हे पहिले शहर होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1902 मध्ये चौथा कृष्णराज वडेयर यांनी कायदेशीर सत्ता ग्रहण केली. पी.एन. कृष्णमूर्ती, व्ही.पी. माधवराव, टी. आनंदराव, सर एम. विश्वेश्वरय्या, कांतराजा अर्स, सर अल्बियन बॅनर्जी, सर मिर्झा इस्माईल इत्यादी प्रसिद्ध दिवानांनी त्यांच्या कार्यकाळात अतुलनीय सेवा केली चौथा कृष्ण देवराज वडेयर यांच्या पुरोगामी दृष्टी आणि दिवानांच्या कार्यक्षम प्रशासनामुळेच म्हैसूर राज्य देशातील आघाडीच्या राज्यांपैकी एक बनले.

आपल्या लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यात त्यांना खूप रस होता. प्राथमिक शिक्षणाचा विकास करण्यासाठी सर्व प्राथमिक शाळांमधील फी त्यांनी रद्द केली. मुलींच्या शिक्षणासाठी मदत केली. म्हैसूर विद्यापीठ सुरू केले आणि परदेशात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही सुरू केली. 1905 मध्ये टाटांच्या मदतीने बेंगळूर येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सची स्थापना केली. सिंचन विकासावर विशेष लक्ष दिले. बेळगोळजवळ कावेरी नदीवर एक धरण बांधण्यात आले. नवीन रेल्वे मार्ग सुरू करण्यात

आले. अनेक छोटे-मोठे उद्योग सुरू झाले. त्यामध्ये लोह आणि पोलाद कारखाना, सिमेंट कारखाना, भद्रावती येथील कागद कारखाना, मंड्या येथील साखर कारखाना. म्हैसूर येथे चंदनी तेलाचा कारखाना, बेंगळुरू येथे साबण कारखाना. बेळगोळ येथील रसायने व खताचा कारखाना सुरू केला. तसेच न्यायालयीन सभेची स्थापना केली. घटनात्मक बदलातील हे एक मोठे पाऊल होते.

कृष्णराजा वडेयर हे अतिशय साध्या स्वभावाचे परंतु कार्यक्षम प्रशासक होते. त्यांना ललित कलांमध्ये खूप रस होता. त्यांनी एम. हिरियन्ना, वीणा शेषन्ना, संबय्या, बिदाराम कृष्णप्पा, मुथैय्या भागवतार, वासुदेवाचार्य, टी. चौडय्या आणि इतर संगीतकारांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या उत्तम प्रशासकीय कारभारामुळे म्हैसूर राज्य हे आदर्श राज्य म्हणून ओळखले जाऊ लागले. महात्मा गांधीजी त्यांना राजर्षी म्हणत.

**जयचामराज वडेयर (1940-1950):** कृष्णराज वडेयर यांच्या मृत्यूनंतर तो गादीवर आला. त्यांचे शिक्षण सर्वसाधारण आणि विशेष महाविद्यालयात झाले. त्यांने जगाची भ्रमंती करून चांगले ज्ञान मिळविले. दिवाण मिर्झा इस्माईल. न्यापती माधवराव आणि अर्काट रामास्वामी मुदलियार या सारख्या दिवाणांची त्यांना मदत झाली.

ते एक महान विद्वान, संगीततज्ञ, वक्ते आणि साहित्य व ललित कलांचे आश्रयदाते होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि अनेक भक्तिगीतेही रचली आहेत. भारत स्वतंत्र झाल्यानंतर ते म्हैसूरचे राज्यपाल झाले.

## ब्रिटिश सत्तेला कर्नाटकातून झालेला विरोध

भारताच्या इतिहासात अठराव्या शतकाला 'राजकीय समस्यांचे शतक' असे संबोधले जाते. याला अनेक कारणे आहेत 1707 मध्ये मोगल सम्राट औरंगजेबाचा मृत्यू झाला. हे याचे प्रमुख कारण आहे. त्याच्या मृत्यूने मोगल साम्राज्य कमकुवत झाले. परिणामी दक्षिण भारतातील त्यांचे वर्चस्व कमी झाले, 'कार्नाटिक' प्रदेशात अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष सुरू झाले.

या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांनी भारतावर आपली राजकीय पकड घट्ट केली. भारताला अनेक राजकीय स्थित्यंतराचा सामना करावा लागला. स्थानिक राजाने ब्रिटिशांचा विविध मार्गाने विरोध केला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## हैदर अली व टिपू सुलतान :



हैदर अली

1704 मध्ये चिक्कदेवराज वडेयर यांच्या निधनाने म्हैसूरच्या राजकीय व्यवस्थेवर दुष्परिणाम झाला. चिक्कदेवराज यांच्या मृत्यूनंतर उत्तराधिकारी कोण? याबद्दल समस्या निर्माण झाली व त्याबरोबरच शासनव्यवस्था ढासळली. म्हैसूरचा राजकीय प्रभाव कमी झाला. या अनियंत्रित परिस्थितीत म्हैसूर व कार्नाटिकच्या काही प्रदेशात हैदर अलीला राजकीय महत्त्व प्राप्त झाले. शस्त्रे वापरण्यात आणि प्रयोग करण्यात हैदर अली लवकरच लोकप्रिय झाला. त्याने सक्रिय लष्करी कारवाया करुन दळवायांवर नियंत्रण मिळविले. त्यांने दुसरा कृष्णराज वडेयर याला कैद करून नजरकैदेत ठेवले व सत्ता आपल्या हाती घेतली. आणि अल्पावधीतच तो नवाब हैदर अली या नावाने प्रसिद्ध झाला. या परिस्थितीचा फ्रेंच आणि इंग्रज दोघांनीही त्यांच्या राजकीय कामासाठी वापर करून घेतला.

## अँग्लो- म्हैसूर युद्धे (1767-1799) :

**पहिले अँग्लो-म्हैसूर युद्धः (1767-1769) :** हे 1767 मध्ये सुरू झाले आणि 1769 मध्ये संपले. हैदर अलीने दक्षिणेत मिळवलेले वर्चस्व इंग्रज, मराठे आणि हैद्राबादच्या निजामाला सहन झाले नाही. म्हणून, ब्रिटिशांनी हैदर अलीला पराभूत करण्यासाठी धूर्त योजना आखण्यास सुरुवात केली कारण त्यांच्या विस्तारवादी धोरणात तो अडथळा ठरत होता. मराठ्यांच्या आक्रमकतेमुळे हैदर अलीला राजकीय आणि आर्थिक नुकसान झाले असले तरी मराठे आणि हैद्राबादच्या निजामाला आपल्या बाजुने सामावून घेण्यासाठी तो धडपडत होता.

इंग्रजांनी मराठ्यांशी करार केला आणि हैद्राबादचा निजाम हैदर अलीच्या विरुद्ध गेला. त्रिपक्षीय युती निर्माण झाली. पण धूर्त युक्त्या लढवून हैदर अली ही युती तोडण्यात यशस्वी ठरला. त्यांने मराठे, हैद्राबादचा निजाम आणि इंग्रज यांच्यात शत्रुत्व आणि अविश्वास निर्माण केला.

दरम्यान, अर्काटमध्ये राजकीय पेच निर्माण झाला. 1767 मध्ये हैदर अली आणि हैद्राबादच्या निजामाने अर्काटवर हल्ला केला. पण अर्काटच्या राजाने इंग्रजांशी संधान

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

बांधले होते. या घटनेने युद्ध सुरू झाले. तिरुचनापल्ली, तिरुवन्नमलाई, अंबूर आणि इतर ठिकाणी लढाया झाल्या. हैदर अलीने या लढाईत निकराचे हल्ले चढविले. ब्रिटिश सैन्याने काही ठिकाणे ताब्यात घेतली. हैदर अलीला काही झटके बसले. त्याला तात्पुरती माघार घ्यावी लागली. मुंबईतील ब्रिटिश सैन्य युद्धात सामील झाले. हैदर अलीने आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी युद्ध चालूच ठेवले. 1769 मध्ये त्याच्या सैन्याने थेट मद्रासपर्यंत धडक मारली. त्यामुळे ब्रिटिशांचा थरकाप उडाला. ब्रिटिशांपुढे पर्याय नसल्याने त्यांनी हैदरशी मद्रासचा तह केला. 1769 मध्ये मद्रास तहावर स्वाक्षरी होऊन पहिले अँग्लो- म्हैसूर युद्ध संपले.

**दुसरे अँग्लो- म्हैसूर युद्ध (1780-1784):** त्रावणकोर व तंजावर या राज्यातील राजकीय घडामोडीमुळे हे युद्ध झाले. मद्रासच्या तहामुळे दक्षिण भारतातील राजकीय विकास तात्पुरता खुंटला होता. ब्रिटिशांनी मद्रास तहातील अटींचे उल्लंघन केले. मराठ्यांनी माधवराव पेशवेंच्या नेतृत्वाखाली श्रीरंगपट्टणकडे कूच केले. हैदरने ब्रिटिशांची मदत मागितली ब्रिटिशांनी हैदर अलीला पाठिंबा देणे अपेक्षित होते. परंतु ब्रिटिशांनी हैदर अलीची विनंती झिडकारून मद्रासचा तह मोडला. माहे ही फ्रेंच वसाहत हैदर अलीच्या ताब्यात होती. ब्रिटिशांनी माहेवर हल्ला चढवून त्यावर आपला ताबा मिळविला आणि हेच दुसऱ्या अँग्लो-म्हैसूर युद्धाचे प्रमुख कारण ठरले.

दुसरे अँग्लो - म्हैसूर युद्ध 1780 मध्ये सुरू झाले. सुरुवातीस हैदर अलीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. कर्नाटकातील बरेच किल्ले त्याने काबीज केले. कांचीपुरमदेखील जिंकून म्हैसूरचे सैन्य कोरोमंडलच्या किनाऱ्यापर्यंत पोहोचले. यामुळे ब्रिटिश अधिकारी चिंतातूर झाले. हैदर अलीने अर्काट पण जिंकले. त्याने वाँदिवॉश व वेल्लोरवरही हल्ला चढविण्याची धमकी दिली. सर आयरेकूट या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांनी एक सैन्याची तुकडी तैनातीत ठेवली. त्यांने हैदर अलीच्या सैन्याचा पाँडिचेरीपर्यंत पाठलाग केला. फ्रेंचानी हैदर अलीला ब्रिटिशांविरुद्ध पाठिंबा देण्यास नकार दिला. यानंतर हैदर अलीने आपली युद्धनीती बदलली. त्यांने ब्रिटिशांच्या आधिपत्याखालील प्रदेशावर हल्ला चढविला आणि अपार संपत्ती व शस्त्रास्त्रांची लुटालूट केली.

1781 मध्ये पोर्तोनोव्हो येथील युद्धात ब्रिटिशांनी हैदर अलीचा पराभव केला. यामुळे ब्रिटिशांचा आत्मविश्वास वाढला व त्यांच्या युद्धाची दिशाही बदलली. परंतु पुलिकत आणि सोलिंगूर येथे त्यांना जबरदस्त आर्थिक फटका बसला. त्या दरम्यान सालबाईच्या तहानुसार

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

मराठे व निजामांना आपल्यात सामावून घेण्यात ब्रिटिश यशस्वी ठरले. या युद्धादरम्यान हैदर अलीचा 1782 मध्ये मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा टिपू यांने हे युद्ध सुरू ठेवले.

हैदर अलीच्या मृत्यूसमयी टिपू मलबार प्रांतातील युद्धांमध्ये गुंतलेला होता. हैदर अलीच्या मृत्यूचा फायदा घेत ब्रिटिशांनी मंगळूर व बिदनूर प्रांत काबीज करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी टिपू सुलतानविरुद्ध कालिकत व मलबारच्या राज्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. या सर्व बाबी लक्षात घेवून टिपूने मंगळूर व कोकण किनारपट्टीचे संरक्षण करण्याचे ठरविले. त्यांने ब्रिटिशांचा पराभव केला. परंतु 1784 मध्ये मंगळूरचा तह झाला आणि दुसरे अँग्लो-म्हैसूर युद्ध संपुष्टात आले.

**टिपू सुलतान :**

टिपूला आपल्या राज्यविस्तारामध्ये इंग्रज हे अडथळा निर्माण करणारे शत्रू आहेत असे वाटले व त्यांना हाकलून काढण्यासाठी त्याने आटोकाट प्रयत्न केले. हैदर अलीच्या मृत्यूनंतर तो म्हैसूरचा राजा बनला. ब्रिटिशांच्या कुटील नीतीचा त्याला अंदाज आला. ब्रिटिशांना भारतातून हाकलून देणे हे आपले कर्तव्य आहे, असे त्याचे मत होते. आपल्या 17 वर्षाच्या कारकिर्दीमध्ये त्यांने ब्रिटिशांविरुद्ध अनेक युद्धे केली. त्याला ब्रिटिशांच्या कुटील कारस्थानांची, धूर्त डावपेचांची व लष्करी कारवायांची पूर्ण कल्पना होती. ब्रिटिशांच्या व्यापारविषयक धोरणांना धक्का पोहोचविल्यास त्यांची राजकीय ताकद कमी होऊ शकते याची त्याला जाणीव होती. म्हणून ब्रिटिशांच्या शत्रूपक्षांना संघटित करण्यासाठी त्यांने प्रयत्न सुरू केले. यामुळे चिडलेल्या ब्रिटिशांचा टिपूवरील रोष आणखीनच वाढला.



टिपू सुलतान

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**तुम्हाला माहित आहे का?**

*18 व्या शतकात ब्रिटिशांना थोपविण्याच्या सर्व प्रयत्नांपैकी हैदर अली व टिपू सुलतानद्वारे केल्या गेलेल्या प्रयत्नांना विशेष महत्त्व आहे. आपल्याकडे असणाऱ्या पारंपरिक शस्त्रास्त्रांच्या आधारे ब्रिटिशांना आपण पराभूत करू शकत नाही याची त्यांना पूर्ण कल्पना होती. म्हणून त्यांनी आधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर केला.*

*म्हैसूरचे सैनिक युरोपियन सैनिकांप्रमाणेच आधुनिक शस्त्रास्त्रे हाताळू शकत होते. हैदर अली आणि टिपू सुलतानने भारतात युद्धामध्ये प्रथमच रॉकेट्सचा वापर केला. आधुनिक शस्त्र-साठ्याबरोबरच युद्धासाठी आपल्या खजिन्यात पैशाचीही तितकीच आवश्यकता आहे हे त्यांना माहीत होते. ब्रिटिशांशी लढताना अनेक नवाब दिवाळखोर झालेल्या घटनांचा हैदर अली हा साक्षीदार होता. म्हणून आपली आर्थिक बाजू भक्कम करण्यासाठी त्या दोघांनीही अनेक तह व व्यापारी करार केले. तंबाखू व चंदनाचा त्यांनी राष्ट्रीय व्यापारात समावेश केला. म्हैसूर मधील पारंपरिक हस्तकला वस्तूंचा दर्जा सुधारण्यासाठी फ्रेंच तज्ज्ञांना आमंत्रित करून सल्लामसलत केली. व या वस्तूद्वारे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपले स्थान उंचावण्यासाठी प्रयत्न केले.*

**तिसरे अँग्लो- म्हैसूर युद्ध (1790-1792) :** त्रावणकोरचे राजकारण हेच या युद्धाचे मूळ कारण होय. त्रावणकोरच्या राजांने ब्रिटिशांच्या सहाय्याने कोचीनमध्ये एक किल्ला बांधला. तसेच डचांकडून आयकोटा आणि कांगनूर हे किल्ले काबीज केले. मंगळूरचा तह मोडल्यामुळे या सर्व घटना घडल्या. जनरल मोडोसनच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांनी कारवार, कोईमतूर, दिंदिगल आणि इतर काही प्रांत आपल्या ताब्यात घेतले. टिपू सुलतान बारामहल प्रांतात शिरला आणि त्यांने त्रिचनापल्ली जिंकण्याचा प्रयत्न केला परंतु तो अयशस्वी झाला. या दरम्यान लॉर्ड कॉर्नवॉलिसने ब्रिटिश सैन्याचे नेतृत्व स्वीकारले आणि यामुळे युद्धाची दिशाच बदलली.

कॉर्नवॉलिसच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सैन्यांने कोलार व होसकोटे काबीज करून आपला मोर्चा बेंगळूरकडे वळविला. बेंगळूर काबीज करून तेथील किल्ला उदध्वस्त केला. यानंतर टिपूला नामोहरम करण्यासाठी कॉर्नवॉलिसने मराठे व हैद्राबादच्या निजामांची मदत मागितली मराठ्यांशी व निजामाशी हातमिळवणी केल्यानंतर हे युद्ध ब्रिटिशांसाठी निर्णायक ठरले. मराठ्यांनी सावनूर, गजेंद्रगड, लक्ष्मेश्वर, हुबळी आणि इतर काही प्रांत काबीज केले.

असेच एकामागून एक किल्ले काबीज करीत हे त्रिकूट श्रीरंगपट्टणकडे वळले. एका रात्रीत हा किल्ला उद्ध्वस्त करण्यात आला. (1792) यामुळे टिपू हतबल झाला आणि त्यांने ब्रिटिशांशी तह केला. या तहातील अटी जाचक असूनसुद्धा त्यांने श्रीरंगपट्टणच्या

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

तहावर स्वाक्षरी केली. असे करणे त्याला अपरिहार्यच होते.याबरोबरच 1792 मध्ये तिसरे अँग्लो- म्हैसूर युद्ध संपुष्टात आले.

तहामध्ये जाचक अटी लादून टिपूला दुर्बल बनविण्यात ब्रिटिश यशस्वी झाले. आपले अर्धे राज्य ब्रिटिशांना देणे, युद्धाची नुकसानभरपाई म्हणून तीन कोटी रुपये देणे आणि या पैशाच्या बदल्यात जामीन म्हणून आपले दोन पुत्र ब्रिटिशांकडे ओलीस ठेवणे, आपल्या ताब्यात असणाऱ्या ब्रिटिश सैन्याची तुरुंगातून सुटका करणे इ. तहातील काही अटी होत्या या तहानंतरच ब्रिटिशांनी श्रीरंगपट्टणचा वेढा काढून घेतला.

**चौथे अँग्लो- म्हैसूर युद्ध :** तिसऱ्या युद्धात टिपूने आपला वैयक्तिक पराभव स्वीकारला. ठरवलेली सर्व रक्कम भरून त्यांने आपल्या मुलांची सुटका करून घेतली. कबूल केलेला सर्व प्रदेश ब्रिटिशांना देऊन टाकला. ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली असलेल्या मलबार प्रांतावर टिपूने आपला हक्क सांगितला पण ब्रिटिशांनी तो फेटाळून लावला.

1798 मध्ये लॉर्ड वेलस्ली भारताचा गव्हर्नर जनरल बनला. या दरम्यान टिपूविरोधी कारवाया आणखीनच तीव्र करण्यात आल्या. स्थानिक राज्यकर्त्यांचे टिपूशी असणारे मैत्रीपूर्ण संबंध आणि फ्रेंचांशी असणारी जवळीक यामुळे लॉर्ड वेलस्ली आणखीनच चिडला. फ्रेंचांशी मैत्री करण्यासाठी आणि मदत मिळविण्यासाठी टिपूने आपला राजदूत फ्रान्सला पाठविला, यामुळे ब्रिटिश संतप्त झाले. टिपू आणि फ्रेंचांबरोबर त्याची असणारी मैत्री यामुळे ब्रिटिशांचे भारतातील स्थान डळमळीत होईल की काय? अशी भीती त्यांना वाटू लागली.

यानंतर सहाय्यक सैन्य पद्धत ज्यामध्ये नवीन अटी समाविष्ट होत्या. हा आणखी एक करार स्वीकारण्याची सक्ती टिपूवर करण्यात आली. तथापि टिपुने हे स्वीकारण्यास नकार दिला. ज्यामध्ये अमानवी व अव्यवहारी अटी लादण्यात आल्या होत्या. यामुळेच चौथे अँग्लो म्हैसूर युद्ध सुरू झाले.

हे युद्ध 1799 मध्ये सुरू झाले. ब्रिटिशांनी टिपूचा भक्कम असा श्रीरंगपट्टणचा किल्ला उद्ध्वस्त केला. 1799 मध्ये या युद्धात लढता लढता टिपूचा मृत्यू झाला. टिपूच्या मृत्यूमुळे जणू काही सारा भारतच आपल्या अधिपत्याखाली आल्याचा आनंद ब्रिटिशांना झाला. टिपूच्या ताब्यातील बराचसा प्रदेश ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतला. त्यातील काही

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

भाग मराठे व निजामांना वाटून दिला. एक छोटासा भाग म्हैसूरच्या प्रतिष्ठित वडेयर राजघराण्याला देण्यात आला. हाच भाग पुढे म्हैसूरचे संस्थान म्हणून ओळखला जाऊ लागला.

**टिपूच्या पतनानंतरचे म्हैसूर**




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## धोंडिया वाघ (1800) :

टिपूच्या निधनानंतर कर्नाटकात अनेकांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले. ही सशस्त्र बंडे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पुकारण्यात आली. यापैकी धोंडिया वाघाचे बंड हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

धोंडियाचा जन्म चेन्नगिरीच्या एका मराठा कुटुंबात झाला. त्याच्या शौर्यामुळे त्याला 'वाघ' असे संबोधले जात असे. त्यांने आपल्या कारकिर्दीची सुरुवात हैदर अलीच्या घोडदळात एक सामान्य शिपाई म्हणून केली. आणि आपल्या पराक्रमाने तो 'लष्करप्रमुख'

या पदापर्यंत पोहोचला. नंतर आपले स्वतंत्र सैन्य निर्माण करुन टिपूच्या सैन्यात सेवा बजावली. टिपूशी लढला, टिपूबरोबर मतभेद झाल्यामुळे त्याला कैद करण्यात आले. चौथ्या अँग्लो - म्हैसूर युद्धानंतर ब्रिटिशांनी त्याची तुरुंगातून सुटका केली. त्याने आपली एक छोटीशी सैन्य तुकडी स्थापन केली आणि कारवाया सुरु केल्या. टिपूच्या सैन्यातील असंतुष्ट सैनिक आणि सत्ता नसलेले जहागीरदार यांना त्यांने आपल्या सैन्यात सामावून घेतले. त्यांने बिदनूर व शिवमोगाचे किल्ले काबीज करून चित्रदुर्गचा किल्ला घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. लॉर्ड वेलस्लीने या बंडांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला.

धोंडियाने आपल्या नेतृत्वाखाली शिमोगा, होनाळ्ळी, हरिहर व आणखी काही भागावर हल्ला चढविला. त्याचा पराभव झाला. शिकारीपूर ताब्यात घेतल्यानंतर धोंडिया निजामांच्या अधिपत्याखाली असलेल्या गुत्ती येथे पळाला. जेव्हा निजामांनी गुत्तीवर हल्ला चढविला तेव्हा त्याला मराठ्यांकडे जाणे भाग पडले. मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला करून त्याचे बरेच घोडे, उंट व शस्त्रे ताब्यात घेतली इतके सारे घडूनसुद्धा त्यांने आपले युद्ध सुरूच ठेवले.

अनेक पाळेगारांनी त्याला प्रोत्साहन दिले. मलबारमधील माहे येथील फ्रेंचांनी त्याला मदतीचा हात दिला. हरिहर, चित्रदुर्ग, शिकारीपूर, सावनूर, राणेबेन्नूर, कित्तूर व लोंडा अशा विशाल भूप्रदेशात ब्रिटिश सैन्याने त्याचा पाठलाग केला. शिरहट्टीवर ताबा मिळवून ब्रिटिश सैन्याने धोंडियाच्या अनेक सैनिकांना ठार केले.

**धोंडिया वाघचा अंत :** लॉर्ड वेलस्लीने धोंडिया वाघच्या धाडसी कृत्यांचा शेवट करायचे ठरविले. ब्रिटिशांनी स्थानिक लोकांकडे मदत मागितली. धोंडियाने पुन्हा शिकारीपूर काबीज केले परंतु ब्रिटिशांनी त्याला पुन्हा हुसकावून लावले. तुंगभद्रा आणि मलप्रभाच्या मध्ये धोंडियाच्या ताब्यात असणारा प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला. त्यांनी धोंडियावर सर्व बाजूनी हल्ला चढविला त्यांने रायचूर सोडले. ब्रिटिशांनी त्याचा पाठलाग केला. जेव्हा तो मराठे व निजामाच्या सैन्याच्या मधोमध सापडला. तेव्हा ब्रिटिशांनी येलापरवी जवळ त्याच्यावर हल्ला केला व कोनगल येथे त्याला ठार केले. सेनापतीच्या मृत्यूनंतर धोंडियाचे सर्व सैन्य इकडे तिकडे विखुरले. ब्रिटिशांनी अपार संपत्ती व शस्त्रास्त्रे बळकावली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## कित्तूरचे बंड - वीर राणी चेन्नम्मा (1824)



कित्तूर राणी चेन्नम्मा

मराठे, टिपू व हैदर अलीच्या पराभवानंतर ब्रिटिशांनी प्रशासनामध्ये आमूलाग्र बदल केले. त्यापैकीच एक कायदा म्हणजे दत्तक वारसा नामंजूर हा होय, 1848 मध्ये 'डॉक्टरिन ऑफ लॅप्स' सादर केला असला तरी याआधीही डलहौसीने कोणत्याही कायदेशीर आधाराशिवाय त्यांनी त्याची अंमलबजावणी केली. कित्तूर या धोरणाचा बळी ठरला. याला कित्तूरची राणी चेन्नम्माने कडाडून विरोध केला व स्वतः युद्धाचे नेतृत्व करून ब्रिटिशांविरुद्ध शौर्याने लढा दिला.

कित्तूर हे गाव बेळगाव व धारवाडच्या मधोमध आहे. मल्लसर्जच्या मृत्यूनंतर चेन्नम्माने राज्यकारभारामध्ये लक्ष घालण्यास सुरुवात केली. मल्लसर्जच्या मृत्यूनंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र शिवलिंगरुद्रसर्ज हा गादीवर बसला. त्याच्या तब्येतीच्या तक्रारीमुळे चेन्नम्माला राज्यकारभारात लक्ष घालावे लागे. मराठ्यांबरोबरच्या युद्धात शिवलिंगसर्जाने ब्रिटिशांना पाठिंबा दिला. परिणामतः ब्रिटिशांनी कित्तूरबरोबर तह केला व त्यांच्याकडून खंडणी वसूल केली. हा तह थॉमस मन्रोच्या कारकिर्दीत झाला.

शिवलिंगरुद्रसर्जच्या मृत्यूनंतर चेन्नम्माने शिवलिंगप्पा या मुलाला दत्तक घेतले आणि स्वतः कित्तूरची राणी बनून राज्यकारभार सुरू केला. त्यावेळी थॅकरे हा धारवाडचा जिल्हाधिकारी तसेच ब्रिटिशांचा राजकीय हस्तक म्हणून काम करीत होता. त्याने मुंबईच्या गव्हर्नरला एक अहवाल पाठविला आणि दत्तक वारसा नामंजूर या धोरणाअंतर्गत कित्तूरचे संस्थान खालसा करण्याचा प्रयत्न केला. तसेच कित्तूरचा किल्ला व खजिनाही बळकावण्याचा प्रयत्न केला. चेन्नम्माला युद्ध पुकारणे अनिवार्य होते. तिने युद्धाची तयारी केली. त्या दरम्यान ब्रिटिश सैन्यही युद्धास सज्ज झाले. या युद्धात थॅकरेवर गोळी झाडून त्याला ठार करण्यात आले. बऱ्याच ब्रिटिश सैनिकांना अटक करण्यात आली.

कर्नल डेकच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांनी कित्तूरवर पुन्हा हल्ला चढविला. ब्रिटिश सैन्य त्वेषाने लढले. चेन्नम्माने युद्धभूमीवरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु ती पकडली गेली. चेन्नम्मा व इतर काही लोकांना बैलहोंगलच्या किल्ल्यात डांबून ठेवण्यात आले. राणी चेन्नम्माचा तुरुंगातच मृत्यू झाला. आजही 'एक आदर्श राणी' अशी तिची ख्याती सर्वत्र आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## संगोळ्ळी रायण्णा (1829-30) :



संगोळ्ळी रायण्णा

राणी चेन्नम्माबरोबरच संगोळ्ळी रायण्णाचेही नाव प्रसिद्ध आहे. संगोळ्ळी रायण्णा एक शूर शिपाई होता. तो कित्तूरच्या स्वातंत्र्यासाठी लढला. मातृभूमीला मुक्त करणे हे आपले परमकर्तव्य आहे असे तो मानत असे. राणी चेन्नम्माबरोबरच तोही ब्रिटिशांविरुद्ध शौर्याने लढला. तिच्याबरोबर त्यालाही कैद करण्यात आले. नंतर ब्रिटिशांनी त्याची सुटका केली रायण्णाबद्धल अनेक मौखिक ऐतिहासिक गोष्टीही उपलब्ध आहेत. सैन्याची जमवाजमव करीत त्याने त्यांच्या मनामध्ये राष्ट्रीयत्वाची भावनाही जागृत केली. काही संवेदनशील ठिकाणी त्याने गुप्त सभा घेतल्या. त्याने ब्रिटिशांच्या तालुक्याच्या ठिकाणी असणारे खजिने लुटण्याची योजना आखली होती. त्याच्याकडे पाचशे सैनिकांची तुकडी होती. ब्रिटिशांना मदत करणाऱ्या गावकऱ्यांबद्दल त्यांच्या मनात तीव्र संताप होता. रायण्णाला चेन्नम्मानेच पाठविले आहे अशी ब्रिटिशांची समजूत होती म्हणून त्यांनी चेन्नम्माला बैलहोंगलच्या तुरुंगातून कुसुगलच्या तुरुंगात हलविले.

रायण्णाला पकडण्यासाठी ब्रिटिशांनी एक कुटील कारस्थान रचले. आणि चेन्नम्माच्या विरोधात असणाऱ्या देसाईंना त्यांनी प्रोत्साहन दिले. कृष्णदेवराय नावाच्या अंमलदाराने ब्रिटिशांशी हातमिळवणी केली. अशाप्रकारे कूटनीतीने रायण्णाला पकडून धारवाडला आणण्यात आले. त्याच्या अटकेनंतर त्याच्या बहुतांश सैनिकांनी शरणागती पत्करली. त्याला दोषी ठरवून 1831 मध्ये नंदगड येथे फासावर लटकावण्यात आले. रायण्णाच्या जीवनावर अनेक पोवाडे व लोकगीते गायिली जातात. त्यामुळे आजही तो अमर आहे.

## अमरसुळ्याचे बंड :

हे प्रामुख्याने शेतकऱ्यांचे बंड होते. तसेच कर्नाटकातील (1835-37 या कालावधीत) कोकण किनारपट्टीवरील आणि कोडगू प्रदेशातील राजकीय पार्श्वभूमीवर आधारित होते 1834 मध्ये ब्रिटिशांनी कोडगू राज्याच्या हलेरी घराण्यातील चिक्कवीरराजेंद्रला पदच्युत केले. त्यानंतर बेंगळूरवरून वेल्लोरला आणि त्यानंतर काशीला त्याची रवानगी केली. या

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

घटनेमुळे कोडगूमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. स्वामी अपरांपर, कल्याणस्वामी आणि पुट्टबसप्पा यांनी या विरोधात सशस्त्र बंड पुकारले. कोडगू राज्यातील हलेरी घराण्याचे वंशज असल्याचा दावा या तिघांनी केला. या बंडाचे नेतृत्व स्वामी अपरांपर यांनी केले. 1835 मध्ये त्याला पकडून बेंगळूरमध्ये ठेवले. त्याचप्रमाणे 1837 मध्ये कल्याणस्वामीला पकडून म्हैसूरच्या तुरुंगात ठेवण्यात आले.

**पुट्टबसप्पा :** कल्याणस्वामीच्या निधनानंतर कोडगूच्या खालच्या भागातील लोकांनी बंड चालूच ठेवले. सुळ्या, बेळ्ळार, पुतुर आणि कॅनरातील काही प्रमुख भाग हे अमरसुळ्यामध्येच मोडत असत. पुट्टबसप्पाच्या एका शेतकऱ्यांने स्वतःच कल्याणस्वामी असल्याचे भासविले आणि नंतर स्वामी अपरांपरही आपणच असल्याचे सांगितले. यावरून या बंडाच सामर्थ्य लक्षात येते. या बंडाचे नेतृत्व पुट्टबसप्पा यानेच केले.

हे बंड डोंगराळ भागात सुरू झाले. पुट्टबसप्पा बंडाचे आयोजन करीत असे आणि लोकांना शांत बसवित असे. जर बंडखोर सरकारच्या हाती सत्ता आली तर तंबाखू व मिठावर कर बसविला जाणार नाही. असे त्यांने जाहीर केले. श्रीमंत शेतकरी, जमीनदार व स्थानिक प्रमुखांना याबद्दलची खात्री पटली. वेल्लोरमधील सरकारी कचेरीवर ताबा मिळविणे ही या बंडाची पहिली चाल होती. क्रूरपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या एका अंमलदाराला ठार मारल्याने पुट्टबसप्पाची ख्याती आणखीनच वाढली. या घटनेपासून या बंडाला जास्तच पाठिंबा व प्रसिद्धी मिळाली.

मंगळूर जिंकून घेण्यासाठी बंडखोरांनी तिकडे कूच केले. मंगळूरमधील किल्लयाची बळकटी करण्यामध्ये ब्रिटिश गुंतलेले होते. बंडखोरांनी मंगळूर आणि बंटवाळमार्गे मंगळूरकडे कूच केले. त्यांनी बंटवाळच्या खजिन्याची व तुरुंगाची लुटालूट केली. हे बंड दडपून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी तल्लिचेरी, कन्नानूर आणि बॉम्बेचे सैन्य वाढविले. ही बातमी कानावर पडल्यानंतर पुट्टबसप्पा आणि त्याचे सहकारी सुळ्ळयाकडे वळले. कोडगूमधील लोकांच्या सहाय्याने ब्रिटिशांनी त्यांना पकडले. पुटबसप्पा, लक्ष्मप्पा, बंगारप्पा, केंदबाडी रामय्यागौडा आणि गुड्डेमने अप्पय्या यांना फाशी देण्यात आली. जरी हे बंड अयशस्वी झाले; तरी ब्रिटिश विरोधी झालेल्या बंडामध्ये याला अनन्यसाधारण असे स्थान आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## सुरपूर आणि कोप्पळचे बंड :

### सुरपूर :

हे सध्याच्या यादगीर जिल्ह्यात आहे. मोंगलांचा राजा औरंगजेबपासून हे एक महत्त्वाचे ठिकाण समजले जात होते. हैद्राबादच्या निजामाच्या आणि मराठ्यांच्या कारकिर्दीत ते मांडलिक राज्य बनले. नंतरच्या काळात बराचसा प्रदेश गेला आणि सुरपूर हे एक छोटे राज्य बनून राहिले. वेंकटप्पा नायकाच्या कारकिर्दीत त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले.

**वेंकटप्पा नायक:** वेंकटप्पा, आपले वडील कृष्णा नायकांच्या निधनानंतर गादीवर आला. 1834 मध्ये त्याचा जन्म झाला आणि लहान वयातच तो गादीवर बसला. त्याला कृष्णा नायकाचा भाऊ पेद्दनायक याने विरोध केला. त्यामुळे अंतर्गत कलह निर्माण झाले. ब्रिटिशांनी सुरपूरच्या अंतर्गत बाबतीत हस्तक्षेप केला. सा.श.1842 मध्ये ब्रिटिशांनी मेडोस टेलर याला राजकीय हस्तक म्हणून नेमले आणि सुरपूरवर आधिपत्य मिळविले.

सुधारक असलेल्या टेलरने सुरपूरचा एक संस्थान म्हणून विकास केला. पेद्दनायकची राज्याचा दिवाण म्हणून नेमणूक करण्यात आली. टेलरने राज्यातील जमिनीचे मोजमाप केले. त्यांने अमलात आणलेल्या उपायांमुळे राज्याचा महसूल वाढला त्याने वेंकटप्पा नायकला योग्य शिक्षण देण्यासाठीही अनेक उपाय केले. 1853 मध्ये तो सत्तेवर आला.

**सुरपूरचे बंड :** 1857 मध्ये ब्रिटिश सुरपूरमधील विविध प्रकारच्या सुधारणांवर बारीक लक्ष ठेवून होते. नानासाहेबांचे प्रतिनिधी सुरपूरमध्ये आहेत. हे सरकारच्या लक्षात आले. यामुळे राज्यकर्त्यांच्या मनसुब्याबद्दल त्यांच्या मनात शंका निर्माण झाली. राज्यकर्त्यांच्या हालचाली बद्दल माहिती देण्यासाठी त्यांनी कॅम्पबेल या अधिकाऱ्याची नेमणूक केली. हैद्राबादच्या राजाचे प्रशासन चांगले नसल्याबद्दलचा अहवाल कॅम्पबेलने सरकारला दिला.

वेंकटप्पा नायक हा 1857 च्या बंडातील कर्नाटकातील एक प्रमुख नेता होता असे इतिहासकारांनी नमूद केले आहे. 1858 मध्ये ब्रिटिशांनी सुरपूर काबीज केले. त्यामुळे तेथील राजा हैद्राबादच्या निजामाला आणि ब्रिटिश अधिकाऱ्याला शरण आला. त्याला अटक करून सिकंदराबादच्या तुरुंगात ठेवण्यात आले. वेंकटप्पा नायकाचा मृत्यू कसा झाला याबद्दल मतभेद आहेत.

**कोप्पळचा वीराप्पा:** ब्रिटिश विरोधातील अनेक बंडांपैकी कोप्पळचे बंड एक महत्त्वाचे बंड मानले जाते. कोप्पळ आणि त्याच्या आसपासचा भाग हैद्राबादच्या निजामाच्या आधिपत्याखाली

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

होता. तिथे जमीनदारांचे शोषण केले जात होते. त्यामुळे काही जमीनदार संतप्त झाले आणि त्यांनी निजामाविरुद्ध बंड पुकारले. या बंडखोरांपैकी वीराप्पा हा प्रमुख होता.

वीराप्पा या जमीनदाराने ब्रिटिशांविरुद्ध बंड करून कोप्पळच्या किल्ल्याबरोबरच त्या परिसरातील इतर काही किल्ले काबीज केले त्यामुळे इतर बऱ्याच जमीनदारांनी त्याला पाठिंबा दिला. ब्रिटिशांनी निजामांशी हातमिळवणी करून वीराप्पाला नेस्तनाबूत करण्यासाठी आपले सैन्य पाठविले. वीराप्पाचे सैन्यबळ कमी असल्याने ब्रिटिशांशी लढतानाच तो मरण पावला. ब्रिटिशांनी कोप्पळचा किल्ला पुन्हा आपल्या ताब्यात घेतला. जरी हे बंड छोट्या प्रमाणात असले तरी आपण एक उत्कृष्ट व महान योद्धा असल्याचे वीराप्पाने सिद्ध केले.

## हलगलीच्या बेरडांचे बंड :

हलगली हे बागलकोट जिल्ह्यातील मुधोळ तालुक्यामधील एक छोटेसे खेडे. हे मुधोळ संस्थानाच्या आधिपत्याखाली होते. 1857 मध्ये ब्रिटिशांनी शस्त्रास्त्रांच्या वापरावर बंदी घातली. बेरड लोक त्यांच्या परंपरेनुसार आपल्याजवळ सतत बंदुका व काडतुसे बाळगत असत. ते उत्तम शिकारी होते. जेव्हा त्यांना शस्त्रास्त्रे सरकारकडे जमा करण्याचे आदेश देण्यात आले तेव्हा त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले. मंटूर, बोदानी, अलगुंडी आणि आसपासच्या ठिकाणाचे काही बेरड लोक हलगलीच्या बेरडांना सामील झाले. हे बंड दडपून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी हलगली गावात प्रवेश केला. त्यांनी तेथील बेरडांना अमानुषपणे चिरडून टाकले. तसेच बऱ्याच बंडखोरांना फासावर लटकावले व या बंडाचा शेवट झाला.

> ***तुम्हाला माहित आहे का?***
> *शस्त्रास्त्र प्रतिबंध कायदा:*
> *कोणत्याही भारतीयाला सरकारच्या अनुमती शिवाय शस्त्रे बाळगता येत नव्हती.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा :**

1. पहिले अँग्लो-म्हैसूर युद्ध __________ आणि __________ यांच्यामध्ये झाले.
2. दुसऱ्या अँग्लो-म्हैसुर युद्धाचा शेवट __________ च्या तहाने झाला.
3. राजा वडेयरने __________ ही आपली राजधानी बनविली.
4. कित्तूर राणी चेन्नम्माने __________ नावाचा मुलगा दत्तक घेतला.

5. कित्तूर संस्थानातल्या रायण्णाचे गाव ___________ होय.

6. सुरपूर हे सध्याच्या ___________ जिल्ह्यात आहे.

7. बागलकोट जिल्ह्यातील ___________ गावच्या बेरडांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले.

8. अमरसुळ्याचे बंड हे प्रामुख्याने ___________ यांचे बंड होते.

**II. समूहात चर्चा करून उत्तरे लिहा :**

9. चिक्कदेवराज वडेयरच्या कामगिरीचे वर्णन करा.

10. हैदर अली सत्तेवर कसा आला?

11. दुसऱ्या अँग्लो- म्हैसूर युद्धाचे परिणाम कोणते?

12. श्रीरंगपट्टणच्या तहातील अटी कोणत्या?

13. चौथ्या अँग्लो-म्हैसूर युद्धामुळे म्हैसूरमध्ये ब्रिटिशांची सत्ता बळकट कशी झाली?

14. चौथ्या कृष्णदेवराज वडेयरच्या कामगिरीचे वर्णन करा.

15. ब्रिटिश सत्तेला विरोध करण्याची धोंडिया वाघ यांने कोणती पद्धत अवलंबिली?

16. रायण्णा ब्रिटिशांविरुद्ध कशा पद्धतीने लढला सविस्तरपणे लिहा?

17. स्वातंत्र्य चळवळीत कोडगूच्या पुट्टबसप्पाचे योगदान कोणते?

18. सुरपूरच्या बंडाची थोडक्यात माहिती लिहा.

**III. उपक्रम :**

1. संगोळ्ळी रायण्णाबद्दलची पुस्तके वाचा

2. राणी चेन्नम्माविषयी ऐतिहासिक माहिती गोळा करा.

**IV. प्रकल्प :**

1. सुरपूर येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करून तेथील किल्ल्याचे निरीक्षण करा. तसेच ब्रिटिशकालीन अतिथीगृहांच्या बांधकामाबद्दलचे वैशिष्ट्य समजून घ्या.

2. म्हैसूरच्या राजवाड्याविषयीची माहिती गोळा करा.

***

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण - 5

# सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या चळवळी

C6L1L7

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *ब्राह्मो समाजाची स्थापना व सुधारणा*
- *तरुण बंगाली चळवळ*
- *आर्य समाजाची स्थापना व सुधारणा*
- *प्रार्थना समाजाची सुधारणा*
- *सत्यशोधक समाजाची शिकवण*
- *अलिगढ चळवळ*
- *रामकृष्ण मिशनची शिकवण*
- *थियॉसॉफिकल सोसायटी*
- *नारायण गुरु: धर्मपरिपालम योगम*
- *पेरियार*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

भारताच्या इतिहासात 19वे शतक हा 'भारतीय पुनरुज्जीवनाचा कालखंड' आणि समाज सुधारणेचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात भारतीयांचा पाश्चात्य संस्कृतीशी संबंध आला. परिणामी त्यांना इंग्रजी शिक्षणाचा फायदा झाला. यामुळे भारतीयांमध्ये बुद्धिवाद वाढला. हे सर्वज्ञात आहे की या तर्कशुद्ध वृत्तीने भारतीयांना अंधश्रद्धा आणि त्यांच्या परंपरांमधील विरोधाभासांवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यास प्रवृत्त केले आणि त्यांच्या स्वतःच्या हिताची जाणीव निर्माण केली. तथापि, आधुनिक संशोधकांचे असे मत आहे की ब्रिटिशपूर्व काळात इंग्रजी भाषा माहीत नसतानाही भारतीयांकडे वैज्ञानिक दृष्टिकोन होता आणि ते तर्कसंगत होते.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

*ब्रिटिश आणि भारतीय विद्वान जे पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या विचारांनी प्रभावित झाले होते त्यांनी 19व्या शतकाच्या कालखंडाला पुनरुज्जीवनाचा कालखंड' असे म्हटले आहे.*

पाश्चात्य विचारांनी भारतीयांना लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि राष्ट्रवाद या संकल्पनांची ओळख झाली. पाश्चात्य शिक्षणाने ज्ञानी बनलेल्या व प्रेरित झालेल्यांनी सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. या संदर्भात राजा राम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, महादेव गोविंद रानडे, ज्योतिबा फुले, स्वामी विवेकानंद, ॲनी बेझंट, सय्यद अहमद खान, नारायण गुरु आणि पेरियार यांनी सामाजिक सुधारणे संदर्भात काम केले.

## ब्राह्मो समाज :



राजा राम मोहन रॉय

राम मोहन रॉय हे ब्राह्मो समाजाच्या स्थापनेतील एक महत्त्वाची व्यक्ती होती. त्यांना 'भारतीय पुनरूज्जीवनाचे जनक' म्हणून संबोधले जाते. त्यांनी उत्कृष्ट शिक्षण घेतले होते. संस्कृत, अरबी, पर्शियन, इंग्रजी, फ्रेंच, ग्रीक, लॅटिन अशा अनेक भाषांचे त्यांना उत्तम ज्ञान होते. हिंदू, इस्लाम, सुफी, ख्रिश्चन आणि बौद्ध या धर्माच्या संस्कृतीचा आणि तत्त्वांचा त्यांनी अभ्यास केला होता. राजा राम मोहन रॉय यांनी उपनिषदांचा अभ्यास केला आणि मूर्तीपूजेच्या प्रथेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. भारतीय पुनरूज्जीवनासाठी आधुनिक विज्ञान आणि इंग्रजी शिक्षण आवश्यक आहे, असे मत त्यांनी मांडले. त्यांनी महिलांच्या शोषणाला विरोध केला. सती प्रथा आणि बालविवाहाच्या विरोधात त्यांनी संघटित हल्ला केला. अशा कृत्याबद्दल सनातनी हिंदूंनी त्यांचा निषेध केला. राम मोहन रॉय यांनी लॉर्ड विल्यम बेंटिकने मांडलेल्या सतीबंदी कायद्याचे समर्थन केले. पत्रकारितेतून त्यांनी लोकांमध्ये विवेकवाद रुजवण्याचा प्रयत्न केला. त्या दिशेने त्यांनी 'संवाद कौमुदी' नावाचे बंगाली वृत्तपत्र सुरू केले.

**उपक्रम :**
*बालविवाह निर्मूलनासाठी सरकारने केलेल्या उपाययोजनांची यादी तयार करा.*

19व्या शतकात सामाजिक आणि धार्मिक सुधारणा करण्यामध्ये ब्राह्मो समाज आघाडीवर होता. हिंदू धर्मातील परंपरा आणि चालीरीतींमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न या समाजाने केला. मूर्तिपूजा व अनेक ईश्वरवादाला विरोध केला आणि एकेश्वरवादाला प्रोत्साहन दिले. त्याने यज्ञ आणि विधी यांच्या कामगिरीचा निषेध केला. इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांना पाश्चिमात्य राजकीय विचारांची ओळख झाली, त्यामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाचा विकास होऊ शकला.

## तरुण बंगाली चळवळ :

एकोणिसाव्या शतकात आधुनिकीकरणाची लाट संपूर्ण उत्तर भारतात फिरू लागली. कलकत्ता हे या नव्या विचारांचे केंद्र होते. सा.श.1820 आणि 1830 च्या दरम्यान नवीन हालचाली सुरू झाल्या. ब्राम्हो समाजाचे योगदान आपण आधीच जाणून घेतले आहे. याच काळात तरुण बंगाली चळवळ नावाची दुसरी चळवळ जन्माला आली. ही चळवळ

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

हेन्री व्हिव्हियन डिरोजिओ (सा.श.1809-1831) यांनी सुरू केली. त्यांचे वडील पोर्तुगीज आणि आई भारतीय होती. त्यामुळे डिरोजिओला अँग्लो-इंडियन म्हटले गेले.

डिरोजिओ यांनी कलकत्त्याच्या हिंदू कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. त्यांच्या शिकवणीकडे आकर्षित झालेले त्यांचे अनेक विद्यार्थी त्यांचे निष्ठावंत अनुयायी बनले. युरोपातील विविध चळवळींवर डिरोजिओचा प्रभाव पडला आणि त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या मनात मुक्त विचारांची भावना रुजवण्याचा प्रयत्न केला. पाठ्यपुस्तके तयार करण्याचे कामही त्यांनी केले. नवीन शिक्षण प्रणालीतून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी प्रयत्न केला. यामुळे अनेक परंपरावादी नाराज झाले. त्यांनी पुढे जाऊन 'शैक्षणिक संघटना' (1828) या नावाने चर्चा करण्यासाठी व्यासपीठाची व्यवस्था केली आणि नवीन विचारसरणीला चालना दिली. तरुण बंगाल चळवळीने निसर्ग, मानवतावाद, देव आणि इतर विविध विषयांवर चर्चा आणि वादविवाद आयोजित केले. अंधश्रद्धेने भरलेल्या सामाजिक आचार विचारांमध्ये बुडालेल्या समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे हा एकच मार्ग आहे. असा संदेश पसरवण्याचे काम डिरोजिओने केले. ते महिला हक्कांच्या आणि जातीवर आधारित सरकारच्या भेदभावाला विरोध करणाऱ्या उपाययोजनांचे पुरस्कर्ते होते. हे एक नवीन चळवळीत वाढले, परंतु या चळवळीचा प्रभाव कलकत्ता आणि बंगालच्या काही भागांपुरता मर्यादित होता.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## आर्य समाज :


**स्वामी दयानंद सरस्वती**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना केली. त्यांनी देशभर फिरून व्याख्याने दिली आणि वेद हे सत्य आणि ज्ञानाचे स्त्रोत आहेत यावर भर दिला. या संदर्भात त्यांनी लोकांना 'वेदांकडे परत जा' असा सल्ला दिला. त्यांनी मूर्तिपूजा आणि जातीव्यवस्थेचा निषेध केला. जातीचा निर्णय व्यक्तीच्या जन्मावरून नव्हे तर क्षमतेवर आधारित असावा, असे मत त्यांनी मांडले. त्यांनी विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले. त्यांनी लोकांना स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन केले. सत्यार्थ प्रकाश या पुस्तकात त्यांनी आपली शिकवण मांडली. शुद्धीकरण विधी हा आर्य समाजाचे मुख्य कार्य होते. आर्य समाजाने अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालये स्थापन केली. स्वामी दयानंद सरस्वती यांनी मांडलेल्या स्वराज्य आणि स्वधर्माच्या तत्त्वांनी लोकांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याची प्रेरणा दिली. महान देशभक्त असलेल्या स्वामी दयानंद सरस्वतींनी 'भारत हा भारतीयांसाठी असावा' अशी घोषणा केली.

### तुम्हाला हे माहीत आहे का?

**शुद्धी चळवळ :**

*हिंदू धर्मातील जातीव्यवस्था आणि कठोर कर्मकांडे यामुळे काही लोक इतर धर्माकडे आकर्षित झाले होते. अशा संदिग्ध परिस्थितीतून हिंदू समाजाला एकत्रित करण्याच्या उद्देशाने, दयानंद सरस्वती यांनी वेदांची पुनर्व्याख्या केली आणि जात व लिंग समानतेचा पुरस्कार केला. इतर धर्मात धर्मांतरित झालेल्या सर्वांना हिंदू धर्मात परत आणण्यासाठी त्यांनी शुद्धीकरण चळवळ सुरू केली. जे परत आले त्यांच्यासाठी शुध्दीकरण विधी पार पाडले आणि त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला. अशा प्रकारे त्यांनी हिंदू धर्म मजबूत केला.*

**प्रार्थना समाज :**

प्रार्थना समाजाची स्थापना आत्माराम पांडुरंग यांनी मुंबईत केली. मानवजातीची सेवा म्हणजे ईश्वर सेवा या तत्त्वावर त्याची स्थापना झाली. त्यात शिक्षणाच्या प्रसाराला प्राधान्य दिले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्राचा विकास करण्याचे उद्दिष्ट होते. यात विधवा विवाह, स्त्री साक्षरता, आंतरजातीय विवाह, सर्व जातीच्या लोकांच्या एकत्र जेवणाला प्रोत्साहन दिले. बालविवाह, जातिव्यवस्था, मूर्तीपूजा आणि पडदा पद्धतीला विरोध केला. सर्व धर्म हे सत्याकडे जाणारे मार्ग आहेत आणि त्यामुळे त्यांचा आदर करणे आवश्यक आहे, असे त्यात म्हटले आहे. भारतीय पुनरुज्जीवन काळात अनाथाश्रम, राष्ट्रीय शाळा आणि महिलांसाठी आश्रयगृहे स्थापन करण्यात आली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

महादेव गोविंद रानडे यांनी प्रार्थना समाज लोकप्रिय केला. समाजाच्या सुधारणेशिवाय राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातील प्रगती अशक्य आहे, असे त्यांचे मत होते. त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रचार केला. रानडे हे राष्ट्रीय काँग्रेस पक्षात सक्रिय होते. मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी हायस्कूल सुरू केले.

**सत्यशोधक समाज :**


महात्मा ज्योतिबा फुले

सत्यशोधक समाजाची स्थापना ज्योतिबा फुले यांनी केली. स्वातंत्र्य ही प्रत्येक व्यक्तीची मूलभूत गरज आहे आणि स्वातंत्र्य नसल्यास कोणतीही व्यक्ती आपले विचार व्यक्त करू शकत नाही, असा त्यांचा विश्वास होता. सत्यशोधक समाजाने दारूबंदीसाठी प्रयत्न केले. स्त्री-पुरुष असमानता, मानवी हक्क नाकारणे, लोकांचे शोषण आणि अस्पृश्यतेच्या प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला. त्यातून सामाजिक न्यायाची चळवळ सुरू झाली. ज्योतिराव फुले यांनी मुलींसाठी प्राथमिक शाळा काढली. त्यांनी दलितांसह शूद्र आणि जातीहीन वर्गावर सक्ती केल्या जात असलेल्या गुलामगिरीचा निषेध केला आणि अशा गुलामगिरीसाठी जबाबदार असलेल्या

लोकांचा निषेध केला. समाजव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला.

> **उपक्रम :**
> *कर्नाटक सरकारच्या महिला शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या विविध योजनांबद्दल तुमच्या शिक्षकांकडून जाणून घ्या.*

सत्यशोधक समाजाचा खोलवर प्रभाव असलेल्या शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या अनेक शाखा उघडल्या आणि त्यांचे कार्य चालू ठेवले. त्यातून शेतकऱ्यांच्या वतीने संघर्ष सुरु झाला. फुले यांनी त्यांच्या 'गुलामगिरी' या पुस्तकात शोषणाविषयी सविस्तर लिहिले आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनीही सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून स्त्री शिक्षणासाठी परिश्रम घेतले. पुढे डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्यावर फुलेंच्या तत्त्वांचा प्रभाव पडला.

## अलीगढ चळवळ :



**सर सय्यद अहमद खान**

अलीगढ चळवळीचा उद्देश मुस्लिमांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि तात्विक विश्वासांमध्ये परिवर्तन करुन पौर्वात्य आणि पाश्चात्य विचारांच्या सुसंवादाला चालना देणे हा होता. या चळवळीचे नेतृत्व सर सय्यद अहमद खान यांनी केले. मुस्लिम समाजाला आधुनिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने त्यांनी 'द अँग्लो-ओरिएंटल कॉलेज' सुरू केले. पुढे या महाविद्यालयाचे नामकरण 'अलीगढ मुस्लिम विद्यापीठ' असे करण्यात आले. पाश्चात्य शिक्षणाबरोबरच धार्मिक शिक्षण देणे आणि पाश्चात्य शिक्षणाद्वारे आधुनिक समाजाची निर्मिती करणे हा त्याचा मुख्य उद्देश होता. सर सय्यद अहमद खान हे राष्ट्रीय काँग्रेसच्या बाहेर राहिले आणि त्यांनी मुस्लिम समाजाला एकत्र आणले. त्यांनी स्त्री साक्षरतेचे समर्थन केले. त्यांनी बहुपत्नीत्व आणि विधवाविवाहाच्या विरोधात असलेल्या कल्पनांचा निषेध केला.

## रामकृष्ण मिशन :



**रामकृष्ण परमहंस**

रामकृष्ण परमहंस हे दक्षिणेश्वर काली मंदिराचे पुजारी होते. भारतीय संस्कृतीचा उगम हा त्यांचा विचार होता. त्यांनी सर्व धर्मांना समान मानले. त्यांचा असा विश्वास होता की आध्यात्मिक अनुभूती कोणत्याही धर्मापेक्षा किंवा देवापेक्षा अधिक महत्त्वाची आहे. त्यांचा मूर्तीपूजेवर विश्वास होता. ते नि:स्वार्थी श्रद्धावान व्यक्ती होते. स्वामी विवेकानंद हे त्यांचे आवडते शिष्य होते.

स्वामी विवेकानंदांनी त्यांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या आदर्शांचा, विचारांचा प्रचार करण्यासाठी रामकृष्ण मिशनची स्थापना

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

केली. सर्व धर्मांच्या समानतेचा संदेश पोहोचवणे आणि ते प्रत्यक्षात आणणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश होता. रामकृष्ण आश्रमाच्या जगभरात अनेक शाखा आहेत. प्राचीन, आधुनिक आणि पाश्चात्य विचारवंतांचा संगम इथे पाहायला मिळतो.


**स्वामी विवेकानंद**

स्वामी विवेकानंद हे एक क्रांतिकारी संन्यासी होते. ज्यांनी जीवनातील प्रेमाचे महत्त्व सांगत भारतीयांना जागृत केले. त्यांनी व्यक्तीचे महत्त्व, त्याची उपस्थिती आणि क्षमता यावर जोर दिला. मोक्षप्राप्तीसाठी प्रार्थना आणि योगाभ्यास याशिवाय समाजसेवाही आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. रामकृष्ण मिशन शिक्षण आणि समाजसेवेच्या माध्यमातून संस्कृतीचे संवर्धन करत आहे. विवेकानंदांनी ठणकावून सांगितले की राष्ट्र आणि धर्म या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. गांधीजींसह अनेक राष्ट्रीय नेते विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाने प्रेरित झाले होते. भारताला जातीयवाद, दारिद्र्य आणि निरक्षरतेमधून मुक्त करण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न केला. विवेकानंदांची इच्छा लोकांना शिक्षित करणे हीच होती. सुशिक्षित लोकच समाजात सुधारणा घडवून आणतील असा त्यांचा ठाम विश्वास होता. कायद्याच्या माध्यमातून सामाजिक सुधारणांचे नियम लागू केले पाहिजेत अशी त्यांची अपेक्षा होती. पाश्चिमात्यांचे अंधानुकरण थांबवण्याचे त्यांनी आवाहन केले.

1893 मध्ये शिकागो येथे झालेल्या जागतिक धर्म परिषदेत, स्वामी विवेकानंदांनी सर्व धर्माबद्दल सहिष्णुतेचा पुरस्कार करून आणि सर्व धर्म सत्य आहेत हे सांगून भारताच्या महानतेचे समर्थन केले. या पद्धतीने त्यांनी भारतीय संस्कृतीची ओळख जगाला करून दिली. तरुणांसाठी ते आदर्श होते.

**थिऑसॉफिकल सोसायटी :**

थिऑसॉफिकल सोसायटीचे (ब्रह्म विद्या समाज) संस्थापक मादाम ब्लाव्हाटस्की आणि कर्नल एच. एस. ऑलकॉट होते. या समाजाची स्थापना विश्वबंधुत्वाची स्थापना, विचारधारेचा तुलनात्मक अभ्यास आणि नैसर्गिक तत्त्वांचा शोध आणि व्यक्तीची सुप्त ऊर्जा या तत्त्वांवर झाली.


**ॲनी बेझंट**

ॲनी बेझंट या आयरिश महिलेने भारतात थिऑसॉफिकल सोसायटीचे उपक्रम सुरू केले आणि त्याला नवे चैतन्य दिले. तिने आपल्या व्याख्यानातून भारतीय संस्कृतीचा अभिमान जागविला. समाजात समता, वैश्विक बंधुता आणि एकोपा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. ॲनी बेझंट यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला पूर्ण पाठिंबा दिला. तिने 'न्यू इंडिया' नावाचे वृत्तपत्र सुरु केले. 1916 मध्ये तिने होमरुल चळवळ सुरू केली. 1917 च्या काँग्रेस अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. भारतीय तत्त्वज्ञान व स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी मोठे योगदान दिले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

**होमरुल :** *आयर्लंड ब्रिटनच्या ताब्यात होता. आयरिश लोकांनी त्यांच्या देशाचा कारभार स्वतः चालवण्याचा अधिकार मिळविण्यासाठी होमरुल चळवळ सुरू केली. याचा प्रभाव पडून ॲनी बेझंटनी भारतातही ही चळवळ सुरू केली. 1916 मध्ये दोन होमरूल लीग अस्तित्वात आल्या. एक टिळकांच्या नेतृत्वाखाली सुरू झाली. त्याचे केंद्र पुणे होते. महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक, मध्य प्रांत आणि बेरार भागात तिच्या शाखा होत्या. दुसरी चळवळ ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाली आणि त्याचे केंद्र मद्रास होते. टिळकांनी 'मराठा' आणि 'केसरी' ही वृत्तपत्रे काढली, तर ॲनी बेझंट यांनी न्यू इंडिया' आणि 'कॉमनविल' ही वृत्तपत्रे त्यांच्या कल्पनांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी सुरू केली.*

## श्री नारायण गुरु धर्म परिपालन योगम् :


**श्री नारायण गुरु**

1903 मध्ये श्री नारायण गुरु यांनी प्रबोधनाची चळवळ सुरू केली. यांचा जन्म केरळमधील चेंबळांती/चेंबळंडी या खेड्यात झाला. मागासलेल्या व पिळवणूकग्रस्त जमातींना सक्षम करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. नाराणगुरू (1854-1928) अणि त्यांचे सहकारी पटापू आणि कुमारन आसन यांनी या चळवळींचे नेतृत्व केले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

केरळ मध्ये जातीभेदाची समस्या मोठया प्रमाणात होती. मागासलेल्या व दलित सम ाजातील लोकांवर अनेक सामाजिक निर्बंध लादलेले होते. त्याकाळात या समाजातील लोकांना विहिरीतील पाणी वापरण्यास मनाई होती. रस्त्यावर फिरणे, चप्पल घालणे, मंदिरात प्रवेश यावर बंदी होती. महिलांच्या वेशभूषेवरही निर्बंध होते. शाळांमध्ये त्यांना प्रवेश मिळत नव्हता या जमातीतील लोकाना कनिष्ठ मूलभूत हक्क नव्हते. त्यामुळे त्यांचा कोंडमारा होत असे. या जमातीच्या उद्धारासाठी नारायण गुरु यांनी 'धर्म परिपालन योगम' नावाची संस्था स्थापन केली.

सर्वांना प्रतिष्ठेने जीवन जगता यावे हा या संघटनेचा उद्देश होता. सर्वांसाठी 'एकच जात, एकच धर्म व एकच परमेश्वर' हे त्यांच्या चळवळीचे ब्रीदवाक्य होते. हे साध्य करण्यासाठी त्यांनी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे असे जाहीर केले. मागासलेल्या जमातींना मंदिरात प्रवेश नव्हता म्हणून त्यांनी पर्यायी मंदिर बांधले.

1924 मध्ये नारायण गुरु व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'वैकम सत्याग्रह' नावाची मंदिर प्रवेश चळवळ सुरु केली या चळवळीमध्ये महात्मा गांधी व 'आत्मगौरव चळवळीचे' प्रवर्तक पेरियार यांनी सहभाग घेतला होता. 'गुरु वायूर मंदिर प्रवेश चळवळ' ही एक यातील महत्वाची घटना होय.

**पेरियार :**

विसाव्या शतकातील प्रारंभीच्या काळात ब्राम्हणेत्तर चळवळ नावाची एक नवीन चळवळ दक्षिण भारतात सुरु झाली. बहुसंख्याक असलेल्या ब्राम्हणेतरांनी आपल्या लोकांना सरकारी क्षेत्रात लोकसंख्येवर आधारित संधी व प्रतिनिधित्व मिळावे यासाठी ही चळवळ सुरू केली. कर्नाटक व इतर विविध राज्यात ही एक प्रमुख चळवळ मानली गेली. ब्राम्हणेत्तर समुदायातील लोक आपल्यावर लादलेल्या सामाजिक निर्बंधाचा विरोध करू लागले.


**पेरियार**

ब्रिटीशांनी 1870 मध्ये केलेल्या जनगणनेच्या अहवालानुसार ब्राम्हणेत्तरांना आपल्या लोकसंख्येबद्दल कल्पना आली. 1916 मध्ये तामिळनाडू येथे सुरू झालेल्या 'जस्टीस पार्टी'ने ही चळवळ पुढे चालू ठेवली.

जस्टीस पार्टीच्याद्वारे ब्राम्हणेत्तर चळवळीस नवीन वळण मिळाले. या चळवळीने काही क्रांतीकारक पावले उचलली व इ.व्ही. रामस्वामी नायकर यांच्या नेतृत्वाखाली 'आत्मगौरव चळवळ' नावाची नवीन चळवळ आस्तित्वात आली. 1925 मध्ये काँग्रेसपक्षातून बाहेर पडलेल्या रामस्वामी यांनी 1926 मध्ये आत्मगौरव चळवळ (Self respect movement) सुरु केली. लोक त्यांना आदराने पेरियार (ज्येष्ठ व्यक्ती) असे म्हणू लागले. पेरियार यांचा जन्म तामिळनाडूतील 'ईरोडी' येथील एका श्रीमंत कुटुंबात झाला. काँग्रेस पक्ष हा वर्णाश्रम पद्धतीच्या बाजूने आहे. म्हणून त्याला पर्याय म्हणून 'द्राविड वांशिक ओळख' या नावाने नवीन चळवळ सुरू केली. आर्य, ब्राम्हण यांचे श्रेष्ठत्व सांगणाऱ्या विचारांना त्यांनी विरोध केला. तामिळ भाषा ही द्राविड भाषा आहे. असे त्यांचे मत होते. संस्कृत भाषा व साहित्याला त्यांनी विरोध केला. जातिभेद व लिंगभेद यांना विरोध करून समानतेचा पुरस्कार केला. 1924 मध्ये केरळमधील 'वैकम' येथे अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून चळवळ केली. 1939 मध्ये ते जस्टीस पक्षाचे अध्यक्ष झाले. 'द्राविड कळघम' नावाची संघटना सुरू करून जस्टीस नावाचे नियतकालिक सुरू केले. आजही तामिळनाडूतील राजकीय क्षेत्रात पेरियारांचे नाव आदर्शाचे प्रतीक म्हणून आदराने घेतले जाते. आजही राजकीय पक्ष आपल्या पक्षाच्या नावाच्या सुरुवातीस द्रवीड हा शब्द जोडतात. यावरून त्यांचे महत्व कळून येते. आयोथीदास, टी. एम्. नायर इत्यादिंनी सुरू केलेल्या आदर्शवादी ब्राम्हणेत्तर चळवळीचे रूपांतर पेरियार यांनी सांस्कृतिक चळवळीमध्ये केले. पिळवणूक मुक्त समाज, जातीभेद, लिंगभेदरहित सर्वधर्म सहिष्णुतेवर आधारित समाजाची रचना व्हावी हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा :**

1. 19 व्या शतकाला ___________ चा काळ म्हणतात.
2. राजा राम मोहन रॉय यांनी ___________ हे वृत्तपत्र सुरु केले.
3. प्रार्थना समाजाचे संस्थापक ___________ होते.
4. _____ यांनी स्वातंत्र्य ही प्रत्येक व्यक्तीची मूलभूत गरज असल्याचा प्रचार केला
5. स्वामी विवेकानंदांचे गुरू ___________ होते.
6. तरून बंगाली चळवळ ___________ यांनी सुरू केली.

**II. प्रश्नांची उत्तरे लिहा :**

7. ब्राह्मो समाजाची शिकवण कोणती ?
8. 'वेदांकडे परत चला' या दयानंद सरस्वतींच्या विधानाचे विश्लेषण करा.
9. सत्यशोधक समाजाने प्रतिपादन केलेल्या सुधारणांचे विवरण करा.
10. अलीगढ चळवळीच्या उद्देशांचे विश्लेषण करा.
11. रामकृष्ण मिशनची उद्दिष्टे स्पष्ट करा.
12. स्वामी विवेकानंद हे तरुणांचे प्रेरणास्थान होते. स्पष्ट करा.
13. ॲनी बेझंटनी कोणत्या सुधारणा केल्या ?
14. 'श्री नारायणगुरु धर्मपरिपालन योगम्' या संघटनेचे योगदान कोणते?
15. डिरोजिओ यांचे तरुण बंगाली चळवळीतील योगदान स्पष्ट करा.
16. पेरियार चळवळीतील प्रमुख घटनांची यादी करा.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**III. उपक्रम :**

1. रामकृष्ण आश्रमाला भेट द्या आणि स्वामी विवेकानंदांच्या विचारांची माहिती गोळा करा.

**IV. प्रकल्प :**

1. ग्रंथालयांना भेट द्या आणि सामाजिक सुधारणांची पुस्तके वाचा. तुमच्या शिक्षकांच्या मदतीने या विषयावरील माहिती इंटरनेटवरून गोळा करा.
2. सामाजिक सुधारणेसाठी काम करणाया संस्थांबद्दल तुमच्या शिक्षकांकडून जाणून घ्या.

***

प्रकरण - 6

# सार्वजनिक प्रशासन - एक परिचय

F5R8S6

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *सार्वजनिक प्रशासनाची व्याप्ती आणि महत्व.*
- *अर्थ आणि भरतीच्या पद्धती.*
- *केंद्रीय लोकसेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोग.*
- *कर्नाटक लोकसेवा आयोग.*
- *कायदा आणि सुव्यवस्था*

**सार्वजनिक प्रशासन :**

आधुनिक समाजात जटिल आणि जलद बदल होत असल्याने सार्वजनिक प्रशासनाला महत्व प्राप्त झाले आहे. सार्वजनिक प्रशासनाच्या फायद्यांची जाणीव आणि महत्व समाजाला दिवसेंदिवस कळत आहे. जुन्या काळापासून मानव प्रशासनामध्ये प्रयोग करत आला आहे. परंतु सार्वजनिक प्रशासनाच्या अभ्यासाचा विकास विशेषत: अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामध्ये, सुरू झाला. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांना 'सार्वजनिक प्रशासनाचे पितामह' म्हणून संबोधले जाते. सध्या सार्वजनिक प्रशासन हा जगातील सर्व राष्ट्रांमध्ये महत्वाचा विषय म्हणून उदयास येत आहे.

**अर्थ आणि व्याख्याः** मराठी शब्द प्रशासन हा इंग्रजी शब्द एडमिनिस्ट्रेशन (Administration) या शब्दाचे भाषांतर आहे. Administration हा शब्द ''Ad'' आणि Ministraire या दोन लॅटिन शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ सेवा करणे, काळजी घेणे, देखरेख करणे, राज्यकारभार व्यवस्थापित करणे असा होतो. म्हणून प्रशासन म्हणजे लोकांची सेवा करणे, लोकांची काळजी घेणे आणि लोकांच्या समस्यांचे व्यवस्थापन करण्याची प्रक्रिया होय.

सार्वजनिक प्रशासन हा प्रशासनाच्या विस्तृत क्षेत्राचा निश्चित भाग आहे. पब्लिक हा शब्द सरकार चा (Government) देखील संदर्भ देतो सार्वजनिक प्रशासन हा शब्द प्रथम अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी 1812 मध्ये वापरला होता. नंतर अनेक विचारवंतांनी त्यांच्या स्वत:च्या पद्धतीने सार्वजनिक प्रशासनाची व्याख्या केली.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**व्याख्या :**

1) वुड्रो विल्सनच्या मते ''सार्वजनिक प्रशासन म्हणजे कायद्याची सर्वसमावेशक अंमलबजावणी''.

2) पिफनरच्या मते ''सार्वजनिक प्रशासन हे सार्वजनिक धोरण राबविण्यासाठी सामूहिक प्रयत्न आणि समन्वय यांचे संयोजन आहे''.

3) ल्यूथर गिलिकच्या मते, ''सार्वजनिक प्रशासन कार्यकारी शाखेशी संबंधित आहे, जी सरकारची कार्ये पार पाडते''.

4) एफ.ए.मार्क्सच्या मते, ''सार्वजनिक प्रशासन म्हणजे व्यक्तींच्या गोष्टी आणि पद्धतींचा पद्धतशीर समन्वय होय''.

एकूणच सार्वजनिक प्रशासन हे राज्याच्या दैनंदिन व्यवहार चालवणाऱ्या सरकारच्या एकात्मिक कार्याशी संबंधित आहे.

## सार्वजनिक प्रशासनाचे महत्व :

राजाची भूमिका प्रजेला संरक्षण देणे इथपर्यंतच मर्यादित होती, परंतू सध्याची राज्ये कल्याणकारी योजना राबवून राज्यांमध्ये सर्वांगीण विकास साधण्यासाठी सार्वजनिक प्रशासनाचे महत्व वाढवत आहे. मानवाचे आणि मानवी समाजाचे अस्तित्व सार्वजनिक प्रशासनावर अवलंबून आहे. हे राज्य व्यवस्थेचे हृदय आहे सार्वजनिक प्रशासनाशिवाय राज्याची कल्पना अशक्य आहे. तेथे आधुनिक राज्ये प्रशासकीय राज्ये मानली जातात. खालील बाबी सार्वजनिक प्रशासनाचे महत्व दर्शवतात.

**1. सार्वजनिक प्रशासन हा सरकारचा आधारस्तंभ आहे :** एखाद्या राज्यात विधिमंडळ आणि न्यायपालिका नसलेल्या सरकारची कल्पना करू शकते, परंतू प्रशासना (कार्यकारी) शिवाय सरकार किंवा राज्याची कल्पना करणे अशक्य आहे. सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व देशांमध्ये प्रशासकीय यंत्रणा आवश्यक आहे. म्हणून पाल एच्. ॲपल्बे यांनी आपले मत व्यक्त केले की ''प्रशासनाशिवाय सरकार हे फक्त एक बडबड आहे.''

**2. सार्वजनिक हितांचे रक्षण करण्यासाठी सेवा देणे :** सार्वजनिक प्रशासन व्यक्तिच्या ज़ान्मापासून मृत्यूपर्यंत सेवा पुरवते. कायदा आणि सुव्यवस्था राखणे, जीवन आणि मालमत्तेचे संरक्षण, न्याय, शिक्षण, रोजगार, जीवनावश्यक वस्तू आणि इतर सेवा प्रदान करणे. हे राष्ट्रीय संरक्षण आणि आर्थिक समानता आणण्यासाठी जबाबदार आहे.

NOT TO BE REPUBLISHED
©KTBS

**3. कायद्याची आणि धोरणांची अंमलबजावणी :** सार्वजनिक प्रशासन समाजातील लोकांच्या कार्यांचे नियमन करण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कायदे आणि धोरणे लागू किंवा अंमलात आणते. सार्वजनिक प्रशासन योग्यरीऱ्या किंवा प्रभावीपणे काम करत नसेल तर सरकारची धोरणे केवळ कागदावरच्या घोषणाच राहतात.

**4. सामर्थ्य आणि सामाजिक सुरक्षा:** समाजामध्ये विविध सामाजिक आणि आर्थिक वर्गातील लोकांचा समावेश असतो, समाजातील गरीब आणि दुर्बलांचे कल्याण करणे ही राज्य सरकारचे आणि प्रशासन संस्थांचीही जबाबदारी असते. गरीब, महिला, मुले, आदिवासी, अपंग, ज्येष्ठ नागरिक, अनाथ आणि निराधार अशा अनेक लोकांसाठी सरकारचे सामाजिक आणि आर्थिक पाठबळ आवश्यक आहे. सामाजिक सुरक्षा धोरणे ही त्यांच्या समृद्धीसाठी सरकारने राबवलेल्या योजना आहेत. उदा: विधवा, ज्येष्ठ नागरिक, अपंग लोकांसाठी मासिक वेतन, बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्यासाठी राबविण्यात आलेला युवा निधी आणि दारिद्र्यरेषेखालील लोकांना अन्न सुरक्षा देण्यासाठी राबविण्यात आलेला राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (NFSM) ही सामाजिक सुरक्षा धोरणाची उत्तम उदाहरणे आहेत. समाजातील गरजू सदस्यांना सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सार्वजनिक प्रशासन अशा धोरणांची अंमलबजावणी करते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**5. कायदेमंडळ तसेच कार्यकारिणीला सहाय्य करते :** सार्वजनिक प्रशासन कायदेमंडळाने लागू केलेले कायदे आणि कार्यकारिणीने लागू केलेले सार्वजनिक धोरण योजनांची अंमलबजावणी करते. त्यांच्या सादरीकरणासाठीही, सार्वजनिक प्रशासन स्वतः आवश्यक आकडेवारी आणि माहिती प्रदान करते.

अशा प्रकारे सार्वजनिक प्रशासन धोरणाच्या अंमलबजावणीसह सार्वजनिक धोरण तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावते. योजलेल्या कायद्यांचा मसुदा आणि कायद्यासाठी आवश्यक तपशील भरण्यास मदत करते.

**सार्वजनिक प्रशासनाची व्याप्ती:** सार्वजनिक प्रशासनाच्या व्याप्तीबद्दल विचारवंतांमध्ये मतभेद आहेत. वुड्रो विल्सन, एल.डी. व्हाईट इत्यादींनी सार्वजनिक प्रशासनाच्या सर्वांगीण दृष्टिकोनाचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मते, सार्वजनिक प्रशासनाच्या अभ्यासामध्ये शासकांग, कार्यांग आणि न्यायांग या सरकारच्या तीन शाखांच्या सर्व कार्यांचा समावेश होतो.

ल्यूथर गुलिक, हर्बर्ट ए. सायमन इत्यादींनी सार्वजनिक प्रशासनाच्या संकुचित दृष्टिकोनाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते सार्वजनिक प्रशासनाची व्याप्ती केवळ सरकारच्या कार्यकारी शाखेच्या कार्यापुरती मर्यादित आहे.

**POSD CoRB चा दृष्टिकोन:** ल्यूथर गुलिक यांनी या शब्दात सार्वजनिक प्रशासनाची व्याप्ती दर्शविली आहे. इंग्रजी शब्दाचे प्रत्येक अक्षर सार्वजनिक प्रशासनाच्या कार्याचा संदर्भ दिला आहे.

1) **P–(Planning)** (नियोजन): सरकारी कार्यासाठी योजना तयार करा आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी कार्यरत रहा.

2) **O–(Organising)** (संघटन): अभिप्रेत उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विभाग, म हानगर पालिका, पंचायतराज इत्यादी प्रशासकीय यंत्रणा तयार करणे व करावयाच्या कार्यांचे नियोजन करणे आणि विविध विभागांना वाटून देणे.

3) **S–(Staffing)**(कर्मचारी): प्रशासकीय कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती, प्रशिक्षण आणि सेवा निश्चित करणे.

4) **D–(Directing)**(निर्देशन): शासनाच्या विविध विभागांना वेळोवेळी आदेश आणि निर्देश जारी करणे आणि निर्णय घेणे.

5) **Co–(Co-ordinating)** (समन्वय साधणे): संघर्ष आणि मतभेद दूर करून सरकारच्या विविध विभागांच्या कामकाजात समन्वय साधणे.

6) **R–(Reporting)** (अहवाल देणे): अधिकाऱ्यांकडून वरिष्ठांना त्यांच्या विभागांच्या कार्याचा अहवाल देणे आणि कागदपत्रे, संशोधन आणि तपासणीद्वारे विधिमंडळाला अहवाल देणे.

7) **B–(Budgeting)** (अंदाजपत्रक): आर्थिक नियोजन, अंदाजपत्रक, गणना, लेखापरीक्षण इत्यादींचे व्यवस्थापन.

ही सर्व कार्ये सार्वजनिक प्रशासनाच्या कार्यक्षेत्राची माहिती देतात.

### भरती (Recruitment) :

सार्वजनिक प्रशासनाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्षम कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. या कर्मचाऱ्यांची निवड पद्धतशीरपणे करणे आवश्यक आहे. जेणेकरून भरती ही योग्य

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

पदांसाठी योग्य व्यक्तींची निवड करण्याची प्रक्रिया आहे. उत्तम आणि कार्यक्षम सार्वजनिक प्रशासन व्यवस्था ही भरती आणि निवड प्रक्रियेवर अवलंबून असते. जेव्हा पात्र, कार्यक्षम आणि प्रामाणिक लोकांना प्रशासनावर नियुक्त केले जाते तेव्हा ते सक्रिय, हुशार असतात आणि सार्वजनिक प्रशासन योग्य पद्धतीने चालवतात.

कर्मचाऱ्यांची भरती ही व्यवस्थापनामध्ये अत्यंत महत्वाची आहे. ओ.ग्लेन स्टॉल (O Glenn Stahl) हे असे म्हणतात, ''भरती हा सरकार रचनेचा पाया आहे''.

**भरतीचे प्रकार :**

**अ) प्रत्यक्ष भरती ब) अप्रत्यक्ष भरती (पदोन्नती/पदोन्नतीद्वारे भरती)**

**प्रत्यक्ष भरती :** प्रत्यक्ष भरतीला थेट भरती असेही म्हणतात. प्रत्यक्ष भरती ही एक लोकप्रिय आणि वैज्ञानिक पद्धत आहे. स्पर्धा परीक्षांद्वारे पात्र उमेदवारांची निवड करणे म्हणजे प्रत्यक्ष भरती होय. प्रत्यक्ष भरतीद्वारे सेवेत सामील होणाऱ्या उमेदवारांकडे काही सामान्य आणि विशेष पात्रता असणे आवश्यक आहे. उदा. नागरी सेवांमध्ये भरती.

**अप्रत्यक्ष भरती :** अप्रत्यक्ष भरतीला अंतर्गत भरती असेही म्हणतात. अप्रत्यक्ष भरती म्हणजे सरकारी सेवेत असलेल्या लोकांना त्यांच्या पत्रता आणि ज्येष्ठतेच्या आधारावर उच्च पदांवर नियुक्त करणे. पदोन्नती आणि पदोन्नती भरती पद्धत हीच आहे. अशा पद्धतीचा अवलंब सर्वच देशांमध्ये केला जातो. ही व्यवस्था भारतातही लागू आहे.

**केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC - Union Public Service Commission) :**

केंद्रीय लोकसेवा आयोग ही संविधानाच्या कलम 315 नुसार स्थापन केलेली एक घटनात्मक संस्था आहे. या आयोगात एक अध्यक्ष आणि 10 सदस्य असतात. त्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. एखाद्या सदस्याचा पदाचा कार्यकाळ नियुक्तीच्या तारखेपासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्याचे वय 65 वर्षे पूर्ण झाल्यावर यापैकी जे आधी असेल ते ग्राह्य धरले जाते. राष्ट्रपतींना केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांना गैरवर्तन कारणावरून बडतर्फ करण्याचा अधिकार आहे. कायदेमंडळ आणि कार्यकारिणीच्या हस्तक्षेपाशिवाय आयोग स्वतंत्रपणे काम करतो. आयोगात एक सचिव देखील कार्यरत असतो.केंद्रीय लोकसेवा आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**कार्ये : घटनेच्या कलम 320 अन्वये आयोगाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत :**

1. केंद्र सरकारमधील गट अ आणि ब पदांसाठी भरतीसाठी स्पर्धा परीक्षांचे आयोजन करणे.
2. थेट भरतीसाठी व्यक्तिमत्व चाचणी आयोजित करणे.
3. विविध पदांवर पदोन्नती आणि बदलीसाठी अनुसरण करावयाच्या क्रमांचा सरकारला सल्ला देणे.
4. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध पदांवरील अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत सरकारला सल्ला देणे.
5. राष्ट्रपतींच्या सूचनेनुसार कोणत्याही विषयावर सरकारला सल्ला देणे.

आयोग राष्ट्रीय स्तरावर नागरी सेवा, तांत्रिक सेवा, वैद्यकीय सेवा आणि संरक्षण सेवांमध्ये भरतीसाठी स्पर्धात्मक परीक्षा आणि व्यक्तिमत्व चाचणी आयोजित करतो. याम ध्ये नागरी सेवा (सिव्हिल सर्व्हिस) साठी घेण्यात येणारी परीक्षा महत्वाची आहे. भारतीय प्रशासकीय सेवा I.A.S.(Indian administrative Service), भारतीय पोलीस सेवा I.P.S. (Indian Police Service). भारतीय वन सेवा IFOS (Indian Forest Service), भारतीय परराष्ट्र सेवा IFS (Indian Foreign Service), भारतीय महसूल सेवा IRS (Indian Revenue Service), भारतीय लेखापरीक्षण आणि लेखा पत्र सेवा (Indian Audit and Accounts Service) यासारख्या नागरी सेवा महत्वाच्या आहेत.

वरील सेवांच्या भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे तीन टप्पे असतात.

1. प्राथमिक परीक्षा
2. मुख्य परीक्षा
3. व्यक्तिमत्व चाचणी (मुलाखत)

**राज्य लोकसेवा आयोग (SPSC - State Public Service Commission) :**

राज्यघटनेच्या कलम 315 नुसार राज्यांमध्ये राज्य लोकसेवा आयोग तसेच केंद्रात केंद्रीय लोकसेवा आयोग अस्तित आहेत. या घटनात्मक संस्था आहेत. तसेच दोन आणि दोनपेक्षा जास्त राज्यांसाठी संयुक्त राज्य लोकसेवा आयोग (JSPSC-Joint State Public Service Commission) देखील अस्तित्वात आहे. पण संयुक्त लोकसेवा आयोग ही घटनात्मक संस्था नाही, त्या वैधानिक संस्था आहेत. (KPSC - कर्नाटक लोकसेवा आयोग)

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**कर्नाटक लोकसेवा आयोग (KPSC - Karnataka Public Service Commission):**

आयोगाची स्थापना 18 मे 1951 रोजी घटनेच्या कलम 315 अंतर्गत करण्यात आली आहे. आयोगामध्ये सध्या एक अध्यक्ष आणि 15 सदस्य आहेत. त्यांची नियुक्ती राज्यपाल करतात. त्यांचा कार्यकाल नियुक्तीच्या तारखेपासून सहा वर्षांचा असेल किंवा वयाच्या 62 व्या वर्षापर्यंत, यापैकी जे आधी असेल त्यावेळी सदस्यत्वाची मुदत संपुष्टात येईल. आयोगाचे मुख्य कार्यालय बंगळुरू येथे असून म्हैसूर, बेळगावी, कलबुर्गी आणि शिमोगा येथे प्रादेशिक कार्यालये आहेत.

आयोगाचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज पाहण्यासाठी एक सचिव आणि परीक्षांचे कामकाज पाहण्यासाठी एक परीक्षा नियंक असतो.

**कार्य :**

1. राज्य सरकारी सेवेत स्पर्धा परीक्षा आणि वैयक्तिक परीक्षेद्वारे राजपत्रित अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि स्पर्धा परीक्षांद्वारे अराजपत्रित कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. उदा: उपविभागीय अधिकारी, संरक्षक उपअधीक्षक, तहसीलदार, प्रथम दर्जा सहायक व अबकारी उपनिरिक्षक इत्यादी.
2. ठराविक पदांसाठी नियुक्त केलेल्या उमेदवारांची व्यक्तिमत्व चाचणी घेणे.
3. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वर्षातून दोनवेळा विभागीय परीक्षा घेणे.
4. शिस्तबद्ध आणि पदोन्नती प्रकरणांवर सरकारला सल्ला देणे.
5. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन करणे.

**कायदा आणि सुव्यवस्था :** देशाच्या सुख, शांती, एकता आणि विकासासाठी कायदा व सुव्यवस्था आवश्यक आहे. आजच्या वेगाने वाढणाऱ्या समाजात कायदा आणि सुव्यवस्थेला खूप महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. कायदा आणि सुव्यवस्था या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सर्वांच्या संरक्षणासाठी कायद्याचे राज्य आवश्यक आहे. राज्यघटनेच्या 7 व्या अधिसूचनेनुसार कायदा व सुव्यवस्थेचा उल्लेख राज्याच्या यादीत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखणे हे राज्याचे प्रमुख कर्तव्य आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यांना निर्देश देण्याचा घटनात्मक अधिकार केंद्र सरकारकडे आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**केंद्र सरकारची भूमिका :** कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची केंद्र सरकारची जबाबदारी राज्यघटनेच्या अनेक कलमांमध्ये नमूद करण्यात आली आहे. उदा. घटनेचे कलम 355 राज्यांना बाह्य आक्रमणापासून संरक्षण देते. घटनेच्या कलम 356 मध्ये राज्यामध्ये घटनात्मक शासन अपयशी ठरल्यास आणीबाणी किंवा राष्ट्रपती राजवट लागू करण्याची तरतूद आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयाकडे सार्वजनिक सुरक्षा व्यवस्था प्रदान करण्यासाठी सशस्त्र दल अस्तित्वात आहे. ज्यामुळे ते कायदा आणि सुव्यवस्थेसाठी जबाबदार आहे.

1) **केंद्रीय राखीव पोलीस दल** (CRPF-Central Reserve Police Force): हे दल राज्य पोलीस दलांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, बंडखोरी दडपण्यासाठी आणि देशाच्या कोणत्याही भागात नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत कार्य हाती घेण्यास मदत करते.

2) **बॉर्डर सिक्युरिटी फोर्स** (BSF-Border Security Force): भारत आणि पाकिस्तानच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी आणि सीमेच्या या भागांमध्ये गुन्हेगारी कारवाया रोखण्यासाठी या सीमा सुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली आहे.

3) **रेल्वे संरक्षण दल** (RPF-Railway Protection Force): रेल्वे प्रवाशांचे संरक्षण करणे, रेल्वे गुन्ह्यांना प्रतिबंध घालणे, त्याचा तपास करणे आणि रेल्वे ट्रॅकसारख्या रेल्वेशी संबंधित मालमत्तेचे संरक्षण करते.

4) **केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल** (CISF-Central Industrial Security Force) : भारत सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील मोठ्या औद्योगिक उपक्रमांसाठी, विमानतळे, बंदरे, नोटा मुद्रनालय आणि नाणे टंकसाळा सारख्या संस्थांना सुरक्षा प्रदान करते.

केंद्र सरकार देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात आपल्या विविध संस्थांच्या सहकार्यातून महत्वाची जबाबदारी पार पाडते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांना माहिती व मार्गदर्शन करुन संबंधित विभागांमार्फत सातत्याने मदत पुरवते.

**राज्य पोलीस यंत्रणेची भूमिका**

शांतता व सुव्यवस्था राखणे ही राज्य सरकाराची प्राथमिक जबाबदारी आहे. राज्यांमध्ये त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी एक कार्यकारी मंडळ आणि सल्लागार मंडळ पोलिस प्रशासनात असते. राज्यांमध्ये पोलीस खाते राज्याच्या गृहमंत्र्यांच्या अखत्यारीत

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

असते. राज्याचे गृहमंत्री पोलिस प्रशासनासाठी जबाबदार असतात. गृह सचिव हे भारतीय प्रशासकीय सेवा (IAS) अधिकारी आहेत जे गृह विभागाचे प्रशासकीय प्रमुख आहेत. ते गृहमंत्र्यांना त्यांच्या कर्तव्याच्या पूर्ततेसाठी सल्ला देतात आणि मदत करतात. पोलिस प्रशासनावर देखरेख आणि समन्वय साधण्याची जबाबदारी गृह विभागाची आहे.

**राज्य पोलीस प्रशासकीय यंत्रणेची रचना खालीलप्रमाणे आहे :**

गृहमंत्री

↓

गृह खात्याचे प्रधान कार्यदर्शी

↓

पोलीस महानिर्देशक (DG आणि IGP)
(राज्य पोलीस विभागाचे प्रमुख)

↓

पोलीस महासंचालक (DGP)

↓

अतिरिक्त पोलीस महासंचालक (ADGP)

↓

पोलीस महानिरीक्षक (IGP)

↓

पोलिस उपमहानिरीक्षक (DIG)
(उप-क्षेत्रीय कार्यालयाचे प्रमुख)

↓

पोलीस अधिक्षक (SP)
(जिल्हा पोलीस अधिक्षक)

↓

अतिरिक्त पोलीस अधिक्षक (ASP)
(अतिरिक्त जिल्हा पोलीस अधिक्षक)

↓

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

पोलिस उपअधीक्षक (DySP)
(उपविभागीय कार्यालयाचे प्रमुख)
↓
पोलिस निरीक्षक (CPI)
(सर्कल कार्यालयाचे प्रमुख)
↓
पोलीस उपनिरीक्षक (PSI)
(पोलीस ठाण्याचे प्रमुख)
↓
सहायक पोलिस उपनिरीक्षक (ASI)
↓
हेड कॉन्स्टेबल (HC)
↓
पोलीस कॉन्स्टेबल (PC)

कायदा व सुव्यवस्था राखण्यात आणि संरक्षणात पोलीस यंत्रणा महत्वाची भूमिका बजावते.

**हे तुम्हाला माहित आहे का?** कोणतीही अनुचित घटना घडल्यास जवळच्या पोलीस स्टेशनवर तक्रार करता येते. येथे तक्रार केल्यानंतर प्रथम माहिती अहवाल (FIR - First Information Report) नोंद करावी लागते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**I. खालील वाक्यांमधील रिकाम्या जागा भरा:**

1. सार्वजनिक प्रशासनाचे जनक __________
2. सार्वजनिक प्रशासन हा शब्द प्रथम वापरणारे __________
3. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती __________ करते.
4. घटनेच्या __________ कलमात राज्य लोकसेवा आयोगाची तरतूद आहे.

**II. खालील प्रश्नांची चर्चा करा आणि त्यांची उत्तरे द्या:**

5. सार्वजनिक प्रशासन अतिआवश्यक आहे. चर्चा करा.
6. सार्वजनिक प्रशासन व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यापकपणे कार्य करते. स्पष्ट करा.
7. भरतीचे प्रकार स्पष्ट करा.
8. कायदा व सुव्यवस्था राखण्यात राज्याची भूमिका स्पष्ट करा.

**III. प्रकल्प :**

1. केंद्रीय लोकसेवा आयोग कोणत्या सेवेत भरतीसाठी परीक्षा घेते. त्या सेवांची यादी करा.
2. राज्य पोलीस प्रशासकीय यंत्रणेची शिडी श्रेणी लिहा.

**IV. उपक्रम:**

1. तुमच्या जवळच्या पोलिस स्टेशनला भेट द्या आणि पोलिस अधिकाऱ्याशी चर्चा करा आणि कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये पोलिस खात्याच्या भूमिकेबद्दल माहिती गोळा करा आणि अहवाल तयार करा.
2. वाहतूक पोलिसांकडून वाहतूक नियमांची माहिती गोळा करा आणि अहवाल तयार करा.

***

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण - 7

# भारतासमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना

S2D3HZ

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *जातीयवाद*
- *प्रांतीयवाद*
- *निरक्षरता*
- *भ्रष्टाचार*
- *महिलांचे स्थान (लिंग असमानता)*
- *लैंगिक अल्पसंख्यांक*
- *आर्थिक असमानता*
- *लोकसंख्या विस्फोट*
- *दारिद्र्य*
- *नफेबाजी*
- *चोरटा व्यापार*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1947 पासून भारताला अनेक अंतर्बाह्य आव्हांनाना तोंड द्यावे लागत आहे. ही आव्हाने योग्य नियोजन आणि उत्तम व्यवस्थापनाने सोडविता येतात. आपल्या लोकशाही पद्धतीत केंद्र, राज्य आणि स्थानिक पातळीवरील सरकारला लोकांची समस्या सोडविण्यासाठी सहकार्य करणे अपेक्षित आहे.

त्यामुळे आपल्या देशाच्या समस्या जाणून घेणे हे आपले कर्तव्य नाही का? अर्थात आपण त्या राष्ट्रीय समस्यांबद्दल जागरूक असले पाहिजे. आणि त्यावर योग्य उपाय देखील शोधले पाहिजेत. यापैकी बहुतेक समस्या मानवनिर्मित समस्या आणि राष्ट्रीय धोके आहेत. म्हणून आपल्याला योग्य मानवतावादी उपाय शोधावे लागतील. या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी योग्य कायदेविषयक सुधारणा, सक्षम प्रशासन, नि:पक्षपाती न्यायव्यवस्था आणि लोकांचा पाठिंबा असणे आवश्यक आहे. या समस्यांबद्दल जाणून घेऊयात.

**1) जातीयवाद :** जातीयवाद हा भारतीय समाजाचा सर्वात मोठा शत्रू आहे. हे धर्माच्या आधारावर संपूर्ण समाजाची विभागणी आणि त्यानंतर आपल्या धर्माबद्दलचा पराकोटीचा अभिमान आणि धर्माबद्दल एकमेकांच्या विरोधात असल्याची तीव्र भावना दर्शविते. जातीयवादामुळे समाजात धार्मिक विभाजन निर्माण होते. ज्यामुळे परस्पर अविश्वास आणि धोका निर्माण होतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे सामाजिक गटबाजी, आर्थिक वैमनस्य आणि अगदी राजकीय शत्रुत्वही वाढवतो. भारतातील जातीयवाद हा एक

धोका आहे, जो आपल्या राष्ट्राची एकता आणि अखंडतेला बाधा आणण्यास सक्षम आहे. जातीयवाद धार्मिक द्वेष आणि तात्विक फूट पाडतो. यामुळे सामाजिक अशांतता, जीवित आणि वित्तहानी होते. जातीयवादाचा प्रसार अनैतिक, परस्पर आरोप आणि धार्मिक गटांमधील शारीरिक हल्ले व दंगे पसरविण्याचे काम करतो.

ब्रिटीशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या नीतीमुळे भारतात जातीयवादाची बीजे पेरली गेली आणि स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्षाकडून विशेषतः निवडणूकांच्या दरम्यान जातीयवादाला खतपाणी घालण्यात आले. जातीयवादामुळे देशाचे हीत दुर्लक्षिले जाते. यामुळे देशाची एकता आणि अखंडता भंग पावते. देशाची एकता आणि शक्ती कमी होऊन वैरत्व वाढते, सामाजिक सामर्थ्य कमी होते. जातीयवादामुळे धार्मिक सलोखा नाहीसा होऊन शत्रुत्वाचे वातावरण निर्माण होते.

**जातीयवादावर नियंत्रण मिळवण्यासाठी केलेल्या उपाययोजना :**

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

जातीयवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम उपाय योजना आवश्यक आहेत. समान नागरीक कायदा, समान वागणूक, जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जात्यातीत मनोभावना, राष्ट्रीय एकात्मता या गोष्टी जातीयवादाला नियंत्रीत करू शकतात. वोट बँक (vote bank) वाढविण्याचे धोरण जातीयवादास विकोपास घेऊन जाते. राष्ट्रीय समाजाची धार्मिक, सामाजिक व आर्थिक विभागणी जातीयवादाला अधिकच गंभीर करते. भारतीय समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकामध्ये सहज आणि निरोगी राष्ट्रीय भावना वाढविण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत. धार्मिक मूलतत्ववादाला, देशाच्या राष्ट्रीयत्वाला अपाय करण्यापासून रोखले पाहिजे. मुलांना निधर्मी शिक्षणाचे धडे देऊन जातीयवादावर सकारात्मक उपाय योजले पाहिजेत. जनजागृती, अढळ राजकीय निर्धार, राजकीय पारदर्शीपणा, सक्षम कायदे पद्धत, राष्ट्रीय आदर्शवाद आणि निकोप प्रसार माध्यमे एकत्रीत आली तर जातीयवादावर पूर्ण नियंत्रण मिळविता येईल.

**2) प्रांतीयवाद / प्रादेशिकता :** प्रांतीयवाद म्हणजे स्वतःच्या प्रांताबद्दलचे किंवा राज्याबद्दलचे पराकोटीचे प्रेम व अभिमान. त्यामुळे भारतासारख्या विस्तृत, प्रांतीय वैविध्य असलेल्या देशाला या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. मर्यादित स्वरूपाचा प्रांतीयवाद स्वागतार्ह आहे. ज्यामुळे त्या त्या प्रांतातील लोकाना आपल्या प्रांताचा सर्वांगिण विकास करण्याची प्रेरणा मिळते. पण, बऱ्याचवेळा प्रांतियवाद अती झाल्यास देशाच्या एकतेला व हिताला बाधक ठरतो. प्रांत केंद्रीत, भावनिक गुंतवणूक देशाच्या सर्वांगिण विकासाला

पोषक असावी. प्रत्येक प्रांताची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक व्यवस्था, आर्थिक विचारसरणी, सांस्कृतिक वैविध्य आणि भिन्न भौगोलिक घटक यांचा एकत्रीत परिणाम साहजिकच प्रांतीयवादास कारणीभूत ठरतो. त्याच प्रमाणे भाषाभिमान देखिल प्रांतीयवादास खतपाणी घालून राष्ट्रीय एकात्मतेला मारक ठरतो.

**प्रांतीयवादावर नियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजना :**

प्रांतीयवादाला आळा घालण्यासाठी भारतीय घटनेने अनेक उपाय योजलेले आहेत. एकेरी नागरीकत्वाच्या सहाय्याने राष्ट्रीय एकात्मतेवर भर देण्यात आला असला तरी प्रत्येक राज्याला त्याच्या विकासाची स्वायत्तता देण्यात आली आहे. आमच्या संविधानाची प्रस्तावना (Preamble) 'आम्ही भारताचे नागरिक.....' अशी घोषणा करत राष्ट्रवादावर भर देते. 1956 मध्ये भारतीय संघराज्याची भाषावार प्रांतरचना झाली. यामध्ये राज्याराज्यामधील परस्पर शत्रुत्व न वाढवता विकास साधण्यास सहाय्यक ठरली पाहिजे. जर राज्यांमधील पराकोटीच्या प्रांतीयवादाला चालना दिली तर राज्याराज्यामधील सीमातंटे, पाणीतंटे, विकोपास जातील. प्रांतीयवादावर आधारीत संकुचीत दृष्टीकोन राष्ट्रीय हिताच्या आड येतो. आमचे संविधान आम्हाला विविधतेतून एकता प्रदान करते. म्हणूनच राष्ट्रीय एकात्मतेबरोबरच सकारात्मक प्रांतीयवादाला चालना दिली पाहिजे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**उपप्रादेशिकता :**

राज्यातील विविध क्षेत्रांतील प्रादेशिकवादाला उप-प्रादेशिकता म्हणता येईल. प्रादेशिक असमतोल हे अशा उपप्रादेशिकतेचे प्रमुख कारण आहे. प्रादेशिक असमतोलाची समस्या कर्नाटकातही दिसून येते. कर्नाटकातील उपप्रादेशिक असमतोलता दूर करण्यासाठी काही क्षेत्रांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. यासाठी डॉ. डी. एम. नंजूडुप्पा समितीने मलनाडू विकास मंडळ, कल्याण कर्नाटक विकास मंडळ, मैदानी प्रदेश विकास मंडळ आणि किनारपट्टी विकास प्राधिकरण, कर्नाटक सीमा प्रदेश अभिवृद्धी प्राधिकरण या संस्था वरील उद्देशांसाठी स्थापन केल्या आहेत. प्रादेशिक असमतोलता दूर करण्यासाठी कलम 371 (J) अंतर्गत कल्याण कर्नाटकातील 7 जिल्ह्यांना विशेष दर्जा देण्यात आला आहे.

**3) निरक्षरता :** भारतीय शिक्षणाला दीर्घ इतिहास आहे. मानवी साधनसंपत्तीच्या विकासासाठी शिक्षण ही अत्यंत महत्वाची बाब आहे. निरक्षरतेची मुख्य कारणे म्हणजे

गरिबी, स्थलांतर, बालमजुरी, बालविवाह, लहान मुलांची काळजी घेण्यासाठी मोठ्या मुलांचा वापर, शिक्षणात रस नसणे इत्यादी. देशाच्या विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी आणि भूमिका जाणून घेतली पाहिजे. त्यामुळे निरक्षरतेची समस्या सोडवण्यास मदत होते. केंद्र आणि राज्य सरकारानी निरक्षरतेच्या निर्मूलनासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी साक्षरतेचे प्रमाण 12% होते. 2001 मध्ये ते 66% झाले. 2011 मध्ये हे प्रमाण 74.04% वर गेले अजुनही 25.96% लोक निरक्षर आहेत. म्हणून सरकारने निरक्षरतेच्या निर्मूलनासाठी अनेक उपाय केले आहेत.

**तुम्हाला हे माहित आहे का ?**
*''लोकशाही केवळ समान कौशल्यांच्या विकासाची संधी देते'' डॉ. एस. राधाकृष्णन. ''2015 मधील संयुक्त राष्ट्राच्या 17 उद्दिष्टांपैकी 4 थ्या घोषणे नुसार 'शिक्षणाच्या सहाय्यानेच दर्जेदार विकास होऊ शकतो''*

**निरक्षरता दूरकरण्यासाठी केलेल्या उपायोजना:** निरक्षरतेच्या समस्येचे उच्चाटन करण्यासाठी सरकारला अनेक उपाययोजना कराव्या लागल्या. 2001 साली सर्व शिक्षा अभियानाद्वारे (SSA-Sarva Shiksha Abhiyan) मुलीना आणि अपंगाना शिक्षणाची सोय झाली. निरक्षरांना साक्षर करण्यासाठी 1988 मध्ये भारत सरकारद्वारा ''राष्ट्रीय शिक्षण अभियान'' (National Literacy Mission) सुरु करण्यात आले. निरक्षरतेचे निर्मूलन करण्यासाठी साक्षर भारत मोहिम (Literate India Programme) अंमलात आली. आपल्या घटनेच्या 21 A कलमानुसार शिक्षण हा मूलभूत अधिकार म्हणून मान्यता देण्यात आली आहे. शिक्षण हक्क 2009 (RTE) ची हमी देण्यात आली आहे. यानुसार 6 ते 14 वयोगटातील सर्व - मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्यात येवू लागले.

**उपक्रम :**
*तुम्ही ग्राम पंचायतीचे अध्यक्ष आहात अशी कल्पना करा आणि योजना तयार करा. तुमच्या पंचायत व्याप्तीमधील निरक्षरता निर्मूलनाची चर्चा करा.*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

2018 मध्ये, एक व्यापक शिक्षण प्रणाली लागू करण्यात आली. नवभारत साक्षरता कार्यक्रम (2022-23 ते 2026-27) राबविण्यात आला आहे. हे सर्व कार्यक्रम साक्षरतेच्या विकासाला पूरक आहेत.

**4) भ्रष्टाचार :** भारतीय समाजात आज भ्रष्टाचार ही मोठी समस्या ठरत आहे. खरे पाहता भ्रष्टाचाराला समाजाच्या सर्वच स्तरात ऊत आला आहे. भ्रष्टाचार म्हणजे अमिष दाखवून अथवा लाच देऊन बेकायदेशीर काम करून घेणे. भ्रष्टाचारामुळे सार्वजनीक क्षेत्रात लोक योग्य आणि कानूनबद्ध कामापासून दूर जातात. सर्व निती नियम धाब्यावर बसवून वैयक्तिक फायदा करून घेतला जातो. भ्रष्टाचार हा संसर्गजन्य रोगासारखा आहे. भ्रष्टाचाराचे अनेक दुष्परिणाम आहेत.

याचा देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेवर थेट परिणाम होतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर भ्रष्टाचार हा समाजविरोधी आणि आर्थिक सुव्यवस्थेच्या विरोधी आहे. हे राजकीय दृष्ट्या अपायकारक आणि नैतिकतेच्या दृष्टीकोनातून अत्यंत गैर आहे.

> **तुम्हाला हे माहीत आहे का?**
> ***लोकायुक्त संस्था:*** *कर्नाटक लोकायुक्त कायदा 1986 मध्ये लागु करण्यात आला. त्याचे प्रमुख लोकायुक्त आणि उपलोकायुक्त होते. भ्रष्टाचार व कामात विनाकारण दिरंगाई होत असेल तर आम्ही येथे तक्रार केली पाहिजे. ए.डी. कोशल हे कर्नाटकातील प्रथम लोकायुक्त होते.*

**भ्रष्टाचाराची कारणे:**

सार्वजनिक जीवनावर परिणाम करणाऱ्या भ्रष्टाचाराची मुख्य कारणे पुढीलप्रमाणे आहेत. जातीवाद, घराणेशाही, उत्तरदायित्वाचा अभाव, कठोर कायद्यांचा अभाव, मानवी जन्मजात स्वार्थ, जोखीम टाळण्याची वृत्ती, कठोर पर्यवेक्षणाचा अभाव, भ्रष्टाचार विरोधी पथकाची अकार्यक्षमता इ.

**भ्रष्टाचाराचे प्रकार:**

करचुकवेगीरी, अवैध साठेबाजी आणि कृत्रिम टंचाई निर्माण करणे, तस्करी, आर्थिक फसवणूक, फसवणूक, परकीय चलन कायद्याचे उल्लंघन, व्यावसायिक फसवणूक, पैशाचा गैरवापर हे सर्व भ्रष्टाचाराचे प्रकार आहेत.

> **उपक्रम :**
> *भ्रष्टाचार निर्मूलनाबद्दल तुमच्या शिक्षकांशी चर्चा करा.*

**भ्रष्टाचाराचे दुष्परिणाम :**

भ्रष्टाचाराचे अनेक वाईट व नकारात्मक परिणाम होतात. भ्रष्टाचार बेकायदेशीर आहे, समाजविरोधी आहे आणि अनिष्ट अनैतिक आहे, प्रशासनातील अंतिम शत्रू आहे. त्यामुळे कारभारातील पारदर्शकता आणि जबाबदारी बाधित होते. राजकीय भ्रष्टाचारामुळे संघटित गुन्हेगारीही वाढते. हे सार्वजनिक सेवा क्षेत्रातील नोकरशाहीतील त्रुटी आणि फसवणूक करण्यास अनुमती देते. त्यामुळे देशाची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था कमकुवत होते.

**भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजना :**

भ्रष्टाचारावर केवळ टीका करून त्याच्याशी तडजोड करून तो नष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे प्रशासनाची ही स्थिती आहे. भारत सरकारने भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

लोकपाल या संस्थेची स्थापना केली आहे, राज्यांमध्ये, केंद्रात लोकायुक्तांची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय दक्षता आयोग (CVC- Central Vigilance

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

Commission) स्थापन केला आहे, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा-1988 लागू करण्यात आला. माहिती हक्क 2005 (RTI Act - Right to Information Act), शासकीय कार्यालयांमध्ये सीसी कॅमेरे बसविण्यात आले आहेत, फायलींचा त्वरित निपटारा करण्यासाठी कार्यालयीन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. सकाल, जनस्पंदन, जनसेवक आदी योजना राबविण्यात आल्या आहेत. शासकीय कार्यालयात तक्रार पेट्या ठेवण्यात आल्या आहेत.

**भ्रष्टाचार निर्मूलनासाठी आणखी काय करता येईल?**

वैयक्तिक आणि सामाजिक अशा भक्कम नैतिक पायाद्वारेच मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराचे उच्चाटन केले जाऊ शकते. भ्रष्टाचार निर्मूलनासाठी प्रबळ राजकीय व प्रशासकीय इच्छाशक्ती आणि जनतेचे सहकार्य आवश्यक आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, चांगले राजकीय नेतृत्व, जबाबदार नोकरशाही आणि कायद्याची जाणीव असलेली लोकसंख्या यामुळे भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा अधिक तीव्र होऊ शकतो. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी केलेल्या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या गेल्या पाहिजेत, लोकपाल आणि लोकायुक्त संस्थांना बळकट केले पाहिजे. सर्वच पातळीवरचा भ्रष्टाचार मुळापासून उखडून टाकण्यासाठी अत्यंत कठोर दंडव्यवस्था आवश्यक आहे.

**उपक्रम :**

*स्त्रीयांची स्थिती तपासून त्या देशाची व्यवस्था पहाता येते.*

*- पंडित जवाहर लाल नेहरू*

**5) लिंग असमानता (महिलांचे स्थान) :** स्वातंत्र्यपूर्व काळातही महिलांचे कर्तृत्व आपण पाहिले आहे. जसे झाशीची राणी लक्ष्मीबाई, राणी चेन्नम्मा, ॲनी बेझंट, कस्तुरबा गांधी, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख इ. महिला आपल्याला आठवतात. आजच्या दिवसात स्त्रिया, शिक्षिका, अभियंता, डॉक्टर, पायलट, अंतराळवीर, पोलीस, राजकारणी, सैनिक इत्यादी क्षेत्रात काम करत असताना पाहिले आहे. तरीही महिलांची स्थिती अजुनही सुधारलेली नाही. समाज व्यवस्था, गरिबी, निरक्षरता ही महिलांच्या मागासलेपणाची कारणे आहेत. त्यामुळे राष्ट्रीय प्रगतीला अडचण निर्माण होत आहे.

**महिलांचे स्थान बळकट करण्यासाठी सरकारने केलेले उपाय :**

महिलांचे शिक्षण आणि महिलांच्या विकासासाठी, महिला आणि बालकल्याण विकास मंत्रालय राज्यांमध्ये सुरू करण्यात आले आहे, केंद्र आणि राज्य सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांसाठी आरक्षण दिले आहे. राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोग स्थापन करण्यात आले आहेत, राज्यांमध्ये महिला विकास महामंडळे, आणि महिला शिक्षण विकास संस्था स्थापन करण्यात

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

आली आहेत. कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांसाठी सखी वन स्टॉप सेंटर सुरू करण्यात आले आहेत. संरक्षण कायदा (2005) लागू करण्यात आला आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध कायदा (2013) लागू करण्यात आला आहे, कर्नाटकातील स्थानिक संस्थांमध्ये महिलांना 50% जागा राखीव आहेत. महिला हेल्पलाइन 1091 ची सुविधा देण्यात आली आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी 33% आरक्षण देण्यासाठी संसदेने नारीशक्ती वंदना कायदा (106वी घटना दुरुस्ती विधेयक) मंजूर केला आहे.


**इंदिरा गांधी**
प्रथम महिला पंतप्रधान


**प्रतिभा पाटील**
प्रथम महिला राष्ट्रपती


**सरोजिनी नायडू**
प्रथम महिला राज्यपाल


**सुचेता कृपलानी**
प्रथम महिला मुख्यमंत्री


**मीरा कुमार**
प्रथम महिला लोकसभा सभाध्यक्षा

भारतात श्रीमती इंदिरा गांधी देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या, श्रीमती प्रतिभाताई पाटील देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती झाल्या, न्यायमूर्ती फातिमा बीवी या भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश झाल्या, श्रीमती व्ही.एस. रमादेवी यांनी भारताच्या निवडणूक आयोगाच्या पहिल्या महिला मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिले आहे. अनेक महिलांनी राज्यपाल, मुख्यमंत्री, परदेशी राजदूत आणि इतर उच्च पदांवर काम केले आहे आणि त्यांच्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडल्या आहेत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

### 6) लैंगिक अल्पसंख्याक (Gender Minorities) :

शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या, ज्या व्यक्तींना त्यांच्या जननेंद्रियाच्या वर्तनाच्या विरुद्ध भावना आणि वर्तणूक यांची ओळख होते त्यांना लैंगिक अल्पसंख्याक म्हणतात. लैंगिक भेदभावामध्ये सर्वसाधारणपणे लिंग अल्पसंख्याकांवरील भेदभावाचाही समावेश होतो. लैंगिक अल्पसंख्याक असे आहेत ज्यांचे शारीरिक आणि सामाजिक वर्तन ते जन्मलेल्या लिंगापेक्षा वेगळे आहे. हा पुरुष आणि स्त्री दोन्ही शारीरिक गुण असलेल्या व्यक्तींचा समुदाय आहे. पितृसत्ताक व्यवस्थेच्या सामाजिक नियमांनी तयार झालेल्या समाजाच्या मध्यभागी राहिल्यामुळे ते सामान्य पुरुष किंवा स्त्री सारखे विशिष्ट वेगळेपण

सोडू शकत नाहीत, त्यांना स्त्रीसारखे जगायचे आहे की पुरुषासारखे जगायचे आहे असा गोंधळ होतो. त्या व्यक्तींची वैयक्तिक आणि सामुदायिक प्रतिष्ठा राखण्यासाठी त्यांना अर्धनारीश्वर आणि तृतीय लिंगी अशा विविध विशेष नावांनी संबोधले जाते. त्यांचे कार्यकर्ते अक्काई पद्मशाली यांच्या मते त्यांना लैंगिक अल्पसंख्याक म्हणून संबोधणे योग्य आहे. लैंगिक अल्पसंख्याकांना भेडसावणारा सामाजिक बहिष्कार आणि भेदभाव तीव्र आणि अत्याचारित समुदायांद्वारे होणाऱ्या भेदभावापेक्षा वेगळा आहे. कुटुंब, शिक्षण, परिसर, आरोग्य, रोजगार यापासून सर्वसामान्यांपर्यंत तेही माणूस आहेत हे स्विकारण्याच्या वृत्तीचा अभाव दिसून येतो.

**लैंगिक अल्पसंख्याकांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या कृती :**

लैंगिक अल्पसंख्याकांवरील भेदभाव दूर करण्यासाठी भारतात अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. 2014 मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने लैंगिक अल्पसंख्याकांच्या संदर्भात ऐतिहासिक निर्णय दिला. या निकालाच्या आधारे केंद्र आणि राज्य सरकारने अनेक पावले उचलली आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

भारत सरकारने ट्रान्सजेंडर मायनॉरिटी प्रोटेक्शन ॲक्ट-2019 चा संरक्षण कायदा लागू केला आहे. कोणीही ट्रान्सजेंडर व्यक्तींना त्यांच्या कुटुंबांपासून वेगळे करू शकत नाही आणि त्यांना त्यांचे घर, समुदाय आणि गाव सोडण्यास भाग पाडू शकत नाही, हा दंडनीय गुन्हा घोषित करण्यात आला आहे. भारत सरकारच्या अधिकारिता आणि न्याय मंत्रालयाने लिंग अल्पसंख्याक व्यक्तींच्या कल्याणासाठी एकात्मिक पुनर्वसन हा उप-प्रकल्प लागू केला आहे. 'स्माईल' (SMILE-Support for Marginalized Individuals for livelihood and Enterprise) योजनेअंतर्गत लैंगिक अल्पसंख्याक व्यक्तींच्या कल्याणासाठी समग्र पुनर्वसन ही योजना लागू केली आहे. नॅशनल कौन्सिल फॉर ट्रान्सजेंडर पोर्टल (NCTP) तयार केले आहे. 'गरिमा गृह' नावाने निवारागृहे बांधली जात आहेत.

2008 मध्ये तामिळनाडू सरकारने लैंगिक अल्पसंख्याक कल्याण विकास मंडळाची स्थापना केली होती. कर्नाटक सरकारने 2017 मध्ये लैंगिक अल्पसंख्याक राज्य धोरण लागू केले आहे. त्यानुसार राज्य सरकारी पदांमध्ये 1% आरक्षण देण्यात आले आहे, त्याशिवाय त्यांना शिक्षण घेण्यासाठी, सरकारी नोकऱ्यांमध्ये सामील होण्यासाठी आणि निवडणूक लढवण्याची संधी देण्यात आली आहे.

- मंजम्मा जोगती : कर्नाटक लोककला अकादमीच्या अध्यक्षपदी काम करणारी पहिली लैंगीक अल्पसंख्यांक व्यक्ती.
- शबनम मौसी : विधान सभेचे सदस्य म्हणून निवडून आलेली पहिली लैंगीक अल्पसंख्यांक व्यक्ती.

**7) आर्थिक असमानता :** भारतात वेगाने वाढणारी आर्थिक असमानता ही दुसरी समस्या आहे. आर्थिक असमानता गरीब व श्रीमंत वर्गातील तफावत दर्शविते हेच आपल्याला ग्रामीण व शहरी भागामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. आपल्या राष्ट्राच्या आर्थिक विकासाची फळे फक्त नागरी आणि श्रीमंत वर्गच चाखत आहे असे दिसून आले आहे. गरिबांचा नेहमीच भ्रमनिरास होत आहे. कारण सरकारी योजनांचा लाभ गरीब व तळागाळातील लोकांपर्यंत पोहचतच नाही. खाजगी क्षेत्रातील लठ्ठ पगारश्रेणी, पांढरपेशा नोकरदारांचा वरचा स्तर, नफेबाजी, भ्रष्टाचार या सगळ्याची फलश्रुती म्हणजे गरीब आणि श्रीमंत वर्गात निर्माण होणारी दरी होय. गरीब श्रीमंत वर्गातील अंतर भरून काढणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. हे अंतर भरून काढण्यासाठी योग्य व काळजीपूर्वक नियोजन करणे गरजेचे आहे. गरीब व आदिवासी लोकांना विकासाचा बळी ठरविण्यापेक्षा त्यांना विकासाचे भागीदार बनविणे आवश्यक आहे. या लोकांना धरणबांधणी, औद्योगिक प्रकल्पांची उभारणी यासाठी त्यांच्या प्रदेश व घरादारापासून विस्थापित केले जाते. अशावेळी त्यांचे योग्य पुनर्वसन, उत्पन्नाची किंवा उपजीविकेची योग्य साधने उपलब्ध करून देणे यासारख्या गोष्टींची योग्य काळजी घेतली पाहिजे.

आर्थिक असमानता दूर करण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या पाहिजेत, उत्तम आर्थिक सुधारणा, योजनाबद्ध आर्थिक निर्वाहण, योग्य कर आकारणी पद्धत, याच बरोबर कुटीर आणि लघुउद्योगांची अभिवृद्धी यामुळे आर्थिक असमानता दूर करण्यास मदत होते. उद्योगधंद्याची वाढ आणि मक्तेदारीवर कठोर नियंत्रण असावयास हवे. जमीन सुधारणा, कामगारविषयक धोरण, सामाजिक सुरक्षा इत्यादी गोष्टी देखील आर्थिक असमानता दूर करण्यास सहाय्यक ठरतात.

**8) लोकसंख्येचा विस्फोट:** भारत हा जगातील अति लोकसंख्या असलेला एक देश आहे. जगाच्या एकूण भूभागाच्या 2.4 % भूभाग आणि जगाच्या एकूण लोकसंख्येच्या बाबतीत आमची 17.5 % हिस्सेदारी आहे. 1991-2001 या दशकात आपल्या देशाची लोकसंख्या 84 कोटींवरून 102.7 कोटी झाली. 2011 च्या जनगणनेनुसार, ही संख्या 121 कोटींच्या पुढे गेली आहे. मागील दशकामध्ये लोकसंख्या वाढीचा दर 17.7% इतका होता.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

जन्मदरात कमालीची वाढ, मृत्यूदरात घट, सरासरी आयुर्मानात भरीव वाढ, बालमृत्यूदरात घट ही लोकसंख्या वाढीची प्रमुख कारणे आहेत.

**चर्चा करा:**
*लोकसंख्या देशाच्या विकासाला सहाय्यकही ठरते आणि धोकादायकही ठरते.*

**लोकसंख्येच्या विस्फोटामुळे निर्माण झालेली समस्या/ परिणाम:** लोकसंख्येच्या विस्फोटामुळे बेरोजगारी, निरक्षरता, गरिबी, घरांच्या सुविधांचा अभाव, आरोग्याच्या समस्या, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नसणे अशा समस्या भेडसावत आहेत.

**लोकसंख्येच्या स्फोटामुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या निर्मूलनासाठी उपाय योजना :**

साक्षरतेचा प्रसार, तंत्रज्ञान शिक्षण, कृषी विकास, औद्योगिक विकास, निर्यातीत वाढ, लघु आणि कुटीर उद्योगांचा विकास, शहरी आणि ग्रामीण भागात अतिरिक्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे सर्व लोकसंख्येच्या विस्फोटामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे निर्मूलन करण्याचे उपाय आहेत.

**लोकशास्त्रीय लाभांश (Demogrphic Dividend):** भारतात सध्या लोकशास्त्रीय लाभांश आहे. लोकशास्त्रीय लाभांश म्हणजे देशाच्या एकूण लोकसंख्येशी कार्यरत लोकांचे गुणोत्तर. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी 62% लोकसंख्या कार्यरत आहे. जर देशाला या लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा फायदा घ्यायचा असेल तर आपण आपल्या देशाच्या लोकसंख्येला ओझे न मानता देशातील लोकांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा, शिक्षण, कौशल्ये आणि प्रशिक्षण दिले पाहिजे आणि त्यांना ज्ञानासह चांगल्या मानव संसाधनात बदलले पाहिजे, कौशल्ये आणि क्षमता. याद्वारे लोकसंख्येला देशाच्या विकासासाठी पूरक संपत्ती बनवता येईल.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**9) दारिद्रय :** दारिद्रय ही भारतात मोठ्या प्रमाणात आढळणारी सामाजिक व आर्थिक समस्या आहे. जेव्हा मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या किंवा इतर मूलभूत गरजा देखील भागविल्या जात नाहीत त्या अवस्थेला दारिद्रय म्हटले जाते. भारताच्या ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागात देखील दारिद्रय दिसून येते.

**उपक्रम :**
*कर्नाटक सरकारने गरिबी निर्मूलनासाठी हाती घेतलेल्या कार्यक्रमांची यादी तयार करा.*

**दारिद्र्य निर्मूलनासाठी केलेल्या उपाययोजना :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राज्य तसेच केंद्र सरकारकडून दारिद्र्य निर्मूलनाचे अनेक कार्यक्रम राबविले गेले आहेत. गरीब कुटुंबाना बी.पी एल कार्डांचे वितरण करण्यात आले आहे. पंचवार्षिक योजनातून दारिद्र्य निर्मूलन आणि दरडोई उत्पन्नाची वाढ ही उद्दिष्ट्ये ठेवण्यात आली आहेत. जवाहर रोजगार योजना, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना, या सारख्या योजनांच्या माध्यमातून दारिद्र्य कमी करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.(MGNREGA-Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act (2005), प्रधानमंत्री ग्रामोदय योजना (PMGY), राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM-National Rural Livelihood Mission), राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान (National Urban Livelihood Mission), राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा (NFSA-National Food Security Act) प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना (PMGKAY) अमलात आली.

भारतात मानव साधनसंपत्ती आणि नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात आहेत. या दोन्हींचा जर रचनात्मक उपयोग केला तर आपल्या देशातील दारिद्र्य नक्कीच दूर होईल. उत्पादनात वाढ आणि संपत्तीचे योग्य वाटप हे उत्तम आर्थिक सुधारणेसाठी अत्यंत आवश्यक आहेत.

**चर्चा करा:**
*कधी कधी कांद्याचा दर 80 रुपये प्रती किलो होता तर कधी 20 रु प्रती किलो होतो का ?*

**10) नफेबाजी :** जनसामान्यांच्याकडून किंवा ग्राहकाकडून प्रमाणापेक्षा अधिक लाभ मिळविण्याची कृती म्हणजे नफेबाजी होय. व्यवसायात अनैतिक मार्गाने प्रचंड पैसा मिळवणे याचाही अर्थ नफेबाजी असा होतो. असा मिळवलेला पैसा समाजाला घातक आहे.

**नफेबाजीची कारणे :** मक्तेदारी प्रणाली, बहुराष्ट्रीय निगम मंडळांचा प्रसार, बाजारावरील अनियंत्रण, बेकायदेशीर वस्तूंचा साठा, किमतींवर नियंत्रण नसणे ही नफेबाजीची प्रमुख कारणे आहेत.

**नफेबाजीची दुष्परिणाम :** नफेबाजीमुळे आर्थिक असमानता आणि दारिद्र्य निर्माण होते. यामुळे समाजात गुन्हेगारीची देखील वाढ होते. आर्थिक क्षेत्रात नफेबाजी एका अनैतिक मार्गाच्या स्वरूपात पूढे येत आहे. वस्तूंच्या दरात होणारी सततची वाढ याचा परिणाम महागाई वाढते. सामान्य लोकांच्या उत्पन्नाचा बराच मोठा भाग महागाई गिळून टाकते. वस्तूंची अनियंत्रित दरवाढ नफेबाजीला कारणीभूत ठरते. उत्पादकांच्या लाभाचा मोठा भाग, विशेषता वितरकांनी आपल्या फायद्याचे (profit) वाढविलेले मोठे प्रमाण नफेबाजीला कारणीभूत ठरते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**नफेबाजीवर नियंत्रण मिळवण्यासाठी केलेल्या उपाययोजना :**

योग्य सरकारी नियत्रंण, किंमतीच्या आलेखावर कडक निर्बंध, सहकारी बाजारपेठांचा विस्तार, योग्य कर आकारणी धोरण यामुळे नफेबाजीला आळा घालता येईल.

**11) चोरटा व्यापार :** अलिकडच्या काळात स्वदेशी व्यापाराइतकेच आंतरराष्ट्रीय व्यापाराला महत्व आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात आयात आणि निर्यात या दोन्ही गोष्टी अंतर्भूत असतात. सरकारने आयात व निर्यातीशी संबंधित उत्तम धोरण अवलंबीले पाहिजे. फक्त आवश्यक वस्तूंची आयात करून निर्यातीला चालना दिली पाहिजे. तसेच बाहेरून आयात केलेल्या वस्तू पर्याप्त आहेत याची दखल घेतली गेली पाहिजे. यामुळे आपण परकीय चलन (Foreign Exchange) वाचवू शकतो. याचबरोबर गृहउद्योग आणि उत्पादन क्षेत्राला सरकारकडून उत्तेजन दिले गेले पाहिजे. देशाच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आयात योग्य प्रमाणात असावयास हवी. विना कर आणल्या जाणाऱ्या वस्तू म्हणजे चोरटी आयात. चोरटी आयात म्हणजे राष्ट्राशी संबंधित नकोशी आर्थिक क्रिया आहे. चोरट्या व्यापारामुळे देशाचे आर्थिक नुकसान होते. चोरट्या व्यापारामुळे गृह उद्योग आणि देशी बाजारपेठांना हानी पोहचते. याचा राष्ट्रीय अर्थव्यवस्था व बाजारपेठेवर विपरित परिणाम होतो.

**चोरट्या व्यापारावरील प्रतिबंधक उपायः** अंतर्गत बाजारपेठेतील दरावर नियंत्रण, योग्य आयात निर्यात धोरण, किनारपट्ट्यावरील कडक गस्त (Strict coastal Vigilance) आर्थिक अपराधांना दंडात्मक शिक्षा, आंतरराष्ट्रीय तसेच राज्यांतर्गत परस्पर व्यापारी करार हे चोरट्या व्यापाराला आळा घालण्याचे उत्तम उपाय आहेत.

चोरटा व्यापार म्हणजे देशविरोधी आर्थिक अपराध आहे. याबद्दल लोकांच्यात जागृती निर्माण केली पाहिजे. चोरट्या व्यापारातील वस्तूवर सामाजिक बहिष्कार घातल्यास चोरट्या व्यापाराला आळा बसू शकेल.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा:**

1. आपल्या प्रांताविषयी असणाऱ्या पराकोटीच्या प्रेमाला___________ म्हणतात.
2. माहिती हक्क कायदा ___________ यावर्षी लागू करण्यात आला.
3. 2011 च्या जनगणनेनुसार भारताच्या साक्षरतेचे प्रमाण ___________
4. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायमूर्ती ___________

## II. खालील प्रश्नांची उत्तरे समूहामध्ये चर्चा करून लिहा:

5. जातीयवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती पावले उचलली पाहिजेत?

6. निरक्षरता निर्मूलनासाठी कोणती पावले उचलली आहेत?

7. लिंगभेद दूर करण्यासाठी सरकारने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत?

8. लोकसंख्येच्या विस्फोटामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे निर्मूलन करण्याचे मार्ग कोणते?

9. लिंग अल्पसंख्याक कोण आहेत? त्यांच्यावरील भेदभाव दूर करण्यासाठी कोणती पाऊले उचलली आहेत?

10. गरिबी निर्मूलनासाठी राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची यादी करा.

11. नफेबाजी अनेक वाईट परिणामांना कारणीभूत ठरते. या विधानाचे समर्थन करा.

12. तस्करी/चोरटा व्यापार म्हणजे काय? त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तुमच्या सूचना काय आहेत?

## III. उपक्रम:

1. एखाद्या जवळच्या दुकानाला भेट द्या वस्तूच्या किंमती कमी जास्त का होत आहेत, ते समजून घ्या.

2. राष्ट्रीय अखंडता विरुद्ध प्रादेशिकता/प्रांतीयवाद याबद्दल वाद-विवाद आयोजित करा.

✲✲✲

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

I3C5N9

## प्रकरण - 8

# सामाजिक स्तर

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया**

- *सामाजिक स्तर*
- *लोकांमधील फरक*
- *अस्पृश्यता एक सामाजिक समस्या*
- *अस्पृश्यता निर्मूलनासाठी अमलांत आणलेल्या कायदेशीर उपाय योजना*

सामाजिक स्तर म्हणजे लोकांचे उत्पन्न, शिक्षण, जात, रंग, लिंग, व्यवसाय, बुद्धीमत्ता इत्यादींच्या आधारावर उच्च नीच असा भेदभाव करणे. सामाजिक स्तर समाजापासून निर्माण झाले आहेत उदा. श्रीमंत कुटुंबात जन्मलेल्या मुलांना उत्तम पौष्टिक आहार, शाळा, उद्योग मिळण्याची संधी जास्त असते. पण गरीब मुलांना या संधी खूप कमी मिळतात. गरीब, श्रीमंत म्हणून समाजात जे वर्गीकरण केले जाते यासाठी मुले कारणीभूत नाहीत पण समाजाने निर्माण केलेल्या सामाजिक स्तराचा परिणाम शोषितांना अनुभवावा लागतो.

सामाजिक स्तर काळानुसार आणि देशानुसार भिन्न आहेत व ते बदल घटवू शकते उदा. भारतात हजारो वर्षांपासून जाती पद्धत अस्तित्वात आहे. ही मनुष्याला उच्च-नीच ठरविणारी अशी व्यवस्था आहे. त्यामुळे काही खालच्या जातीच्या लोकांना शूद्र, अस्पृश्य असे ठरवून त्यांचा आहार, उद्योग आणि जगण्याच्या हक्क हिरावून घेण्यात आला होता अन्याय दूर करण्यासाठी सरकारने घटनात्मक दृष्ट्या प्रयत्न केले आहेत.

सामाजिक स्तर सगळ्या समाजात दिसून येतो. अमेरिकेमध्ये पांढऱ्या कातडीचे लोक काळ्या कातडीच्या लोकांना गुलामासारखे वागवून त्यांना विकत होते. तसेच सगळीकडे गरीब-श्रीमंत असा भेदभाव दिसून येतो.

**उपक्रम :**
सामाजिक भेदभाव निर्मूलनासाठी सरकारने हाती घेतलेल्या योजनांची माहिती गोळा करा

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**सामाजिक असमानता :**

सामाजिक स्तर प्रणाली असमानता, भिन्नता निर्माण करते. कनिष्ठ म्हणून वर्गीकृत केलेल्या लोकांचा अपमान करते, उदा. काळ्या लोकांनी गोऱ्या लोकांच्या शाळेला जायचे नाही. भारतात अस्पृश्यांना सार्वजनिक विहिरी, तळ्यातील पाण्याचा वापर करण्यास परवानगी नव्हती.

**भेदभावामुळे निर्माण झालेले पूर्वग्रह :**

''संपूर्ण मानवजात एक आहे'' असे मत फार पूर्वी आदी कवी पंप यांनी व्यक्त केले आहे. हे मत सर्व  मानव एक आहेत म्हणून सूचित करते. तरी सुद्धा समाजात माणसाने निर्माण केलेले जातिभेद, लिंगभेद, प्रादेशिक भेदभाव, गरीब - श्रीमंत भेदभाव, यासारखे भेदभाव पूर्वग्रहाला कारणीभूत आहेत. एक व्यक्ती अथवा एक समूहाबद्धल असलेली पूर्व निर्धारित मनोभावना म्हणजे पूर्वग्रह. हे पूर्वग्रह सकारात्मक असू शकतात किंवा नकारात्मक असू  शकतात, पण भेदभावापासून निर्माण झालेले पूर्वग्रह, अधीरता, तिरस्कार, अपमान, द्वेष यासारख्या भावना निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देतात. यामुळे सामाजिक अंतर वाढून सामाजिक संघर्षाला कारणीभूत ठरते.

**अस्पृश्यता एक सामाजिक कलंक :**

भारतात स्तर व्यवस्था जातीपद्धत म्हणून ओळखली जाते. भारतातील लोक हजारो जाती समूहात विभागले गेले आहेत. यामध्ये काही उच्च जाती म्हणून तर काही खालच्या दर्जाच्या जाती म्हणून ओळखल्या गेल्या आहेत. जातीच्या स्तरीकरणात अस्पृश्यांना समाजाने शेवटच्या टप्प्यातील म्हणून मानले.

> **तुम्हाला माहीत असू दे.**
> **सकारात्मक पूर्वग्रह किंवा पक्षपाती:** सहसा आपण आपल्या लोकांना चांगले मानतो. ही भावना आपल्याला सुसंवादाने जगण्यास मदत करते. तथापि जर ही भावना तीव्र झाली तर ते हानिकारक असू शकते.

अस्पृश्यता ही आपल्या समाजातील अमानवी प्रथा आहे. महात्मा गांधीजींनी अस्पृश्यतेला 'हिंदू समाजाला लागलेला कलंक' असे म्हटले आहे. अस्पृश्यता प्रथेच्या आचरणामुळे खालच्या जाती, सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय लाभ आणि संधी यापासून वंचित राहिल्या ही स्थिती अनेक शतके पुढे चालू ठेवली गेली. पण आज परिस्थिती बदललेली आहे आंता सगळ्या वर्गातील लोकांना सर्व प्रकारच्या

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सवलती संविधानात्मकरित्या मिळत आहेत. मागासवर्गीय जातीना विशेष सुविधा दिल्या जात आहेत. हळूहळू वाढणाऱ्या साक्षरतेमुळे सामाजिक जागरूकता वाढून अस्पृश्यतेचे प्रमाण कमी होत आहे. हा समाजाचा एक स्वागतार्ह विकास आहे आणि सामाजिक सलोख्याच्या विकासाला मदत करणारा आहे.

**अस्पृश्यता दूर करण्यासाठीच्या उपाययोजना :**

अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी जोतिबा फुले, स्वामी विवेकानंद, डॉ. बी. आर आंबेडकर इ.नी भरपूर प्रयत्न केले, तरीसुध्दा अस्पृश्यतेचे पूर्णपणे निर्मूलन झालेले नाही. भारतीय समाजात अजूनही ही प्रथा अस्तित्वात आहे. म्हणून अस्पृश्यता उच्चाटनासाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत.

भारतीय घटनेच्या 17 व्या कलमानुसार अस्पृश्यता निषिध्द मानण्यात आली आहे. 1955 साली भारत सरकारने 'अस्पृश्यता फौजदारी कायदा' अस्तित्वात आणला. 1976 मध्ये 'नागरिक हक्क संरक्षण कायदा' तयार करण्यात आला. 1955 मधील कायद्यात काही सुधारणा करण्यात आल्या. या कायद्यानुसार अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे. मतदान करणे आणि निवडणुकीत सहभागी होणे हा हक्क देण्यात आला. याशिवाय अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीयांना शिक्षण आणि नोकऱ्यामध्ये आरक्षण ठेवण्यात आले. अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी 1989 च्या कायद्यानुसार राज्यसरकारला काही जबाबदाऱ्या देण्यात आल्या. याप्रमाणे स्वतंत्र भारताने सर्वजण समान आहेत याचा नारा दिला.

**तुम्हाला माहिती आहे का ?**

- घटनेच्या 15, 16, 17, 38 आणि 46 व्या कलमानुसार भारतीय नागरिकांसाठी कोणत्याही प्रकारच्या भेदभावाचा निषेध करण्यात आलेला आहे.
- अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना 16 (4) आणि 320 (4) या कलमांन्वये नोकरीत आरक्षण ठेवण्यात आले आहे .
- अनुसूचित जाती आणि जमातींसाठी 330, 332, 334 या कलमानुसार राजकारणात आरक्षण ठेवण्यात आले आहे.
- 30वे कलम धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांना त्यांच्या स्वत:च्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याच्या अधिकाराची हमी देते.
- सार्वजनिक देवालयामध्ये प्रवेशासाठी 25 वे कलम परवानगी देते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. 'संपूर्ण मानव जात एक आहे' असे ___________ यांनी सांगितले.
2. अस्पृश्यता हा हिंदू समाजाला लागलेला कलंक आहे. असे ___________ यांनी सांगितले.
3. अस्पृश्यता पाळणे हा दंडनीय गुन्हा आहे असे घटनेचे ___________ वे कलम घोषित करते.

**II. गटांमध्ये चर्चा करून खालिल प्रश्नांची उत्तरे लिहा :**

4. सामाजिक स्तर म्हणजे काय?
5. सामाजिक स्तर कसे निर्माण झाले आहे?
6. पूर्वग्रह म्हणजे काय?
7. अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यासाठीच्या घटनात्मक आणि कायदेशीर उपाययोजनांचे विवरण करा.
8. अस्पृश्यते सारख्या सामाजिक कलंकाला दूर करण्यासाठी तुमच्या सूचना काय आहेत?

**III. उपक्रम :**

1. अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रयत्न करणाऱ्या समाज सुधारकांची चरित्रे वाचा.

**IV. प्रकल्प :**

1. अस्पृश्यता निर्मूलनासाठी तुमच्या योजना लिहा आणि शिक्षकांची चर्चा करा.

***

NOT TO BE REPUBLISHED
©KTBS

# प्रकरण - 9

# श्रम आणि आर्थिक जीवन

N8F2A3

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया :**

- *श्रम विभागणी आणि विविध वर्ग.*
- *श्रमांतील भेदभाव.*
- *बेरोजगारी, प्रकार, कारणे, परिणाम, आणि उपाययोजना.*
- *संघटित आणि असंघटित कामगार.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

एखाद्या उद्दिष्टपूर्तीसाठी केले जाणारे कार्य म्हणजे 'श्रम'. एखाद्या व्यक्तीच्या ऊर्जा आणि प्रयत्नातून त्याला आर्थिक किंवा वस्तू रुपात मोबदला मिळतो त्याला 'श्रम' असे संबोधले जाते.

श्रम आपल्या आर्थिक जीवनातील महत्त्वाचे अंग आहे. जीवन जगण्यासाठी श्रम आवश्यक आहेत. यामुळे जीवनाच्या गरजा पूर्ण करता येतात. आर्थिक जीवनाशी संबंधित श्रमाचे रूप, स्वरूप, समाजाप्रमाणे वेगवेगळे असते. हे काळाप्रमाणे बदलत असते.

**श्रम विभागणी व विविध वर्ग :**

कोणतीही व्यक्ती, एखादे काम त्याची इच्छा, अभिरुची, सामर्थ्य, वय, विशेष प्राविण्य, कौशल्य आणि लिंग भेद आधारित विभाजन करून पूर्ण करते याला श्रम विभागणी म्हटले जाते.




उदा:- आपण परिधान केलेले कपडे तयार करण्यासाठी शेतकरी, विणकर, चित्रकार, रंगकाम करणारे, शिंपी हे वेगवेगळ्या स्तरावर काम करतात.

श्रम विभागणी विशेष प्रावीण्याला कारणीभूत ठरते, विशेष प्रावीण्य म्हणजे

कोणत्याही निर्दिष्ट क्षेत्रात खूप प्रावीण्य प्रशिक्षण किंवा कौशल्य मिळविणे असा अर्थ होतो. श्रम विभागणी लोकांना विविध क्षेत्रात परिश्रम करून आर्थिक लाभ मिळविण्यास सहाय्यक ठरते. आर्थिक हितसंबंध आणि श्रम विभागणीमुळे आधुनिक काळात वर्णव्यवस्था निर्माण झाली. औद्योगिकीकरणामुळे आजच्या औद्योगिक समाजात विशेष प्रावीण्याला प्राधान्य जास्त आहे. त्याने व्यापक स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे औद्योगिकीकरण व उद्योग मोठ्या प्रमाणात वाढले व उद्योगधंदे विस्तारले आहेत.

**मजुरी सहित व मजुरी रहित श्रम :**

मजुरी, पगार अथवा कोणत्याही भौतिक स्वरूपाची प्रतिफल देणारी क्रिया म्हणजेच मजुरी सहित श्रम होय. आर्थिक फायद्यासाठी शेतात काम करणे, कारखान्यात काम करणे, शाळेत अध्यापन करणे, बांधकाम करणे, वाहन रिपेरी करणे वगैरे कार्यात सहभाग घेणे, गुंतणे हे आजच्या गुंतागुंतीच्या समाजातील जीवनासाठी आवश्यक आहे.

सर्व मानवी क्रिया श्रम प्रधान नसतात, त्यांना श्रम म्हणून संबोधले जात नाही. श्रम काहीवेळा आर्थिक लाभ किंवा प्रतिफल न मिळणारे असते. मनाच्या आनंदाच्या दृष्टीने माणसाने स्वतःला कार्यात गुंतविणे म्हणजे मजुरी रहित श्रम होय. उदा:- आत्मसंतोषासाठी एखादा चित्रकार चित्रकलेत गुंतलेला असेल इत्यादी पण जात आणि वर्णभेद असणाऱ्या समाजात खालच्या वर्गातील आणि काळ्या (कृष्णवर्णीय) लोकाना सक्तीने मजुरी शिवाय श्रम करायला लावत असत.

**श्रमातील भेदभाव :**

श्रम आणि मजुरी यांच्या वितरणात दिसून आलेल्या असमानतेला श्रमातील भेदभाव म्हणतात. स्त्री-पुरुष दोघेही कामात गुंतले असले तरी त्यांचे उद्योग समान नाहीत. भारतासहीत जगभरातल्या देशात पुरुषाना चांगल्या नोकऱ्या दिल्या जात आहेत. तसेच पगार दिला जात आहे पण स्त्रियांना कमी दर्जाचे उद्योग व कमी पगार दिला जात आहे. हा भेदभाव सरकारी क्षेत्रात दुर्मिळ, परंतु असंघटित क्षेत्रात जास्त दिसून येतो.

स्त्री-पुरुष श्रमाच्या बाबतीत संबंधित आणखी एक भेदभाव आहे. नोकरीच्या जास्त संधी उपलब्ध असल्यामुळे स्त्रिया मोठ्या प्रमाणात नोकरीत सहभागी होत आहेत. पण त्यांना देण्यात येणाऱ्या पगारात मात्र भेदभाव केला जातो. पुरुषांच्या बरोबरीने काम

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

करण्याच्या संदर्भात त्यांना कमी पगार दिला जातो. हे एक प्रकारचे शोषणच आहे. हे दूर करण्यासाठी केंद्र सरकारने समान वेतन कायदा (1976) मध्ये जारी केला त्यामुळे शहराच्या संघटित क्षेत्रात असा वेतन भेदभाव कमी झाला आहे.

कृषी क्षेत्रात ही लिंग, वय, सामर्थ्याच्या आधार वर कामाची असमान वाटणी केली जाते. मजुरी देताना सुद्धा या क्षेत्रात भेदभाव केला जातो. जसजसे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे तसतसे भेदभाव कमी होत आहेत.

**बेरोजगारी :**

भारताच्या आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेला डोकेदुखी झालेली समस्या म्हणजे बेरोजगारी. विकसनशील देशामध्ये ही समस्या गंभीर आहे. बेरोजगारी म्हणजे कामाचे वय, सामर्थ्य, इच्छा, पात्रता असूनही रोजगार न मिळणारी परिस्थिती असा होतो. काम करण्यास इच्छुक असूनही, काम करण्याच्या वयातही पुरुष व स्त्री रोजगार मिळण्यापासून वंचित राहीले तर त्यांना बेरोजगार म्हणतात.

बेरोजगारीला अनेक कारणे आहेत. त्यामध्ये वाढती लोकसंख्या, यांत्रिकीकरण श्रमाचे अति विभाजन, सामाजिक असमानता, भांडवलाची कमतरता, निरक्षरता यांचा समावेश होतो.

बेरोजगारी समाजावर वाईट परिणाम करते. ही बेरोजगारीची समस्या गरिबी, अनारोग्य, भ्रष्टाचार, कौटुंबिक विघटन, फसवणूक, चोरी या परिणामांना कारणीभूत ठरते. ही अत्यंत गंभीर अशी सामाजिक समस्या आहे.

**बेरोजगारी समस्येवर उपाययोजना :**

> **चर्चा करा :**
> *बेरोजगारी ही समस्या नाही. रोजगाराच्या संधी असल्या तरी त्या संधींचा उपयोग न करून आपण बेरोजगारी निर्माण करतो.*

बेरोजगारी समस्याचे निवारण करण्यासाठी सरकारने अनेक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्या म्हणजे लोकसंख्या नियंत्रण उपाय, चांगल्या उद्योगासाठी प्रोत्साहन, औद्योगिक क्षेत्राची अभिवृद्धी, शैक्षणिक सुधारणा योजना, पंचवार्षिक योजना, कौशल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन,

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ग्रामीण अभिवृद्धी योजना, रोजगार हमी योजना इत्यादी. अलिकडच्या काळात भारताने 'माहिती आणि तंत्रज्ञान' क्षेत्रात बरीच प्रगती केली असून रोजगारामध्ये अशा सेवा क्षेत्राची भूमिका खूप महत्त्वाची आहे.

**तुम्हाला माहिती आहे का ?**

*ग्रामीण भागात आज बेरोजगारीच्या समस्येपेक्षा कामगारांची कमतरता अधिक भासत आहे. ग्रामीण युवक-युवती काम शोधण्यासाठी शहराकडे धाव घेत आहेत. ग्रामीण भागात कृषी क्षेत्रात काम करण्यासाठी कामगार मिळत नाहीत यामुळे कृषी क्षेत्रातील कामे कमी होत आहेत हे आपल्याला दिसून येते. त्याचप्रमाणे शहरी भागात निर्दिष्ट विशेष तज्ञ कामगारांची कमतरता दिसून येते.*

**संघटित आणि असंघटित कामगार :**

**संघटित कामगार :**









कायदे आणि नियमांचे पालन करणाऱ्या विशिष्ट कार्यक्षेत्रात काम करणाऱ्यांना संघटित कामगार म्हणतात. संघटित क्षेत्रात प्रत्येक कामगाराच्या कामाचे विशिष्ट नियम आणि अटी असतात.

संघटित क्षेत्रात पदानुक्रमांची श्रेणी असते. संघटित कामगारांना विशेष कौशल्य, प्रशिक्षण, प्रतिभा, अनुभव आणि शैक्षणिक पात्रता यावर संधी दिली जाते. यांचे सर्व काम लिखित स्वरूपात असते. यांना निश्चित वेतन, (विश्रांती) विराम वेतन, भत्ता, निवृत्ती वेतनाचे फायदे दिले जातात वैद्यकीय सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत हे फक्त निर्धारित वेळेत कार्य करत असतात.

खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग, सरकारी विभाग, शाळा कॉलेज, व्यापारी बँका, विमा कंपन्या, सैन्य अशा अनेक क्षेत्रातील कामगारांना संघटित कामगार म्हणून ओळखले जाते.

**असंघटित कामगार :**









© KTBS Not to be republished

कोणत्याही विशिष्ट कायद्याच्या किंवा संस्थेच्या नियंत्रणाशिवाय जीवन जगण्यासाठी स्वतः आपल्या पुरते दररोज किंवा इतर रूपात आर्थिक लाभ मिळविणाऱ्या श्रमिकांना असंघटित कामगार म्हणतात. असंघटित कामगारांचे कार्यक्षेत्र विशाल आहे या क्षेत्रावर सरकारचे नियंत्रण नाही.

घरकाम करणारे, शेतमजूर, कृषी कामगार, तसेच स्वतः रस्त्यावर भाजीपाला विक्री करणारे, साहित्य विक्री, वाहन रिपेरी (दुरुस्ती), गाड्यांवरून भाजीपाला व इतर वस्तू घेऊन फिरत विक्री करणारे असंघटित कामगार म्हणून ओळखले जातात.

**असंघटित कामगारांच्या समस्याः**

असंघटित कामगारांच्या कामासाठी कोणताही निश्चित वेळ, नियम, कायदे नाहीत. यांच्या कामाला कमी मोबदला दिला जातो. कोणत्याही मोफत वैद्यकीय सुविधा यांना मिळत नाहीत. यांच्या कामात सुरक्षा, निश्चित वेतन, निवृत्ती वेतन, विश्रांती वेतन आणि भत्ता या सुविधा उपलब्ध नसतात. त्याच प्रमाणे मालकांकडून विविध प्रकारच्या शोषणांना सामोरे जावे लागते.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. श्रम विभागणी __________ ला कारणीभूत आहे.
2. विशेष प्रशिक्षण नसलेल्या कामगारांना __________ कामगार म्हणून ओळखले जाते.
3. विशेष प्रशिक्षण कौशल्य असणाऱ्या कामगारांना __________ कामगार म्हणून ओळखले जाते.

**II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :**

4. श्रम विभागणी म्हणजे काय?
5. मजुरी सहित श्रम म्हणजे काय?
6. बेरोजगारी म्हणजे काय?

7. बेरोजगारीची कारणे कोणती?

8. बेरोजगारीचे परिणाम कोणते ?

**III. खालील प्रश्नांची उत्तरे गटात चर्चा करून लिहा :**

9. श्रमातील भेदभावाचे स्वरूप स्पष्ट करा.

10. बेरोजगारी समस्येला कोणते उपाय आहेत? स्पष्ट करा.

11. संघटित आणि असंघटित कामगारांमध्ये काय फरक आढळतो ?

**IV. उपक्रम :**

1. तुम्ही राहात असलेल्या परिसरातील संघटित आणि असंघटित कामगारांच्या नावांची यादी करा.

**V. प्रकल्प :**

1. तुमच्या प्रदेशातील असंघटित कामगारांची मुलाखत घेऊन त्यांच्या समस्यांचा अहवाल तयार करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

प्रकरण - 10

# भारत-भौगोलिक स्थान आणि प्राकृतिक वैशिष्ट्ये

R7K9G2

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *आपल्या देशाची महानता आणि वारसा.*
- *भारत नावाची उत्पत्ती आणि पार्श्वभूमी.*
- *भारताचे भौगोलिक स्थान, विस्तार, भू आणि जल सीमा आणि शेजारील देश.*
- *भारताची प्राकृतिक वैशिष्ट्ये.*
- *भारताचे प्राकृतिक विभाग.*
- *पर्वत, मैदाने आणि किनारपट्टीचे प्रदेश, उंच प्रदेश, बेटे.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भारत प्राचीन काळापासून विविधतेत एकता दर्शवितो. संपूर्ण जगात आपला देश अद्वितीय असा आहे आणि आपल्या देशाने समृद्ध वारसा जपलेला आहे. जेव्हा आपण विविध स्वाभाविक लक्षणे, हवामान परिस्थिती, नैसर्गिक वनस्पती आणि लोकांचे निरीक्षण करतो तेव्हा आपल्याला वाटते की या देशाला उपखंड म्हटले जाऊ शकते.




**जगात भारताचे स्थान**

**जगात भारताचे स्थान:** भारत हा आग्नेय आशियामध्ये स्थित एक द्वीपकल्प आहे. त्याला 'इंडिया' आणि 'हिंदूस्थान' असेही म्हणतात. इंडिया हे नाव सिंधू नदीमुळे आले आहे. 'भारत' हे नाव प्राचीन भारतीय राजा भरत यांच्या नावावरून देण्यात आले आहे. भौगोलिक दृष्ट्या भारत संपूर्ण उत्तरगोलार्ध आणि पूर्वगोलार्धात आहे. उत्तर दिशेला रूंद पसरलेला आहे. दक्षिणेला त्रिकोणाकृती निमूळता होत गेलेला असून हिन्दू महासागरात पसरलेला आहे.




©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**आकार:** भारताचे एकूण क्षेत्रफळ 32,87,263 चौरस किलो मीटर आहे. भूभागाच्या दृष्टीने भारत जगातील सातव्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे. जगाच्या एकूण भूभागापैकी सुमारे 2.4% व्यापलेला आहे. 28 राज्ये आणि 8 केंद्र शासित प्रदेश आहेत. नवी दिल्ली 'नॅशनल कॅपिटल टेरिटरी' (NCT -National Capital Territory) म्हणूनही ओळखली जाते. 2011च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या 121 कोटी आहे. जगाच्या लोकसंख्येच्या सुमारे 17.50% आहे. भारत जगात लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे आणि चीनच्या मागे आहे.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

*दोन राजधान्या असणारी भारतातील राज्ये/ केंद्रशासित प्रदेश*

*1. जम्मू आणि काश्मीर -श्रीनगर (उन्हाळी राजधानी) आणि जम्मू*

*2. उत्तराखंड - गैरसेन (उन्हाळी राजधानी) आणि देहराडून*

*3. हिमाचल प्रदेश -शिमला आणि धर्मशाळा.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## भारताचे स्थान :

भारत भौगोलिकदृष्ट्या उत्तर गोलार्ध आणि पूर्व गोलार्ध यांच्यामध्ये वसलेला आहे. हा दक्षिण आशियातील एक प्रमुख द्वीपकल्प आहे, भारताचा मुख्य भूभाग $8^0.4^I$ ते $37^0.6^I$ उत्तर अक्षांश आणि $68^0.7^I$ ते $97^0.25^I$ पूर्व रेखांश दरम्यान विस्तारलेला आहे. उत्तरेकडील लडाख ते दक्षिणेकडील कन्याकुमारी हे एकूण अंतर 3214 कि.मी. आहे. तर पश्चिमेकडून पूर्वेकडे 2933 कि.मी. लांब आहे. अंदमान आणि निकोबार बेटे अजूनही दक्षिणेकडे विस्तारित आहे. निकोबार बेटामधील **इंदिरा पॉइंट** हे भारताचे दक्षिणेकडील टोक आहे. ते $6^0.45^I$ उत्तर अक्षांशावर आहे.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

| देश | भारताची भूसीमा किलोमीटरमध्ये |
|---|---|
| पाकिस्तान | 3310 |
| अफगाणिस्थान | 80 |
| चीन | 3917 |
| नेपाळ | 1752 |
| भूतान | 587 |
| म्यानमार | 1458 |
| बांगलादेश | 4096 |
| श्रीलंका | जलसीमा |
| मालदीव | जलसीमा |
| **भारत** | **15200 की.मी.** |

दुसरीकडे लडाखमधील **इंदिराकोल** हे भारताचे सर्वात उत्तरेकडील टोक आहे. भारताच्या

मध्यभागातून (पूर्व-पश्चिम) कर्क वृत्त ($23^0.30^I$ उत्तर अक्षांश) जाते आणि $82^0.30^I$ पूर्व रेखांश (प्रयागराज/अलाहाबाद) देशाच्या मध्यभागातून (उत्तर-दक्षिण) जाते. हे भारताचे मध्य रेखांश आहे आणि भारतीय प्रमाण वेळ (IST-Indian Standard Time) या रेखांशावर आधारित आहे.

**आघाडीचे आणि शेजारिल देश :** भारत एक द्वीपकल्प असल्याने त्याच्याकडे भूसीमा आणि जलसीमा दोन्ही आहेत. भारताला 15200 किलो मीटर भूसीमा आणि 6100 किलो मीटर लांबीची किनारपट्टी लाभली आहे. बेटेपकडून 7516.60 कि.मी. ची एकूण किनारपट्टी आहे.

भारताची भूसीमा 7 राष्ट्रांशी जोडलेली आहे. भारताच्या वायव्येला अफगाणिस्तान आणि पाकिस्तान, उत्तरेला नेपाळ, भूतान आणि चीन, पूर्वेकडे म्यानमार आणि बांगलादेश या देशाना भूसीमा व्यापलेली आहे. तसेच दक्षिणेला श्रीलंका आणि नैऋत्येला मालदिव. हे भारताच्या शेजारील देश आहेत.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**
- भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सीमारेषेला 'रॅडक्लिफ रेषा' म्हणतात.
- भारत आणि चीन यांच्यातील सीमारेषेला 'मॅकमोहन रेषा' म्हणतात.
- भारत आणि अफगानिस्थान यांच्यातील 'ड्युरांड रेषा' म्हणतात.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## भारताची प्राकृतिक वैशिष्ट्ये

भारतामध्ये विविध भौगोलिक क्षेत्रे आहेत. ही भूस्वरूपे देशाच्या विविध भागात आढळतात. भिन्न भौगोलिक कालखंड, भौगोलिक वैशिष्टये आणि भूस्वरूपातील विविधता आणि भूमीवरील लक्षणांच्या आधारावर भारताची चार प्रमुख प्रकारात विभागणी केली आहे.

### 1. उत्तरेकडील पर्वत:

उत्तरेकडील हिमालय पर्वत रांगामध्ये जगातिक सर्वोच्च शिखरे, खोलदऱ्या आणि हिमनद्या आहेत. हिमालय पर्वतरांगा पश्चिमेकडिल पामीर ग्रंथीपासून पसरलेल्या आहेत आणि पूर्वेला अरुणाचल प्रदेशापर्यंत सुमारे 2500 कि.मी. पसरलेल्या आहेत. या पर्वत श्रेणींचे तीन समांतर पर्वत रांगा आहेत.

अ) शिवालिक पर्वत रांगा (हिमालयाच्या पायथ्याशी)
ब) हिमाचल (मध्य हिमालय)
क) सर्वोच्च हिमालय (हिमाद्री)

**अ) शिवालिक पर्वत रांगा :**

ही हिमालयातील सर्वात अलिकडील निर्मिती असून ही हिमालयाच्या दक्षिणेला वसलेली आहे. या अत्यंत कमी उंचीच्या रांगा आहेत. याला हिमालयाच्या 'पायथ्याच्या टेकड्या' असेही म्हणतात. येथे सपाट मैदाने आणि दऱ्या निर्माण झाल्या आहेत, त्यांना 'डून्स' म्हणतात. उदा. देहराडून, कोटा, पाटली, चौकंबा, उधमपूर आणि कोटली हे समुद्र सपाटीपासून 600-1500 मी. उंचीवर आहेत.

**ब) हिमाचल (मध्य हिमालय) :**

सर्वोच्च हिमालय आणि शिवालिक पर्वत रांगामध्ये 3600 मी. ते 4500 मी. उंचीवर हिमाचल वसलेला आहे. हे 60 ते 80 कि.मी. रुंद आहेत. येथे अनेक समांतर पर्वत रांगा आहेत उदा - पीरपंजाल, महाभारत, नागतिब्बा, मसुरी इ. कांग्रा आणि कुलू या प्रसिद्ध दऱ्या आहेत. शिमला, मसूरी, नैनिताल, रानीखेत, चकराता आणि दार्जिलिंग अशी थंड हवेची ठिकाणे आहेत.

**क) सर्वोच्च हिमालय (हिमाद्री) :**

ही हिमालयातील सर्वोच्च शिखरे आणि हिमालयाच्या सुरवातीला तयार झालेल्या पर्वतरांगा आहेत. या पर्वतरांगा बर्फानी व्यापलेल्या आहेत. म्हणून त्यांना 'हिमाद्री' असे म्हणतात. हे सुमारे समुद्र सपाटीपासून 6000 मी. ते 8000 मी. उंचीवर आहेत. यामध्ये 'माऊंट एव्हरेस्ट' (सुमारे 8848 मीटर) हे जागतिक सर्वोच्च शिखर नेपाळ आणि तिबेटच्या सीमेवर आहे. इतर प्रमुख शिखरे म्हणजे कांचनजंगा, धवलगीरी, नंदादेवी, गौरीशंकर इ. या शिखरांवर अनेक हिमनद्या आहेत, त्यापैकी सर्वांत प्रसिद्ध गंगोत्री ही गंगा नदीचे उगमस्थान आहे. काश्मिरमधील बुर्जील, जोजिला, हिमाचल प्रदेश मधील बारालाचा अशी अनेक स्थळे आहेत. जी दऱ्यातील मार्ग वाहतूक सुविधा आणि पर्यटन आकर्षणांची केंद्रे बनली आहेत.

सर्वोच्च हिमालयाच्या उत्तरेला असलेल्या अनेक थरातील पर्वतरांगांना 'बाह्य हिमालय' म्हणतात. यामधील काराकोरम पर्वतरांगा आणि कैलास पर्वतरांगाचा समावेश आहे. 'गॉडविन ऑस्टिन' किंवा K2 (सुमारे 8611मी.) हे भारतातील सर्वोच्च शिखर आहे. लडाखचे पठारही याच प्रदेशात आहे.

**हिमालयाचे महत्व :** हिमालय पर्वतांनी भारतीयांच्या जीवनावर मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकला आहे. सिबेनियन प्रदेशातून येणाच्या थंड वाऱ्यांना अडथळा निर्माण करून भारताला संरक्षण दिले आहे. ते अनेक नद्यांचे उगमस्थान आहे. जलविद्युत शक्ति निर्माण

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

करण्यासाठी उपयोगी आहे. ते अनेक प्रकारच्या वनस्पती आणि प्राण्यांची आश्रय स्थान बनले आहे. अनेक प्रकाराच्या खनिज संपत्तींनी समृद्ध आहे. त्याचबरोबर येथे महत्वाची पर्यटन आणि धार्मिक स्थळे आहेत.

**2. उत्तरेकडील महामैदाने :**

उत्तरेकडील महामैदानांना 'सतलज-गंगा मैदाने' असेही म्हणतात. उत्तरेकडील हिमालय पर्वत आणि दक्षिणेकडील द्वीपकल्पीय पठार यांच्यामध्ये ही मैदाने आढळतात. ही मैदाने पश्चिमेला सिंधू नदीच्या मैदानापासून पूर्वेला ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यापर्यंत पसरलेली आहेत. त्यांची लांबी सूमारे 2400 कि.मी. आहे. तर 70 कि.मी. ते 500 कि.मी. रूंदी आहे. येथे सपाट मैदाने असून त्यांच्या उंचीमध्ये कमीत कमी फरक आढळतो. हिमालयातून उगम पावलेच्या नद्यानी आणलेल्या गाळयूक्त मातीच्या संचनाने संपूर्ण मैदाने तयार झाली आहेत.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

***बबर, भांगर आणि खादर:*** *हिमालयातून वाहणाऱ्या नद्या आपल्या सोबत खडक वाहून आणतात ते खडक जेथे साचतात त्याला 'बबर' असे म्हणतात. प्राचिन काळातील चिकणमाती असलेल्या भागाला 'भांगर' म्हणतात. अलिकडच्या काळात तयार होणाऱ्या चिकण मातीच्या संचनाला 'खादर' म्हणतात.*

*'राधानाथ सेक्दर' हे एव्हरेस्ट शिखराची उंची अचुकपणे ठरणारे पहिले व्यक्ती होते. ग्रेट ट्रिगोनोमेट्रिकल सर्व्हे ऑफ इंडिया मध्ये ते कार्यरत होते.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**3. द्विपकल्पीय पठार:** द्वीपकल्पीय पठार हे भारतातील सर्वात मोठा प्राकृतिक विभाग आहे. शिवाय सर्वात प्राचीन आहे आणि पृथ्वीच्या सुरवातीच्या काळात अस्तित्वात गोंडावन भूप्रदेशाचा आहे.

द्वीपकल्पीय पठार सतलज-गंगा मैदानाच्या दक्षिणेपासून हिन्दू महासागरापर्यंत पसललेले आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे 16 लाख चौ.कि.मी. आहे. हे उत्तरेला अरावली पर्वतापासून दक्षिणेला कन्याकुमारीपर्यंत पसरलेला आहे. ते अंदाजे 1400 कि.मी. पर्यंत पसरलेला आहे. पश्चिमेला पश्चिमघाटापासून पूर्वेला झारखंडच्या राजमहाल टेकड्यांपर्यंत. हे पठार आकाराने त्रिकोणाकृती असून उत्तरेकडे रूंद आणि दक्षिणकडे अरूंद आहे. याला पश्चिमेला अरबी समूद्र, पूर्वेला बंगालचा उपसागर आहे.




द्वीपकल्पीय पठाराच्या उत्तरेला, आपल्याला प्रामूख्याने विंध्य पर्वत, सातपुडा टेकड्या, माळवा पठार, छोटा नागपूर पठार आणि नर्मदा, तापी आणि दामोदर या सारख्या नद्या आढळतात. त्याचबरोबर त्यांच्या उपनद्याही वाहतात. या सर्वांना मिळून 'मध्य पठार' असेही म्हणतात. याच्या दक्षिणेला दख्खनचे पठार आहे. दख्खनच्या पठाराच्या उत्तरेला महादेव आणि मयखल पर्वत रांगा, अमरकंटक टेकड्या, राजमहल टेकड्या आहेत.

दख्खनच्या पठाराच्या पश्चिमघाट आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक हे प्रदेश यामध्ये मोडतात त्याला 'सह्याद्री' असे संबोधले जाते. अन्नामलाई पर्वतरांगेतील 'अनैमुडी' (2665 मीटर) हे दक्षिण भारतातील सर्वोच्च शिखर आहे. दख्खनच्या पठाराच्या पूर्वेला पूर्व घाट आहे. पूर्व घाट आणि पश्चिमघाट हे निलगिरी टेकड्यामध्ये एकमेकांस जाडले जातात. पूर्व घाट फार उंच किंवा सतत नसून तूटक आहे. पूर्व घाटात 'आर्मकोंडा' आणि 'महेंद्रगिरी' ही सर्वोच्च शिखरे आहेत. हे घाट नद्यांच्या दऱ्यांनी इकडे तिकडे असे वेगळे झाले आहेत.

द्वीपकल्पीय पठाराचे मोठे आर्थिक महत्व आहे, याचे कारण म्हणजे या पठारात खनिजांचे भरपूर साठे आहेत. वेगवेगळ्या नद्यांवर धबधबे निर्माण झाल्याने जलविद्युत शक्ति निर्मितीसाठी सर्वात योग्य आहे.

**4. किनारपट्टीची मैदाने :**

बेटांव्यतिरिक्त भारताला 6100 किलोमीटरची किनारपट्टी लाभली आहे. गुजरातच्या कच्छ प्रदेशापासून सुरु होणारी किनारपट्टी पूर्वेला गंगा नदीच्या खोऱ्यापर्यंत पसरलेली आहे. किनाऱ्यालगतच्या अरूंद मैदानाला 'तटीय मैदान' म्हणतात. भारतीय किनारपट्टी ही पश्चिम किनारपट्टी आणि पूर्व किनारपट्टीमध्ये विभागली गेली आहे.

पश्चिम किनारा गुजरातच्या कच्छच्या आखातापासून दक्षिणेला कन्याकुमारीपर्यंत पसरलेला आहे. त्याची लांबी 1500 की.मी. आहे. हे पुढे केरळ मधील मलबार किनारा, कर्नाटकातील कॅनरा किनारा, गोवा आणि महाराष्ट्रातील कोंकन किनारा आणि गुजरात किनारा येथ पर्यंत पसरलेला आहे. मुंबई, मार्मगोवा, कोचिन, कांडला, कारवार आणि मंगळूर ही या किनाऱ्यावरील प्रमुख बंदरे आहेत. पूर्वेकडिल किनारी मैदाने दक्षिणेकडिल कन्याकुमारीपासून उत्तरेकडिल गंगा नदीपर्यंत पसरलेली आहेत. पूर्व किनारपट्टी बंगालचा उपसागर आणि पूर्व घाट यांच्यामध्ये स्थित आहे. ही किनारपट्टी खूप विस्तृत आणि सपाट आहे. यामध्ये महानदी, गोदावरी, कृष्णा आणि कावेरी नद्यांच्या त्रिभूज प्रदेशांचा समावेश आहे. पूर्व किनाऱ्यावर काही खाऱ्या पाण्याची सरोवर आहेत. ओरिसाचे 'चिल्का' सरोवर आणि आंध्रप्रदेशचे 'पुलिकत' सरोवर हे महत्वाची आहेत. पूर्व किनारा उत्तरेच्या उत्कल किनारपट्टीपासून दक्षिणेला कोरोमंडळ किनारपट्टी पर्यंत विभागला गेला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**बेटे :**

भारतात एकूण 247 बेटे आहेत. त्यापैकी 204 बंगालच्या उपसागरात आणि 43 अरबी समुद्रात आहेत. मन्नारच्या आखातात काही प्रवाळ बेटे आहेत. बंगालच्या उपसागरातील अंदमान आणि निकोबार बेटे कठोर ज्वालामुखीच्या खडकांपासून तयार झाली आहेत. लक्षद्वीप बेटे ही प्रवाळ बेटे आहेत. भारताच्या शेवटचे दक्षिणेकडिल टोक ग्रेट निकोबार बेटावर आहे. याला 'इंदिरा पॉईंट' म्हणतात.

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. इंडिया हे नाव ___________ नदीवरून आले आहे.
2. भारताचे एकूण क्षेत्रफळ ___________ चौ.कि.मी.आहे.
3. भारताच्या मध्य भागातून ___________ उत्तर अक्षांश जाते.
4. भारताला ___________ कि.मी.ची किनारपट्टी लाभली आहे.
5. भारत प्रमुख ___________ विभागामध्ये विभागला आहे.
6. सर्वोच्च हिमालयाला ___________ असेही म्हणतात.
7. जगातील सर्वोच्च शिखर ___________ हे आहे.
8. उत्तरेलडीक महामैदानी प्रदेश ___________ या मातीने बनला आहे.
9. पश्चिम घाटाला कर्नाटकात ___________ या नावाने ओळखतात.

**II. खालिल प्रश्नांची उत्तरे गटामध्ये चर्चा करून लिहा :**

10. भारत आशिया खंडाच्या कोणत्या भागात वसलेला आहे?
11. भारत पृथ्वीच्या कोणत्या गोलार्धात आहे?
12. भारताच्या मुख्य भूमीचे दक्षिण टोक कोणते?
13. मध्य भारतातून जाणारा महत्वाचा अक्षांश कोणता?
14. भारताचे दक्षिणेकडील शेवटचे टोक कोणते?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

15. भारतातील अलिकडेच तयार झालेला भूभाग कोणता?

16. हिमालयाचे फायदे स्पष्ट करा.

17. द्वीपकल्पीय पठाराचा विस्तार लिहा.

18. शिवालिक रांगेबद्दल लिहा.

19. उत्तरेकडील मैदानाला संचित मैदान म्हणतात का?

20. पूर्व घाट आणि पश्चिम घाट यांच्यातील फरक स्पष्ट करा.

**III. उपक्रम :**

1. भारताचा नकाशा काढून अक्षांश आणि रेखांश तसेच भारताच्या मध्य भागातून जाणारे $23\frac{1}{2}^{o}$ अक्षांश दाखवा.
2. भारताचा नकाशा काढून प्रमुख पर्वतरांगा, पूर्व आणि पश्चिम घाट दाखवा.
3. तुम्ही मंगलोर, धर्मस्थळ आणि इतर निसर्गरम्य स्थळांच्या भेटीवेळी घाट माथ्याच्या विभागातून प्रवास करत असतानाचे अनुभव तुमच्या शिक्षकांना सांगा.

**IV. प्रकल्प :**

1. भारताचा नकाशा काढा आणि शिक्षकांच्या मदतीने विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश दर्शवा.
2. भारताचा नकाशा काढून शेजारील देश दाखवा.
3. पश्चिम घाट आणि कर्नाटकाच्या मैदानी प्रदेशातील विविधतेची माहिती मिळवा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## प्रकरण - 11

# भारताचे हवामान

L7Q1T6

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *भारतातील हवामानाची प्रमुख लक्षणे.*
- *भारतातील ऋतू आणि हवामानाची परिस्थिती.*
- *भारताच्या ऋतुमानानुसार पावसाची विभागणी आणि परिणाम.*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

या प्रकारच्या हवामानात वेगवेगळ्या ऋतूंमध्ये वारे विरुद्ध दिशेने वाहतात. भारतात उष्णकटिबंधीय मान्सूनच्या सर्व प्रकारच्या मान्सून हवामानाची लक्षणे आढळतात. वर्षाच्या पहिल्या सहामाहीत वारे नैऋत्येकडून ईशान्येकडे वाहतात आणि दुसऱ्या सहामाहीत ईशान्येकडून नैऋत्येकडे वाहतात. भौगोलिकदृष्ट्या भारत उष्णकटिबंधात आणि समशीतोष्ण कटिबंधात विभागला आहे. त्यामुळे अक्षांश, समुद्रसपाटीपासूनची उंची, समुद्रापासूनचे अंतर, वाऱ्यांच्या दिशा, पर्वत रांगा, सागरी प्रवाह इ. देशाच्या हवामानावर प्रभाव पडतो.

**हे माहीत असू द्या :**
*मान्सून हा शब्द 'मौसिम' या अरबी शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ 'ऋतू' असा आहे.*

**भारतीय हवामान 4 ऋतूंमध्ये विभागले आहे :**

1) उन्हाळा - मार्च ते मे

2) नैऋत्य मान्सून किंवा पावसाळा - जून ते सप्टेंबर

3) मान्सूनच्या परतीचा मोसम - ऑक्टोबर ते नोव्हेंबर

4) हिवाळा - डिसेंबर ते फेब्रुवारी

**1) उन्हाळा :** भारतात उन्हाळा मार्चच्या पहिल्या आठवड्यात प्रारंभ होऊन मे महिन्याच्या शेवटपर्यंत असतो. या अवधीत सूर्याची लंबरूप किरणे उत्तर गोलार्धात पडतात, त्यामुळे उष्णता जास्त असते. दिवस बरेच मोठे असतात. उत्तर भारतीय मैदाने समुद्रापासून दूर आहेत, म्हणून तेथील तापमान जास्त असते. राजस्थानातील

'गंगानगर'मध्ये उन्हाळ्यात कमाल 52° सें.ग्रे. इतके तापमान नोंदवले गेले आहे. म्हणून ते देशातील सर्वात उष्ण ठिकाण आहे. याउलट दक्षिण भारत तिन्ही बाजूने पाण्याने वेढलेला असल्याने तेथील तापमान मध्यम असल्याचे आढळते. उन्हाळ्यात येथील तापमान 32° सें.ग्रे. ते 35° सें.ग्रे. पर्यंत असते. या ऋतूत उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश आणि द्वीपकल्पीय पठारी प्रदेश थंड असतो काही ठिकाणी स्थानिक उष्णता आणि प्रचलित प्रवाहामुळे एप्रिल आणि मे महिन्यात पाऊस पडतो. याला पश्चिम बंगालमध्ये 'कालबैसाखी', उत्तरप्रदेशमध्ये 'आंधिस', कर्नाटकमध्ये 'कॉफी कारंजा' आणि केरळमध्ये मँगोशॉवर्स (आंबेसरी) असे म्हणतात. उन्हाळ्यात भारताच्या एकूण पावसापैकी फक्त 10% इतका पाऊस पडतो.

**2) नैऋत्य मान्सून किंवा पावसाळा :** भारतात नैऋत्य मान्सून म्हणजे पावसाळा होय. याला मान्सून वाऱ्याचे पाऊस म्हणून ओळखले जाते. हे जलाने भरलेले वारे असून भारतात जास्त भागांमध्ये पाऊस पडतो. हा ऋतू जून ते सप्टेंबर पर्यंत असतो. या काळात बहुतेक भागात दमट हवामान तयार होते आणि पाऊस पडतो. जवळ जवळ 75% पाऊस या मोसमात होतो. नैऋत्य मान्सून भारताला दोन शाखांमध्ये वेगळे करतो. एक म्हणजे अरबी समुद्राची शाखा आणि दुसरी बंगालच्या उपसागराची शाखा. अरबी समुद्रावरून वाहणाऱ्या वाऱ्यामुळे पश्चिमघाटाच्या पश्चिमेकडील भागात जोराचा पाऊस येतो. हे वारे जसजसे पूर्वेला वाहत जातात तसा पाऊस कमी होत जातो. पश्चिमघाटाच्या पूर्वेकडील प्रदेशाला 'पर्जन्य छायेचा प्रदेश' म्हणतात. बंगालच्या उपसागरातील मान्सून वाऱ्यांमुळे म्यानमार, बांग्लादेश, ईशान्य भारतीय प्रदेश, हिमालयाच्या पायथ्याशी आणि उत्तरेकडील मैदानावर पाऊस पडतो. येथून ईशान्येकडून वायव्येकडे जाताना पाऊस कमी होत जातो. तमिळनाडू प्रदेशाचा अपवाद वगळता देशातील बहुतेक प्रदेशांमध्ये नैऋत्य मान्सून दरम्यान पाऊस पडतो.

NOT TO BE REPUBLISHED
©KTBS

**3) मान्सूनच्या परतीचा मोसम :** ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात भारतीय उपखंडात खूप पाऊस पडल्यामुळे उष्णता कमी होते. तसेच सूर्याची किरणे दक्षिण गोलार्धात लंब रुपाने पडतात. त्यामुळे उत्तर गोलार्धात उष्णता कमी होते व वातावरणाचा दाब वाढू लागतो. त्यामुळे नैऋत्य मान्सूनवारे ऑक्टोबर पासून परत

> **उपक्रम :**
> *दैनिक वर्तमानपत्रात येणाऱ्या देशातील प्रमुख शहरांच्या उष्णतेचे विवरण संग्रह करून आपल्या शिक्षकांबरोबर उष्णतेमध्ये येणाऱ्या फरकाबद्दल चर्चा करा.*

जाण्यास प्रारंभ करतात. हळूहळू नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी हे वारे वाहणे बंद होतात. यालाच 'मान्सूनच्या परतीचा मौसम' म्हणतात. या मोसमात भारतात 13% पाऊस पडतो. याच कालावधीत बंगालच्या उपसागरात व अरबी समुद्रात वादळे निर्माण होतात. ही वादळे वेगवान आणि पावसाने सामावलेले असतात, यामुळे किनारपट्टीची हानी होते.

**4) हिवाळा :** हिवाळा डिसेंबर महिन्यात सुरू होऊन फेब्रुवारी महिन्याच्या शेवटपर्यंत राहतो. या मोसमात उत्तर भारतातील जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश व उत्तरेचे मैदानी प्रदेशात अत्यंत कमी तापमान दिसून येते. काही भागात उष्णता कमी होऊन तेथील तापमान गोठण बिंदूच्याखाली असते. या ठिकाणी बर्फ पडतो. दक्षिण भारतात उष्णता सामान्य असून हवामान छान असते. या मोसमात भारतात फक्त 2% पाऊस पडतो. त्यामुळे भारतात हिवाळ्यात कमी पावसाची नोंद होते.

**पावसाची विभागणी :** सामान्यत: मान्सून वाऱ्यामुळे पाऊस पडतो. पण काही वेळेला अतिवृष्टी तर काही वेळेला अनावृष्टि होते. भारतात सर्व मोसमात पाऊस पडतो. भारतात वार्षिक सरासरी पावसाचे प्रमाण 118 सें.मी. असते. तरीसुद्धा विविध मोसमात वेगवेगळ्या प्रदेशात पाऊस पडतो. पण पावसाचे प्रमाण वेगवेगळ्या भागात वेगवेगळे असते. भारतात पावसाच्या विभागणी नुसार तीन विभाग केले आहेत.




NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**1) कमी पावसाचा प्रदेश-** सुमारे 50 सें.मी. पेक्षा कमी पाऊस पडणाऱ्या प्रदेशाला कमी पावसाचा प्रदेश म्हणतात. राजस्थानचे थार वाळवंट, पंजाब, हरियाणा, गुजरातचा कच्छ प्रदेश आणि जम्मू-काश्मीर, महाराष्ट्राचा पूर्व

भाग, कर्नाटकाचा मध्य भाग हे कमी पाऊस पडणारे प्रदेश आहेत. राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यातील 'रोयली' येथे वार्षिक सरासरी 8.3 सें.मी. पाऊस पडतो. हे भारतातील सर्वात कमी पाऊस पडणारे ठिकाण आहे.

**2) मध्यम पावसाचा प्रदेश :** सुमारे 50 ते 250 सें.मी. पाऊस पडणाऱ्या प्रदेशाला मध्यम पावसाचा प्रदेश असे म्हणतात. हा प्रदेश अत्यंत कमी व अत्यंत जास्त पावसाचा प्रदेशात मोडत नाही.

> **उपक्रम :**
> *यावर्षी तुमच्या तालुक्यात झालेल्या पावसाचे प्रमाण जाणून घ्या. तुमच्या तालुक्यातील यावर्षी असलेल्या हवामानाच्या प्रकाराची मित्रांबरोबर चर्चा करा.*

**3) अतिशय जोराच्या पावसाचा प्रदेश -** सुमारे 250 सें.मी. पेक्षा जास्त पाऊस पडणाऱ्या प्रदेशाला अतिशय जोराच्या पावसाचा प्रदेश असे म्हणतात. पश्चिम घाटातील पश्चिमेकडचा प्रदेश, आसाम आणि इतर पूर्वेकडील राज्ये व पश्चिम बंगाल या प्रदेशात येतात. मेघालयातील 'मौसीनराम' येथे सर्वाधिक पाऊस पडतो. भारताच्या आर्थिक विकासावर हवामानाचा फारच मोठा परिणाम झाला आहे. कृषी हा येथील लोकांचा प्रमुख उद्योग असून नैऋत्य मान्सून हा कृषी उद्योगास मर्यादित करतो. जर मान्सून नाहीतर पिके नाहीत, त्यामुळे दुष्काळ पडतो. जेव्हा अतिपाऊस पडतो, तेव्हा महापूर येतो. त्यामुळे जीवित व वित्त हानी होते. म्हणूनच म्हटले जाते की भारतातील कृषी व्यवसाय हा 'मान्सूनचा जुगार' आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1) भारतातील ___________ हा अति जास्त उष्णता असलेला प्रदेश आहे.

2) भारतात ___________मान्सून वाऱ्यामुळे पाऊस पडतो.

3) भारतात अत्यंत कमी पाऊस पडणारा प्रदेश ___________ .

4) भारतातील जास्त पाऊस पडणारा प्रदेश ___________ .

**II. खालील प्रश्नांची उत्तरे समूहात चर्चा करून लिहा :**

5) भारतात कोणकोणत्या प्रकारचे हवामान आहे?

6) मान्सूनचे वारे म्हणजे काय?

7) परतीच्या मान्सून काळात भारतात चक्रीवादळे निर्माण होण्याची कारणे कोणती?

8) भारताच्या हवामानावर परिणाम करणारे घटक कोणते?

**III. जोड्या जुळवा :**

| | A | | B |
|---|---|---|---|
| i) | काल बैसाखी | अ) | उत्तर प्रदेश |
| ii) | आंधिस. | ब) | कर्नाटक |
| iii) | कॉपी करंजा. | क) | केरळ |
| iv) | मँगो शॉवर्स. | ड) | राजस्थान |
| | | इ) | पश्चिम बंगाल |

**IV. उपक्रम :**

1) भारताचा नकाशा काढून पावसाची विभागणी दर्शवा.

**V. प्रकल्प :**

1. तुम्ही रहात असलेल्या प्रदेशातील मोसमाच्या परिवर्तनाबद्दल तुमच्या विषय शिक्षकांकडून माहिती घेऊन प्रकल्प तयार करा.

✲✲✲

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-12

# भारतातील माती

S4G5V8

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *भारतातील मातीचे प्रकार व विभागणी.*
- *मातीची धूप आणि त्याची कारणे.*
- *मातीची धूप आणि त्याचे परिणाम.*
- *मातीचे संरक्षण आणि संवर्धन.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

माती ही नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. भारतात विविध प्रकारची माती आढळते. विविध प्रकारच्या हवामानात खडकाची झीज होऊन मातीची निर्मिती झाली आहे. काही माती विविध कारणांमुळे वाहून संचित झालेली आहे. माती ही वनस्पती आणि प्राण्यांचे कुजलेल्या जैविक अंशापासून निर्माण झालेली आहे. भारतातील मातीचे प्रकार 6 विभागात विभागले गेले आहेत. 1) गाळाची माती 2) काळी माती 3) लाल माती 4) जांब्याची (लॅटरेट) किंवा बाजूकडील माती 5) वाळवंटी माती आणि 6) डोंगरी माती.

**1) गाळाची माती :** नद्यांनी पर्वत प्रदेशातून वाहून आणून संचित केलेल्या मातीला गाळाची माती म्हणतात. भारतात या प्रकारची माती खूप मोठ्या प्रमाणात पसरलेली आहे. ही माती सुमारे 7.7 दशलक्ष चौरस कि.मी. एवढया प्रदेशात आढळते. ही उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा, पंजाब, हरियाणा, आसाम, ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यापर्यंत पसरलेली आहे. शिवाय नर्मदा आणि तापी नदीचे खोरे, द्वीपकल्पीय पठार या दोन्ही भागात असलेल्या किनारपट्टी प्रदेशात पण गाळाची माती निर्माण झालेली आहे. या मातीत गहू, भात, ऊस, कापूस आणि ताग ही महत्त्वाची पिके पिकवली जातात.

**2) काळी माती :** या मातीला 'रेगुर माती' असेही म्हणतात. ही माती कापसाच्या लागवडीसाठी उपयुक्त असते म्हणून या मातीला 'कपासीची माती' देखील म्हटले जाते. अशा प्रकारच्या मातीचा प्रदेश भारतात 5.46 लाख चौरस कि.मी. क्षेत्रात पसरला आहे. काळी मातीच्या प्रदेशाला 'डेक्कन ट्रॅप' सुद्धा म्हणतात. ही माती लाव्हारसापासून झालेल्या

खडकांचे तुकडे होऊन त्याचे मातीत रूपांतर झालेले आहे. ही माती चिकन माती असून, जेथे पावसाचे प्रमाण कमी असते तेथे ओलावा टिकवून ठेवते. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, आंध्रप्रदेशचा पश्चिम भाग आणि उत्तर कर्नाटकात ही माती आढळते. या मातीत विपुल प्रमाणात चुनखडी व मॅग्नेशियम कार्बोनेट आढळतात. ही माती कापूस, ज्वारी, गहू, कांदे, मिरची, तंबाखू, तेलबिया, लिंबू आणि द्राक्षे पिकवण्यासाठी उपयुक्त ठरते.




**3) लाल माती :** ही माती द्वीपकल्पीय पठारामध्ये पसरलेले आहे. ही सुमारे 5.18 लक्ष चौरस कि.मी. प्रदेशात पसरलेली आढळते. ही दक्षिणेच्या कन्याकुमारीपासून उत्तरेतील

मध्यप्रदेशाच्या झांशी पर्यंत व्यापलेली आहे. पश्चिमेतील गुजरातच्या कच्छ प्रदेशापासून पूर्वेतील झारखंडच्या राजमहाल टेकड्या पर्यंत व्यापलेले आहे. लाल मातीत पिकणारी प्रमुख पिके म्हणजे नाचणा, तंबाखू आणि तेलबिया व पाण्याचा पुरवठा असलेल्या ठिकाणी भात, ऊस, कापूस पिकवला जातो.

**4) जांब्याची (लॅटरेट) किंवा बाजूकडील माती :** ही माती सामान्यता 200 सें.मी. पेक्षा जास्त पाऊस पडणाऱ्या प्रदेशात निर्माण झाली आहे. जास्त पावसाच्या पाण्यामुळे क्षार विरघळून द्रवरूपात जमिनीच्या खोलवर गेलेले आहेत, त्यामुळे वरच्या पदरात न विरघळणारे लोह ऑक्साइड आणि ॲल्युमिनियम मात्र दिसतात. या मातीत सुपीकता फार कमी असते. भारतातील 2.48 लाख चौ. कि.मी. प्रदेशात ही माती आढळते. पश्चिम घाट, विंध्य पर्वत, सातपुडा टेकड्या, राजमहाल टेकड्या, पूर्वांचल प्रदेशात ही माती आढळते. ही माती चहा व मळ्याच्या शेतीसाठी उपयुक्त आहे.

**5) वाळवंटी माती :** कमी पाऊस व जास्त उष्णता यामुळे अशा प्रकारची माती तयार होते. ही माती लाल व तपकिरी रंगात असून वाळूचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्याच्यातून पाणी लवकर वाहून जाते. त्यामुळे आद्रता कमी होते. भारतात 1.4 लाख चौ. कि.मी. क्षेत्रात ही माती आढळते. ज्वारी, बाजरी, खजूर इ. पिके या मातीत पिकवली जातात. भारताच्या वायव्य दिशेचे राजस्थान, पंजाब आणि हरियाणा या राज्यात व पश्चिम गुजरातच्या कच्छ प्रदेश व अरावली पर्वताच्या रांगेच्या पश्चिम भागात ही माती विभागली गेली आहे.

**6) डोंगरी माती :** या मातीत कुजलेले जैविक अंश अधिक प्रमाणात असतात. पर्वतीय प्रदेशाच्या उतरणीवर ही माती आढळते. या मातीत नायट्रोजन आणि सेंद्रिय प्रमाण जास्त असते. ही माती कॉफी, चहा, मसाल्याचे जिन्नस व फळे पिकविण्यासाठी उपयुक्त आहे. हिमालयाच्या पायथ्याच्या टेकड्या, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तरांचल, बिहार, पश्चिम बंगाल आणि पर्वतीय प्रदेशात ही माती पसरलेली आहे.

**मातीची धूप :** भूपृष्ठावर दिसून येणाऱ्या वरच्या स्तरावर अनेक नैसर्गिक बदल होतात. या क्रियेला 'मातीची धूप' असे म्हणतात. वाहणारे पाणी, हवा, समुद्राच्या लाटा इ. मुळे मातीची धूप होते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**मातीची धूप होण्याची कारणे :** देशाच्या महत्त्वाच्या समस्यांपैकी मातीची धूप ही एक समस्या आहे. अलीकडील काळात ही समस्या वाढली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे 1. अरण्यांचा नाश, 2. जनावरांचे चरणे, 3. जुन्या पद्धतीने शेतीची मशागत, 4. पाण्याचा जास्त उपयोग, 5. पाण्याचा वेग आणि प्रवाह, 6. विटा, कौले, मडकी तयार करण्यास मातीचा वापर केल्यामुळे मातीची धूप होते.

**मातीच्या धूपेचे परिणाम :** मातीची धूप अनेक समस्यांना कारणीभूत ठरते. त्यामध्ये प्रमुख म्हणजे

1. मातीच्या धूपेमुळे नदीत गाळ साचतो, त्यामुळे पूर येण्याची स्थिती निर्माण होते.
2. नद्यांच्या मुखाजवळ गाळ साचल्याने प्रवाह बदलतात.
3. सरोवर तलावांमध्ये गाळ साचून खोली कमी होते.
4. मातीच्या धूपेमुळे मातीमध्ये पाणी शोषून घेण्याची क्षमता कमी होते, यामुळे नैसर्गिक झरे आटतात.

भारत हे कृषिप्रधान राष्ट्र असल्यामुळे मातीच्या धूपेमुळे कृषी उत्पन्नावर वाईट परिणाम होतो व उत्पादनात वाढ करण्यासाठी मातीची धूप थांबवण्याची आवश्यकता आहे.

**मातीचे संरक्षण आणि संवर्धन :**

मातीची धूप थांबवणे म्हणजेच मातीचे संरक्षण, मातीच्या संरक्षणासोबत सुपीकता राखून ठेवण्यासाठी आवश्यक पद्धतीने मातीचा उपयोग करून सतत पिकांचे उत्पादन घेणे हे मातीचे संवर्धन आहे. पंचवार्षिक योजनेमध्ये मातीची धूप थांबवण्यावर जास्त भर दिलेला आहे.

मातीची धूप थांबवण्यासाठी काही योजना हाती घेण्यात आल्या आहेत. त्या म्हणजे

1. बांधाना समांतर नांगरणी करणे.
2. पाणी वाहून जाऊ नये म्हणून बांध बांधणे.
3. आळीपाळीने वेगवेगळी पिके घेणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. जंगल तोड थांबवणे.

5. जंगल वाढीला प्रोत्साहन देणे.

6. जनावरांच्या चरण्यावर नियंत्रण ठेवणे.

7. पाण्याचा योग्य वापर करणे.

8. धरणे बांधणे इ.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

- *माती एक प्रमुख नैसर्गिक साधन संपत्ती आहे. ही राष्ट्राच्या प्रमुख संपत्ती पैकी एक आहे.*
- *अति सूक्ष्म कणांनी बनलेल्या मातीला 'चिकन माती' असे म्हणतात.*
- *वाळवंटी माती अतिशय मोठ्या कणांनी बनलेली असते.*
- *मातीची उत्पत्ती, कणांची रचना, रासायनिक संयोजन व त्याच्या परिवर्तनाच्या अध्ययनाला 'माती शास्त्र' असे म्हणतात.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा:**

1. पर्वत प्रदेशातून नद्यांनी वाहून आणून संचित झालेल्या मातीला ____________ म्हणतात.

2. काळ्या मातीच्या प्रदेशाला ____________ असेही म्हणतात.

3. राजस्थानमध्ये ____________ ही माती दिसून येते.

4. भारतात सर्वात जास्त प्रमाणात सापडणारी माती ____________

5. नाचणा आणि तेलबिया पिकवण्यासाठी ____________ माती योग्य असते.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे समूहात चर्चा करून लिहा:**

6. भारतामध्ये दिसून येणारे मातीचे मुख्य प्रकार कोणते?

7. मातीचे संरक्षण म्हणजे काय? त्याच्या विधानांची यादी तयार करा.

8. मातीची धूप म्हणजे काय? कारणे स्पष्ट करा.

9. मातीच्या धुपेचे परिणाम सांगा.

10. हिमालय पर्वतामध्ये कोणत्या प्रकारची माती दिसून येते?

**III. उपक्रम:**

1. तुमच्या तालुक्याच्या कृषि सहाय्यक निर्देशक कार्यालयाला भेट देऊन विविध प्रकारच्या मातीची यादी तयार करून त्याचे उपयोग समजून घ्या.

2. जनावरांच्या संगोपनाने मातीची धूप होते का? आपल्या शिक्षकांशी चर्चा करा.

**IV. प्रकल्प:**

1. तुमच्या घरच्या सभोवतालची अथवा शेतातील थोडी माती घेऊन आपल्या शिक्षकांच्या सहाय्याने माती परीक्षा केंद्रांमध्ये परीक्षण करा. ती माती कोणत्या पिकाला योग्य आहे ते समजून घ्या.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

✲✲✲

F1B7Y6

प्रकरण 13

# भारतातील अरण्य संपत्ती

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया :**

- *भारतातील अरण्याचे प्रकार आणि वितरण.*
- *अरण्याचे संरक्षण, संरक्षणाच्या पद्धती.*
- *वन्यजीव अभयारण्य आणि राष्ट्रीय उपवने.*
- *जैविक संरक्षण क्षेत्र.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

एका प्रदेशात नैसर्गिक रीतीने वाढलेल्या सर्व प्रकारच्या वनस्पती समूहाला अरण्ये अथवा स्वाभाविक वनस्पती समूह म्हणतात. हे नैसर्गिक घटक म्हणजे हवामान, पाऊस, वातावरण, भू-स्वरूप आणि माती यांच्यावर अवलंबून असतात. भारतात 2021 (ISFR) च्या अहवालानुसार 7,13,789 चौ. कि.मी. क्षेत्रामध्ये वनक्षेत्र व्यापलेले आहे. भौगोलिक क्षेत्राच्या 21.71% एवढा भूभाग अरण्याने व्यापलेला आहे.

भारत हा विस्ताराने मोठा असून विविध प्रकारच्या नैसर्गिक परिसराने व्यापलेला आहे. येथे अनेक नैसर्गिक वनस्पती वर्गाची अरण्ये दिसून येतात. भारतात नैसर्गिक वनस्पतीचे सहा प्रमुख विभाग केले आहेत. 1) सदाहरित अरण्ये 2) पानझडी मान्सून अरण्ये 3) उष्णकटिबंधातील गवताळ अरण्ये 4) मँग्रोव्ह अरण्ये 5) वाळवंटी अरण्ये 6) हिमालयातील अल्पाईन अरण्ये.

**1. सदाहरित अरण्ये:** भारतात सदाहरित अरण्ये ही 250 सें.मी. पेक्षा जास्त पाऊस पडणाऱ्या व 900 मीटर पेक्षा कमी उंची असलेल्या प्रदेशांमध्ये दिसून येतात. याप्रकारची अरण्ये पश्चिम घाट, ईशान्य भागातील राज्ये आसाम, मेघालय, त्रिपुरा, नागालँड आणि अंदमान निकोबार बेट यात दिसून येतात. भारतात सदाहरित अरण्ये सुमारे 2.6 लाख हेक्टर प्रदेशात व्यापलेली आहेत. या प्रदेशांमध्ये वनस्पती सतत हिरव्या राहिल्याने त्याला 'सदाहरित अरण्ये' म्हणतात.

**2. पानझडी मान्सून अरण्ये:** या प्रकारची अरण्ये भारतात मोठ्या प्रमाणात विस्तारलेली आहेत. जिथे 75 ते 250 सें.मी. पाऊस होतो, अशा प्रदेशात ही अरण्ये आढळतात. ही 65.5% एवढ्या प्रमाणात व्यापलेली आहेत. भारत मान्सून हवामानाचा प्रदेश असल्याने या प्रकारची अरण्ये जास्त प्रमाणात पसरली आहेत. कोरड्या हवेच्या मोसमामध्ये झाडांची पाने गळतात म्हणून यांना 'पानझडी मान्सून अरण्ये' असे म्हणतात.

**3. उष्णकटिबंधातील गवताळ अरण्ये:** ही अरण्ये ज्या ठिकाणी 60 ते 75 सें.मी. पाऊस पडतो, त्या प्रदेशात दिसून येतात. या क्षेत्रात उंच गवत आणि तुरळक इथे तिथे काटेरी वनस्पती दिसून येतात. दख्खनच्या पठारातील केंद्र भाग, अरावली पर्वतातील पश्चिम दिशेच्या थार वाळवंटाच्या कडेच्या क्षेत्रात या प्रकारच्या वनस्पती आढळतात. बाबुळ, ताड, गवत इ. येथे वाढतात.




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**4. मँग्रोव्ह अरण्ये :** यांना भरती-ओहोटीची अरण्ये म्हणतात. ही अरण्ये नद्यांच्या त्रिभुज प्रदेशात व मुखाजवळ लाटा येणाऱ्या ठिकाणी आढळतात. गंगा, गोदावरी, महानदी व कृष्णेच्या त्रिभुज प्रदेशात ही अरण्ये आढळतात. गंगा नदीच्या मुखाजवळ 'सुंदरी' झाडे जास्त प्रमाणात वाढतात, म्हणून या अरण्याना 'सुंदरबन' म्हणतात. या अरण्याचे क्षेत्र देशात 4,992 चौ.कि.मी. इतके आहे.

**5. वाळवंटी अरण्ये :** ज्या ठिकाणी वार्षिक सरासरी पाऊस 50 सें.मी. पेक्षा कमी असतो तेथे ही अरण्ये आढळतात. राजस्थानमधील थारचे वाळवंट, पंजाबची राजस्थान कडील बाजू, हरियाणा व गुजरात येथे ही अरण्ये आढळतात. या वनस्पतीची मुळे जमिनीत खोलवर जातात. काटेरी झुडूपाच्या वनस्पती देखील या प्रदेशात आढळतात.

**6. हिमालयातील अल्पाईन अरण्ये :** येथे वेगवेगळ्या प्रकारची अरण्ये आढळतात. हिमालयातील वनस्पती त्या ठिकाणची उंची व पाऊस यानुसार बदलतात. हवामानाप्रमाणे विविध प्रकारच्या वनस्पती आढळतात. येथे वाढणारी मुख्य झाडे म्हणजे साल, बैरा, टून, सिल्वर स्पर्स, लॉरेल इ. येथे टोकदार पानांची अरण्ये आढळून येतात.

**उपक्रम :**
*तुमच्या वडिलधाऱ्यांकडून तुमच्या परिसरातील झाडे आणि पर्यावरणाविषयी माहिती मिळवा आणि पर्यावरणातल सध्याच्या बदलाचे निरिक्षण करा.*

**अरण्यांची विभागणी :** कोणत्याही प्रदेशात अनुकूल वातावरणासाठी त्यात 33% एवढे अरण्य क्षेत्र असावे असे वैज्ञानिकांचे मत आहे.भारताच्या दृष्टीने एकूण क्षेत्रफळापैकी अतिशय कमी अरण्य क्षेत्र आहे. मध्य प्रदेश हे अरण्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर आहे तर हरियाणा शेवटच्या क्रमांकावर आहे. कर्नाटकाचा 6 वा क्रमांक लागतो.

**अरण्याचे महत्व:**

मानव आणि पर्यावरण या दोघांसाठी अरण्य हे महत्वाचे साधन आहे. त्याचे महत्व खालीलप्रमाणे आहे.

1) शुद्ध हवा, अन्न व चारा मिळतो.

2) चांगला पाऊस पडतो.

3) अरण्य जमिनीची धूप नियंत्रित करते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

4) अरण्य प्राणी व पक्ष्यांचे वस्तीस्थान आहे.

5)अरण्यात औषधी वनस्पती मुबलक प्रमाणात आढळतात.

6) अरण्य पर्यटकांना आकर्षित करते.

7) अरण्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

8) अरण्य पर्यावरणाचे संतुलन नियंत्रित करते.

**अरण्यांचे संरक्षणः** अरण्ये मानवापासून, पाण्यापासून आणि नैसर्गिक आपत्तीपासून सुरक्षित ठेवण्याला 'अरण्याचे संरक्षण' असे म्हणतात. भारतात अरण्याच्या क्षेत्रात सतत घट होत आहे. शेतीची वाढ, दुग्धव्यवसायाची मागणी, रस्ते, रेल्वेमार्ग, पाणीपुरवठ्याची योजना, जंगलातील वनवा इ. अरण्याच्या नाशाला कारणीभूत आहे. त्यामुळे अरण्याचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी संरक्षणाच्या काही उपाय योजना आखण्याची गरज आहे.

**अरण्य संरक्षणाच्या पद्धती :** घर्षणामुळे आग लागणाऱ्या झाडांची तोडणी करणे, अरण्यातील झाडांना येणाऱ्या रोगांवर नियंत्रण करणे, रोपटे लावणे, बिया शिंपडणे, नियमबाह्य झाडे तोडणी रोखणे, अरण्यात पाळीव जनावरांना चरण्यासाठी मज्जाव करणे, सार्वजनिक झाडे लावण्यास प्रोत्साहन देणे, लोकांना अरण्याचे महत्त्व सांगून अरण्य संवर्धन करण्यास प्रोत्साहन देणे. सामाजिक अरण्य योजना तात्काळ यशस्वीरीत्या कार्यरुपात आणणे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**वन्यजीव अभयारण्येः** विविध प्राण्यांना त्यांच्या मूळ स्थानात संरक्षीत करण्यासाठी वन्यजीव अभयारण्य निर्माण केली गेली आहेत. भारतात आज सुमारे 567 वन्यजीव निर्भय स्थाने आहेत, यात प्रमुख म्हणजे,

- **तमिळनाडू** - मदूमलाई, कन्याकुमारी.
- **पश्चिम बंगाल** - महानंदा, चप्रमरी.
- **राजस्थान** - बस्ती, सवाई मानसिंग.
- **हरियाणा** - कलेसार, नहर.
- **पंजाब** - बिरमोतीबाग, हरिके.
- **आंध्रप्रदेश** - कोल्हेरू, कृष्णा.

**राष्ट्रीय उपवने -** भारतात प्रथम स्थापित झालेले उपवन म्हणजे उत्तरांचल राज्यातील 'जिमकार्बेट'. देशातील प्रमुख उपवने खालील प्रमाणे आहेत.

1. काझीरंगा राष्ट्रीय उद्यान - आसाम.
2. सुंदरबन राष्ट्रीय उद्यान - प. बंगाल
3. हजारीबाग राष्ट्रीय उद्यान - झारखंड
4. गिर राष्ट्रीय उद्यान - गुजरात.
5. कान्हा राष्ट्रीय उद्यान - मध्य प्रदेश
6. ताडोबा राष्ट्रीय उद्यान - महाराष्ट्र.

**जैविक संरक्षण क्षेत्र (Biosphere Reserves) :**

भारत मोठ्या प्रमाणात वनस्पती आणि प्राणी संपत्तीने समृद्ध आहे. या जैविक व्यवस्था राखण्यासाठी देशात 18 जैविक क्षेत्राचे संरक्षण केले जात आहे. ते म्हणजे निलगिरी, नंदादेवी, नोक्रेक ग्रेट निकोबार, मन्नारचे आखात, मानस, सुंदरबन, सिमिली पाल, कांचनजंगा, अमरकंटक, शीत वाळवंट (हिमाचल प्रदेश), तसेच भारतातील पहिले राखीव जैविक संरक्षण अरण्य म्हणजे निलगिरी पर्वत प्रदेश होय.

**तुम्हाला हे माहीत असू द्या.**

- *भारतात सुमारे 567 वन्यजीव निर्भयस्थाने आहेत.*
- *106 राष्ट्रीय उपवने आहेत.*
- *122 वनस्पती उद्याने (बॉटनिकल गार्डन) आहेत.*
- *525 प्राणी संग्रहालये आहेत.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. आसाम आणि मेघालयात आढळून येणारे अरण्ये ____________
2. हिमालयात ____________ अरण्ये आढळून येतात.
3. गंगा नदीच्या त्रिभुज प्रदेशाला ____________ म्हणतात.

4. जिम कार्बेट राष्ट्रीय उद्यान ____________ राज्यात आहे.

5. राष्ट्रीय वनधोरणानुसार देशात अनुकूल वातावरणासाठी __________% अरण्य असले पाहिजे.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे समूहात चर्चा करून लिहा :**

6. नैसर्गिक वनस्पती म्हणजे काय ?

7. भारताचे एकूण वनक्षेत्र किती आहे?

8. भारतातील अरण्याचे प्रकार कोणते आहेत?

9. अरण्याचे महत्व स्पष्ट करा.

10. भारतातील पानझडी अरण्याची लक्षणे आणि विभाग सांगा.

11. अरण्य नाश होण्याची कारणे सांगा.

12. अरण्याचे संवर्धन म्हणजे काय?

13. देशातील अरण्यसंवर्धनाच्या संदर्भात आपण कोणत्या सूचना कराल?

**III. उपक्रम :**

1. तुम्ही राहात असलेल्या प्रदेशातील नैसर्गिक वनस्पती वर्गांची नावे सांगा, तेथील प्रमुख वनस्पती वर्ग आणि प्राणी वर्गाची यादी तयार करा.

2. तुम्ही पाहिलेल्या विविध झाडांच्या नावांची यादी करा.

**IV. प्रकल्प :**

1. वन्यजीव निर्भय स्थानात राहणाऱ्या प्राण्यांच्या चित्रांचा अल्बम तयार करा.

2. भारताचा नकाशा काढून त्यात जैविक संरक्षण स्थाने दाखवा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण - 14

# भारतातील जलसाधन संपत्ती

B7D6R7

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *पाणी पुरवठ्याचे महत्त्व.*
- *पाणी पुरवठ्याचे प्रकार.*
- *नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजना.*
- *भारतातील प्रमुख विद्युत शक्ती योजना.*
- *राष्ट्रीय विद्युत जाळे.*
- *पावसाच्या पाण्याचा संग्रह (जलपुनर्भरण).*

जलसंपत्ती ही प्रमुख नैसर्गिक संपत्ती आहे. ही मानवाची मूलभूत गरज असून राष्ट्रीय संपत्ती आहे. पाणीपुरवठा, विद्युत शक्ती, उद्योगधंदे, घरगुती वापर, नौकापर्यटन, मासेमारी आणि मनोरंजन यासाठी पाण्याची आवश्यकता असते. पण आजची मागणी सतत वाढणाऱ्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करणे गरजेचे आहे. त्यासाठी पाण्याचा योग्य वापर करून पाण्याचे संरक्षण करणे काळाची गरज बनली आहे.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

| | |
|---|---|
| भूपृष्ठावरील वापरण्यायोग्य अंदाजे जलस्त्रोत. | 690BCM |
| एकूण वापरण्यायोग्य भूजल संसाधन. | 433BCM |
| एकूण वार्षिक वापरण्यायोग्य जलस्त्रोत. | 1123BCM |
| दरडोई पाण्याची उपलब्धता. | 1720.29 CUM |
| BCM - Billion Cubic Meters<br>CUM - Cubic Meters | |

भूपृष्ठावरील पाण्याचे मूळ म्हणजे नद्या व सरोवरे आणि जमिनीखालील पाण्याचे मूळ म्हणजे विहिरी आणि झरे. पाण्याचा साठा स्थळ आणि काळाप्रमाणे बदलत जातो, भारतात पाऊस अनिश्चित, विषम व ठराविक ऋतूत होतो, म्हणून शेतीसाठी कालवे,तलाव विहिरी व कूपनलिकांनावर अवलंबून रहावे लागते. पाणी कमी असलेल्या ठिकाणी हे फार उपयुक्त आहे.

पाणीपुरवठा म्हणजे कृत्रिम पद्धतीने कालवे, विहिरी, तलावापासून पाणीपुरवठा

NOT TO BE REPUBLISHED
©KTBS

करणे होय. कमी पाऊस होणाऱ्या प्रदेशात शेती व्यवसायासाठी पाणी अत्यंत आवश्यक आहे. शेती व्यवसायाच्या इतिहासातील पाणीपुरवठा करणे हा महत्वाचा भाग आहे. देशातील येणाऱ्या एकूण पाण्याचे प्रमाण जास्तीत जास्त 140 दशलक्ष प्रदेशाला पाणीपुरवठा करू शकतो. 2006 पर्यंत 62.2 दशलक्ष हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

> **तुम्हाला हे माहीत आहे का?**
> भारत हा जगातील सर्वात मोठा सिंचन क्षेत्र असणारा देश आहे. चिनचा दुसरा क्रमांक लागतो.

**पाणीपुरवठयाचे प्रकार :** भारत नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध आहे. जलसंपत्तीचे अनेक स्त्रोतही आहेत. तसेच पाणी पुरवठ्याचे प्रमाण,पावसाची विभागणी, मुख्य लक्षणे, पिकांना पाण्याची आवश्यकता पाहून विविध तऱ्हेच्या पाणीपुरवठ्याच्या पद्धती आढळून येतात. भारतात पाणीपुरवठ्याच्या पद्धतीवरून त्यांचे तीन प्रकार केलेले आहेत. 1) विहिरीने पाणीपुरवठा 2) कालव्याने पाणीपुरवठा आणि 3) तलावाने पाणीपुरवठा होय.

**1. विहिरीने पाणीपुरवठा :** ही भारतातील महत्त्वाची पाणीपुरवठ्याची पद्धत आहे. भारतातील बऱ्याच मोठ्या प्रदेशाला विहिरीने पाणीपुरवठा केला जातो. विहिरी खोदून भू-अंतर्जलातून पाणी बाहेर काढून शेतीसाठी उपयोग करतात. यालाच विहिरीने पाणीपुरवठा करणे असे म्हणतात. कमी पाऊस होणाऱ्या ठिकाणी याचा उपयोग होतो. विहिरी बांधण्यासाठी व संवर्धन करण्यासाठी अतिसुलभ आहेत. कालवे आणि तलाव नसलेल्या ठिकाणी विहिरीने पाणीपुरवठा करण्याची पद्धत प्रचलित आहे. विहिरीने दोन प्रकारे पाणीपुरवठा केला जातो. 1) उघड्या विहिरी आणि 2) कूपनलिका

**अ) उघड्या विहिरी :** या प्रकारच्या विहिरी योग्य प्रकारच्या शेतजमिनीमध्ये खोदल्या जातात माणसाने, डिझेल इंजिन किंवा इलेक्ट्रिक पंपाने पाणी खेचले जाते व पाणी पुरवठा केला जातो.

**ब) कूपनलिका :** भारतातील विहिरीने पाणीपुरवठ्याच्या पद्धतीत कूपनलिकांचे स्थान प्रमुख आहे. एकूण विहिरीने पाणीपुरवठ्याच्या क्षेत्रात एकूण 59.7 टक्के एवढा आणि देशाचे एकूण पाणीपुरवठ्याच्या क्षेत्रात 33.7 टक्के इतका विहिरीने पाणीपुरवठा केला जातो.

**2. कालव्याने पाणीपुरवठा :** कालव्याने पाणीपुरवठा करणे ही भारतातील एक महत्त्वाची पाणीपुरवठ्याची पद्धत आहे. कालव्याने पाणी पुरवठा करणारा भारत हा जगातील

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

प्रमुख देश आहे. या पद्धतीने लागवड योग्य जमिनीला भरपूर प्रमाणात पाणीपुरवठा केला जाऊ शकतो. भारतात सुमारे 16.50 दशलक्ष हेक्टर प्रदेशात कालव्याने पाणीपुरवठा केला जातो. देशात विहिरीने पाणीपुरवठ्याच्या नंतर दुसरा प्रमुख पाणीपुरवठ्याचा प्रकार आहे. यामध्ये दोन प्रकार आहेत.

**अ) पुराचे कालवे :** कोणत्याही धरणाच्या मदतीशिवाय नदीतून थेट पाणी कालव्याद्वारे काढले जाते. जेव्हा नदीची पातळी जास्त असते तेव्हा जास्तीचे पाणी कालव्यांमधून जाते त्यांना पुराचे कालवे असे म्हणतात.

**ब) बारामाही कालवे :** नद्यांना धरण बांधून कालवे काढून कायमचा पाणीपुरवठा केला जातो. त्याला बारामाही कालवे म्हणतात भारतात उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि बिहार राज्यांच्या जिल्ह्यात कालव्यांचे जाळे पसरलेले आहे.

**उपक्रम :**
तुमच्या परिसरात असणाऱ्या तलावांची यादी करून ते संरक्षित करण्यासाठी उपाय सुचवा.

**3. <u>तलावाने पाणीपुरवठा</u> :** प्राचीन काळापासून पाणीपुरवठा करण्यासाठी तलावाचा उपयोग केला जात आहे. लहानशा नद्यांना ओढ्यांना बांध घालून पाणी साठविले जाते. यांनाच तलाव असे म्हणतात. त्याप्रमाणे साठविलेल्या पाण्याला लहान कालवे काढून शेतीला पाणीपुरवठा केला जातो. आंध्र प्रदेश, तमिळनाडू, ओरिसा, कर्नाटकात तलावाने पाणीपुरवठा करण्याची पद्धत दिसून येते. याशिवाय मध्य प्रदेश, राजस्थान, झारखंड, उत्तर प्रदेश राज्यात पण तलावाने पाणीपुरवठा करण्याची पद्धत अस्तित्वात आहे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## नदीखोऱ्यातील बहुउद्देशीय योजना

भारतात जास्तीत जास्त पाण्याचा उपयोग करून घेण्यासाठी अनेक नद्यांना व उपनद्यांवर अनेक धरणे बांधून विविध उद्देश पूर्ण करण्यात आले आहेत. नदी खोऱ्यातील संपूर्ण विकसित साधनसंपत्तीचा बराच उपयोग या योजनेद्वारे केला जातो. या योजना शेतीला पाणीपुरवठा करून इतर उद्देशांची पूर्ती करतात, त्यांना नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजना असे म्हणतात. या योजनांचा मुख्य उद्देश 1) पाणीपुरवठा करणे 2) जलविद्युत शक्ती निर्मिती करणे 3) पुरावर नियंत्रण आणणे. 4) नौका पर्यटन 5) घरगुती

व उद्योगधंद्यांसाठी वापर 6) मातीची झीज थांबवणे 7) मासेमारीचा विकास करणे. 8) अरण्य संपत्तीचा विकास करणे.

## भारतातील काही प्रमुख नदीखोऱ्यातील बहुउद्देशीय योजना

**1) दामोदर दरी योजना :** दामोदर योजना ही स्वतंत्र भारतातील पहिली बहुउद्देशीय योजना आहे. बिहार व प.बंगाल या दोन्ही राज्यांची संयुक्त योजना आहे. दामोदर नदीमुळे पश्चिम बंगालमध्ये महापूर येत होता आणि बंगालमध्ये खूपच नुकसान होत होते, म्हणून या नदीला 'बंगालचे अश्रू' असे म्हणत. नदीमुळे होणारा विनाश रोखण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला.

या नदीवर सुमारे 2495 किलोमीटर लांबीच्या कालव्याचे जाळे असून सुमारे 4.5 लक्ष हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा केला जातो. दामोदर व तिच्या उपनद्या तिलाया, कोनार, मैथॉन व पंच पर्वत आणि इतर ठिकाणी धरणे बांधली आहेत. बोकारो, चंद्रपूर आणि दुर्गापूर येथे विद्युत केंद्र स्थापली आहेत, या धरणापासून झारखंड व पश्चिम बंगाल राज्यांना फायदा होतो.

**2) भाक्रा नानगल योजना :** ही भारतातील प्रमुख बहुउद्देशीय योजना आहे. पंजाब, राजस्थान, हरियाणा या राज्यांची संयुक्त योजना आहे. हिमाचल प्रदेशात भाक्रा नानगल याठिकाणी सतलज नदीवर हे धरण बांधले आहे. भाक्रा धरण अशियातील अत्यंत उंच धरण (226 मीटर) आहे. या नदीवर 3402 किलोमीटर लांबीचे कालव्यांचे जाळे पसरलेले असून या धरणापासून 14.6 लाख हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा करण्यात येतो. या धरणापासून दिल्ली व हिमाचल प्रदेशला पाणी व वीजपुरवठा होतो. या जलाशयाला **'गोविंद सागर'** असेही संबोधले जाते. भाक्रा नानगल योजना ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची योजना आहे. (तिहरी योजना ही भारतातील सर्वात मोठी योजना आहे.)

**3) कोसी योजना :** या योजनेचा मुख्य उद्देश महापुराला आळा घालणे हा आहे. कोसीला 'बिहारचे दुःख' असे म्हणतात. ही नेपाळ व भारताची संयुक्त योजना आहे. भारत व नेपाळच्या सीमेवर हनुमान नगरला कोसी नदीवर धरण बांधले आहे. या धरणाने 8.75 लक्ष हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा केला आहे. येथे तयार होणाऱ्या विजेच्या 50% वीज नेपाळला पुरवली जाते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**4) हीराकुड योजना :** हे धरण ओरिसामध्ये महानदीवर संबळपूर पासून दहा किलोमीटर अंतरावर बांधले आहे. या नदीला 'ओरिसाचे दुःख' असे म्हणतात. हिराकुड धरण 4801 मीटर लांब असून भारतातील अत्यंत लांबीचे धरण आहे. या धरणापासून 2.54 लाख हेक्टर जमिनीला पाणी पुरवठा होतो. ओरिसा, झारखंड, छत्तीसगड या राज्यांना पाणी व वीज पुरवठा केला जातो.

**5) तुंगभद्रा योजना :** या धरणाचा मुख्य उद्देश पाणी पुरवठा व वीज निर्मिती आहे. ही योजना कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाची संयुक्त योजना आहे. हे धरण तुंगभद्रा नदीवर कर्नाटकातील विजयनगर जिल्ह्यातील मल्लापुर जवळ हॉस्पेट येथे बांधले आहे. या धरणापासून 5.5 लाख हेक्टर जमिनीला कर्नाटक व आंध्र प्रदेशाला पाणी पुरवठा व वीज पुरवठा होतो. या जलाशयाच्या साठ्याला **'पंपा सागर'** असे म्हणतात.

**6) नागार्जुन सागर योजना :** आंध्र प्रदेशातील नंदीकोंडा खेड्याजवळ कृष्णा नदीवर हे धरण बांधले आहे. या धरणाचा मुख्य उद्देश शेतीला पाणीपुरवठा व वीज निर्मिती करणे आहे. या धरणापासून 8.30 लाख हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा केला जातो.

**7) अप्पर कृष्णा योजना :** ही योजना कर्नाटकातील मोठी योजना आहे. विजयापूर, बागलकोट, रायचूर, कलबुर्गी (गुलबर्गा) व यादगीर जिल्ह्यातील शेतीला पाणीपुरवठा आणि पिण्यासाठी पाणी पुरवले जाते. हे धरण कृष्णा नदीवर विजयापूर जिल्ह्यातील आलमट्टी येथे बांधले आहे. यानेच **'लाल बहादूर शास्त्री'** जलाशय निर्मित झाला आहे आणि नारायणपूर जवळ आणखीन एक धरण निर्माण केले आहे. या जलाशयाचे नाव **'बसव सागर'** आहे. या दोन्ही धरणाने 6.47 लक्ष हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा केला असून अलीकडे विद्युत शक्तीचे पण उत्पादन करण्यात येत आहे.

**8) नर्मदा योजना :** या योजनेला प्रारंभापासून तीव्र विरोधाला तोंड द्यावे लागले म्हणून मध्य प्रदेश व गुजरातला पाणी वाटपाबाबत एक जलवाटप न्याय समिती स्थापन करण्यात आली व दोन्ही राज्यांमधील भांडण सोडविण्याचे ठरविले. एकूण 23 धरणे असलेली नर्मदा पाणीपुरवठा योजनेस सरदार सरोवर, नर्मदा सागर आणि नर्मदा अप्पर योजना प्रमुख आहेत. या धरणापासून उत्तर गुजरात, राजस्थान आणि महाराष्ट्राच्या काही भागांना पाणी पुरवठा व विद्युत शक्ती पुरवठा केला जातो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भारतातील जल विद्युतशक्ती योजना :**

भारतात उत्पादित होणाऱ्या विद्युतशक्तीतील जलविद्युत शक्ती दुसऱ्या क्रमांकावर आहे. देशात 2011 च्या प्रमाणे उत्पादित केलेल्या 13.9% एवढे उत्पादन झाले आहे. भारताने सुमारे 410 बिलियन किलो वॅट जलविद्युत उत्पादनाची क्षमता प्राप्त केलेली आहे. तरी सध्याला जलविद्युत शक्तिचे उत्पादन केवळ 106.68 बिलियन किलो वॅट इतके होते. या खालील राज्यात जलविद्युत शक्ती उत्पादनाची केंद्रे आहेत.

1. **कर्नाटक -** शिवणसमुद्र, तुंगभद्रा, जोग, भद्रा, आलमट्टी, काळी, सुपा, कद्रा आणि कोडसळ्ळी धरण.

2. **आंध्र प्रदेश** - श्रीशैलम योजना, रामपाद सागर योजना, सिलेरू योजना.

3. **तेलंगाण**- नागार्जुन सागर योजना

4. **तमिळनाडू** - मेट्टूर योजना, पैकारविद्युत योजना, पेरियार योजना, कुंधा योजना, मोयार योजना, कोडायार योजना. इत्यादी

5. **मध्यप्रदेश** - बनसागर, गांधी सागर, पंच योजना, तावा योजना.

6. **महाराष्ट्र** - टाटा जलविद्युत योजना, बिरा योजना, वैतरणा योजना, कोयना योजना.

7. **ओरिसा** - हिराकूड योजना, नाराज योजना, रेंगाली योजना, अप्पर कोलाब योजना

8. **झारखंड** - सुवर्णरेखा योजना

9. **बिहार** - कोसी योजना

10. **गुजरात**- कक्रापार योजना, काडन योजना, अकाई योजना

याशिवाय देशात अनेक नदी खोऱ्यातील जलविद्युत केंद्रे दिसून येतात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**राष्ट्रीय विद्युत जाळे (National Power Grid):** भारत विविध रूपातून मूळ स्त्रोतातून वीज उत्पादन करतो. सर्व राज्यांना वर्षभर पुरेसा वीजपुरवठा होऊ शकत नाही, त्यामुळे जास्त वीज असलेल्या प्रदेशातून कमी वीज उत्पन्न करणाऱ्या प्रदेशाला वीज पुरवठा करण्यासाठी विद्युत जाळे निर्माण केलेले आहे. यामुळे देशाच्या कोणत्याही भागात जास्त वीज उत्पादन करणाऱ्या प्रदेशातून विजेची उणीव असणाऱ्या प्रदेशाला पुरवठा केला जातो.

**जल पुनर्भरण कींवा पावसाच्या पाण्याचा संग्रह (Rain Water Harvesting):** पाणी हे खूप मौल्यवान आहे. भारतात जलसाधन संपत्ती विपुल प्रमाणात असली तरी सर्व ठिकाणी ती एकसारखी नाही. पावसाळ्यात पाऊस पडतो. अतिवृष्टी होत असलेल्या भागातही उन्हाळ्यात पाण्याची कमतरता दिसून येते, त्यामुळे देशातील पाण्याच्या उणीवेला एक सरळ उपाय म्हणजे जल पुनर्भरण किंवा पावसाच्या पाण्याचा संग्रह करणे होय. पावसाचे पाणी साठवून त्याचा वापर करणे याला जल पुनर्भरण असे म्हणतात.

**यामध्ये दोन प्रकार आहेत** 1) पाऊस पडलेल्या ठिकाणी पाण्याचा संग्रह करणे. उदा. घराच्या छतावरील पाणी

2) पाऊस पडल्यावर वाहणाऱ्या पाण्याचा संग्रह करणे उदा. बांध घालून पाण्याचा संग्रह होय.



- घराच्या छतावरून वाहणाऱ्या पाण्याचा संग्रह करून दैनंदिन कामाला उपयोग करणे.
- शेतीच्या प्रदेशात खड्डे खोदून पाण्याची साठवणूक करणे.
- पावसाचे पाणी न वाहू देता बांध घालून जमिनीत जिरविणे यामुळे अंतर जल पातळी वाढते.
- फक्त वैयक्तिक नाहीतर किंवा समूहाने पण वाहणाऱ्या पाण्याला अडवून लहान खड्डे खोदून तलावाच्या रूपात संग्रह करणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कर्नाटकात प्राचीन काळापासून पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण प्रचलित आहे. संपूर्ण राज्यात दिसून येणारे तलाव, कट्टे, खड्डे इत्यादी पावसाच्या पाण्याच्या संग्रहाचे प्रकार आहेत. त्याच्या कडील दुर्लक्षामुळे पाण्याचा अभाव पडतो. याचे रक्षण करून उत्तम संवर्धनाने देशात दिसून येणाऱ्या पाण्याची समस्या कमी करता येईल.

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. दामोदर नदीला ____________ अश्रू असे म्हणतात.
2. ____________ या नदीला बिहारचे दुःख असे म्हणतात.
3. कर्नाटकात पाणीपुरवठ्याची मोठी योजना ____________ आहे.
4. कावेरी नदीला ____________ येथे विद्युतशक्ती योजना निर्माण केली आहे.
5. हीराकुड योजना ____________ नदीवर निर्माण केली आहे.

## II. खालील प्रश्नांची उत्तरे समूहात चर्चा करून लिहा :

6. पाणीपुरवठा म्हणजे काय? पाणीपुरवठ्याचे प्रकार कोणते?
7. नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजना म्हणजे काय? त्याचे उद्देश कोणते?
8. कर्नाटकातील जलविद्युत उत्पादन केंद्रांची नावे लिहा.
9. पावसाच्या पाण्याचा संग्रह अनिवार्य आहे. का?
10. राष्ट्रीय विद्युत जाळे म्हणजे काय?

## III. जोड्या जुळवा :

| अ | ब |
|---|---|
| i. भाक्रा-नानगल योजना | अ) लालबहादूर शास्त्री सागर |
| ii. तुंगभद्रा योजना | ब) बसव सागर |
| iii. अलमट्टी योजना | क) पंपा सागर |
| iv. नारायणपूर योजना | ड) गोविंद सागर |
| | इ) नर्मदा सागर |

## IV. उपक्रम:

1. भारतातील प्रमुख नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजनांच्या उपयोगाची यादी करा.
2. पावसाच्या पाण्याचे संग्रह केलेल्या ठिकाणाला भेट देऊन माहिती मिळवा.

## V. प्रकल्प:

1. तुमच्या सभोवतालच्या विविध पाणीपुरवठ्याच्या पद्धतीची यादी करून त्यांचे उपयोग समजून घ्या.
2. तुम्ही पाहिलेल्या कोणत्याही एका पाणीपुरवठा योजनेबद्दल माहिती लिहा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## प्रकरण - 15

N3Z1G3

# अर्थव्यवस्था आणि सरकार (Economy and Government)

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया**

- *अर्थव्यवस्था आणि सरकार यांच्यातील संबंध.*
- *भारतातील योजना.*
- *भारतातील पंचवार्षिक योजना आणि त्यांची साधने.*
- *हरित क्रान्ती*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

मानवाच्या संपूर्ण आर्थिक प्रक्रियेची एक सूसंघटीत व्यवस्था ही अर्थव्यवस्था होय. अर्थव्यवस्थेचे मुख्य उद्देश म्हणजेच मानवाचे कल्याण. सरकार देखिल मानवाच्या कल्याणाच्या दृष्टिने कार्य करते. म्हणजे मानवाच्या आर्थिक प्रक्रियेत सरकारची मध्यस्थी करणे गरजेचे आहे का? आर्थिक विकासामध्ये सरकारची भूमिका कोणती?

19 व्या शतकाच्या शेवटपर्यंत मानवाच्या आर्थिक प्रक्रियेत सरकारने मध्यस्थी करू नये असे तेंव्हाच्या काही अर्थशास्त्रज्ञांचे मत होते. तेव्हा सरकार फक्त राष्ट्राचे रक्षण, न्याय निर्णय आणि शांती-सुव्यवस्था पालन इ. मूलभूत कार्य एवढेच करत होते. पण 20 व्या शतकात 'कल्याण राज्यांच्या' उदयापासून सरकारच्या कार्य क्षेत्राचा विस्तार झाला. सरकार सर्व प्रजेला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, शुद्ध वातावरण, वाहतूक, दळणवळण इ. अनेक सूविधा देण्यास पुढे आले. म्हणून सरकारने लोकांच्या आर्थिक प्रक्रियेत मध्यस्थी होण्यास प्रारंभ केला. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सरकारची भूमिका अधिक महत्वाची आहे.

विकसनशील देशात सामान्यत: निरूद्योग, गरीबी, मागासलेली शेती, उत्पन्न आणि संपत्तीची असमान वाटणी इ. समस्या दिसून येतात. यासारख्या समस्याचे निवारण करण्यासाठी सरकारची मध्यस्थी होणे अनिवार्य झाली आहे. हे देश वाहतूक दळणवळण, विद्युत, शिक्षण, आरोग्य इ. मूळ सूविधांच्या उणीवाना तोंड देत आहे. सरकार या उणीवांचे निर्मूलन करण्यासाठी कार्य करत आहे.

अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन, उद्योग, गुंतवणूक, किंमत इ. सतत चढउताराने समावलेले असतात. या सारख्या चढउताराला आर्थिक चढउतार असे म्हणतात. आर्थिक व्यवस्थेत अधिक चढउतार नसल्यास, विकासाकडे जाणाऱ्या क्रियेला आर्थिक स्थिरता असे म्हणतात. तसेच देशात उत्पादन होणारे उत्पन्न आणि संपत्ती गोर-गरीब, नगर-ग्रामीण असे कोणतेही भेद न करता सामाजातील सर्व लोकाना समान वाटणी केली पाहिजे, यालाच सामाजिक न्याय असे म्हणतात. आर्थिक स्थिरता आणि सामाजिक न्यायासोबत आर्थिक विकास साधण्यास सरकारची भूमिका अति प्रमुख आहे.

20 व्या शतकात सरकारने शीघ्र आर्थिक विकास साधण्याकरीता प्रमुख तंत्र आणि आर्थिक योजना उपयोगात आणल्या. 1929 मध्ये सोवियत रशिया प्रथमत: आर्थिक योजना सुरू करून शीघ्र आर्थिक विकास साधण्यास यशस्वी झाला. दुसऱ्या जागतिक युद्धानंतर जगातील अनेक देशांनी आपल्याला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आर्थिक योजना हाती घेतल्या आहेत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

### 1) भारतातील नियोजन (Planing in India) :

नियोजन हे प्रत्येक व्यक्तिच्या जीवनाला आवश्यक आहे. वैयक्तिक जीवनात यश प्राप्त करण्यासाठी नैसर्गिक साधनांचा योजनाबद्ध रीतीने उपयोग केला पाहिजे. का? विद्यार्थ्यांने उत्तम ज्ञान घेण्यासाठी आणि परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी आपल्या दैनंदिन वेळेचा व्यवस्थित रितीने उपयोग करून घेतला पाहिजे. दररोज इतका वेळ अभ्यास करणे, इतका वेळ खेळ खेळणे, झोपणे अशी योजना करून त्याला कार्यरूपात आणले पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारने देखिल आपल्या जवळ उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा व्यवस्थित रितीने उपयोग करून घेतला पाहिजे. वेगवेगळ्या क्षेत्राची निवड करून, निर्दिष्ट कालावधीत विकास साधण्यासाठी योजना आखली पाहिजे.

''सरकार काही निर्दिष्ट उद्देश्यासोबत, देशात असलेल्या साधनसंपत्तीचे योग्य रीतीने उपयोग करून लोकांचे सुख उच्च दर्ज्याला पोहचण्यासाठी, विवेक बुद्धिने प्रारंभ करणाऱ्या क्रियेला योजना असे म्हणतात.'' सरकार देशातील लोकांच्या कल्याणासाठी उपलब्ध असलेली साधनसंपत्ती लक्षात घेऊन,



सर. एम. विश्वेश्वरय्या

कोणते उत्पादन घ्यावे? किती उत्पादन घ्यावे? आणि केव्हा घ्यावे? आणि उत्पादन घेतलेल्या वस्तुची वाटणी कशी करावी? या सर्व बाबीवर विचार विनिमय करून, त्यानुसार निर्णय हाती घ्यावे. अशी आर्थिक योजना ही देशाच्या संपूर्ण विकासाला कारणीभूत ठरते. भारतात प्रथमत: आधुनिक योजनेबद्दल चिंतन करणारे भारतरत्न सर. एम.विश्वेश्वरय्या हे होते. त्यांनी 1934 साली **'भारताला योजित अर्थव्यवस्था'** (Planned Economy for India) या नावाच्या पुस्तकाचे प्रकाशन करून भारताच्या आर्थिक विकासाला योजनेची गरज असल्याचे दाखवून दिले. त्यामुळे त्यांना ''भारताच्या आर्थिक योजनेचे पिता'' असे म्हणतात.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने 1950 मध्ये योजना मंडळाची (Planning Commission) नेमणूक केली. त्याचे अध्यक्ष पंतप्रधान असतात. योजनेचे मुख्य उद्देश म्हणजे नैसर्गिक आणि मानव साधनसंपत्ती व भांडवल अंदाजे किंमत ठरवून या साधनसंपत्तीचा वापर करण्यासाठी योजना तयार करणे. भारतात योजनेचा कालावधी 5 वर्षाचा असल्याकारणाने पंचवार्षिक योजना म्हणून नाव दिले गेले आहे.

| भारतातील योजना | | |
|---|---|---|
| **योजना** | **योजनेचे वेळ** | **सार्वजनिक क्षेत्रातील खर्च (कोटी रू. मध्ये)** |
| 1 ली योजना | 1951–56 | 1,960 |
| 2 री योजना | 1956–61 | 4,672 |
| 3 री योजना | 1961–66 | 8,577 |
| वार्षिक योजना | 1966–69 | 6,251 |
| 4 थी योजना | 1969–74 | 6,160 |
| 5 वी योजना | 1974–78 | 42,300 |
| आवर्त योजना | 1978–280 | |
| 6 वी योजना | 1980–85 | 1,09,953 |
| 7 वी योजना | 1985–90 | 2,22,169 |
| वार्षिक योजना | 1990–92 | ––– |
| 8 वी योजना | 1992–97 | 4,34,100 |
| 9 वी योजना | 1997–02 | 9,41,041 |
| 10 वी योजना | 2002–07 | 15,25,639 |
| 11 वी योजना | 2007–12 | 36,44,718 |
| 12 वी योजना | 2012–17 | 76,69,807 |

1952 मध्ये ''राष्ट्रीय विकास मंडळ'' (National Development Board) ची स्थापना करण्यात आली. या मंडळात सर्व राज्याचे मुख्यमंत्री सदस्य असतात. हे राष्ट्रीय योजना मंडळ तयार केलेल्या पंचवार्षिक योजनाना अनुमोदन देतात. शिवाय सर्व राज्ये विकासासाठी सहकार्य करतात.

**2) पंचवार्षिक योजना (Five year plans):**

भारतात प्रथमत: पंचवार्षिक योजना ही 1 एप्रिल 1951 ला सुरू झाली. आतापर्यंत

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

11 पंचवार्षिक योजना समाप्त झालेल्या आहेत. आणि 1 एप्रिल 2012 पासून 12 वी पंचवार्षिक योजनेचा प्रारंभ होवून ती 31 मार्च 2017 ला पूर्ण होणार होती तो पर्यंत सरकारने नीती आयोग स्थापन केला.

प्रत्येक योजनेच्या कालावधीत त्याच्या मागील योजनेपेक्षा जास्त भांडवलाची गुंतवणूक करण्यात आली.

सरकारने काही निर्दिष्ट ध्येये उद्देशासाठी पंचवार्षिक योजनेंचा प्रारंभ केला आहे. भारतातील अर्थव्यवस्थेची प्रमुख समस्या म्हणजे गरीबी. गरिबीचे निर्मूलन करण्यासाठी पंचवार्षिक योजना प्रारंभ करण्यात आल्या.

त्यामुळे भारतातील आर्थिक नियोजनाचा मुख्य उद्देश म्हणजे गरीबीचे निर्मूलन करणे आणि लोकाच्या जीवनाचे राहणीमान होईल तितके उंचावणे. या मूळ उद्देशाच्या पूर्तिसाठी काही उद्देशाची पूर्तता केली पाहीजे ते म्हणजे-

1) जास्तीत जास्त उत्पादनाची वाढ करणे
2) उद्योगाची संधी वाढविणे
3) आर्थिक असमानता कमी करणे
4) आर्थिक स्थिरता राखणे
5) अर्थव्यवस्थेचे आधुनिकिकरण करणे इ.

**2. पंचवार्षिक योजनेची सफलता (Achievements)** : भारतात पंचवार्षिक योजना प्रारंभ होऊन 60 वर्ष पूर्ण झाली आहेत. 12 योजना पूर्ण झाल्या. या कालावधीत कोणते यश मिळालेले आहे ? त्यांच्या अपयशाची कारणे कोणती? याना समजून घेऊया.

प्रथमत: राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीबद्दल माहिती घेऊया.

**उपक्रम**




**क्षेत्र**

**वरील आलेखाचे निरिक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

1. 1950-51 मध्ये राष्ट्रीय उत्पन्नाला अति जास्त योगदान दिलेले क्षेत्र कोणते?
2. त्याच वर्षी अति कमी उत्पन्न कोणत्या क्षेत्रातून आलेले आहे?
3. 2011-12 मध्ये अति जास्त उत्पन्न कोणत्या क्षेत्रातून आले आहे?
4. 2011-12 मध्ये कृषि क्षेत्रातून आलेले योगदान किती?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

योजनेच्या सूरुवातीच्या 20 वर्षाच्या कालावधीत आमचे राष्ट्रीय उत्पन्न सरासरी वार्षिक 3.5% या दरात वाढ झालेली असून नंतरच्या 20 वर्षाच्या कालावधीत वार्षिक 5% दरात वाढ झालेली आहे. 1991-2000 च्या कालावधीत सरासरी वार्षिक 5.6% दरात वाढ झाली असून, 2001-2010 च्या कालावधीत 7.3% च्या दरात वाढ झाली आहे. म्हणजे जसजसे वर्षे लोटत गेली तसतसशी राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ वेगाने होत गेली. त्याबरोबर दरडोई उत्पन्नाची वाढ पण झाली आहे. 2001-2010 च्या कालावधीत दरडोई उत्पन्न वार्षिक सरासरी 5.6% च्या दरात वाढ झाली आहे.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीत अर्थव्यवस्थेची तीन क्षेत्रे म्हणजे शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र होय. योजनेच्या सूरूवातीला राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्रातून 50% पेक्षा जास्त उत्पन्न येत होते पण आता या क्षेत्राचे योगदान अत्यंत कमी झाले आहे. सध्या 2022-23 मध्ये या क्षेत्राकडून अत्यल्प म्हणजे 18.3% एवढे योगदान मिळत आहे. याउलट राष्ट्रीय उत्पन्नाला सेवा क्षेत्रापासून सर्वात जास्त म्हणजे 59% एवढे उत्पन्न येत आहे. त्यामुळे भारत आज ''जगाचे सेवा केंद्र'' म्हणून परिवर्तीत झाला आहे. अर्थव्यवस्था ही शेतीपासून उद्योग आणि सेवा क्षेत्राकडे परिवर्तन होत आहे.

आहार धान्याच्या उत्पादनात स्वावलंबी झाला आहे. योजनेच्या कालावधीत आहार धान्याचे उत्पादन सुमारे पाचपटीने जास्त झाले असून, 2021-22 मध्ये 315.7 दशलक्ष टन जास्त झाले आहे.

उद्योग आणि सेवा श्रेत्राच्या विस्ताराने उद्योगाच्या संधीत वाढ झाली आहे. गरिबीचे निर्मुलन आणि औद्योगिक कार्यक्रम अमलात आणून खेड्यातील गरीब लोकाना उद्योगाच्या संधी मिळवून देण्यास प्रयत्न केला जात आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अपार प्रगती झालेली दिसून येते. शेति, उद्योग आणि सेवा क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग जास्त होत आहे. तंत्रज्ञानाची सेवा बाहेरच्या देशाला निर्यात केली जात आहे. भारताच्या निर्यात क्षेत्रात तयार वस्तु आणि अभियांत्रिकी वस्तुचे निर्यातिच्या प्रमाणात अपरिमित वाढ झालेली आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेत अधिक होत असलेल्या असमानतेला आळा घालण्यासाठी, विकासाच्या प्रक्रियेत सर्व वर्गाच्या लोकाना सहभागी होण्यासाठी, 11 व्या योजनेत ''सर्वांचा समावेश असलेला विकासा'' (Inclusive Growth) ला प्राधान्य दिले आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

विकासाची मापदंडता पाहिल्यास खुप सुधारणा झालेली दिसून येते. लोकांची अपेक्षित आयुमर्यादा आणि साक्षरतेचे प्रमाण अधिक होत आहे. शिशु आणि मातांचा मृत्यूदर कमी होत आहे. जनन आणि मृत्युदरात घट होत असून लोकसंख्येच्या वाढीच्या दरात घट होत आहे.

एवढे साध्य होवून देखिल पंचवार्षिक योजना काम करण्याची क्षमता असणाऱ्या लोकाना सुद्धा उद्योगांची संधी देण्यास विफल झाली आहे. गरीबीच्या प्रमाणात घट झाली असूनसुद्धा त्याचे संपूर्ण निर्मूलन झाले नाही. गरीब आणि श्रीमंतामधील असमानता दिवसेंदिवस अधिक होत असून, सामाजिक न्याय लोकांना मिळेनासा झाला आहे. मूळ उद्योगची पातळीही खालावली आहे.

### 3. हरित क्रांति (Green Revolution) :

पंचवार्षिक योजनेचे अति प्रमुख यश म्हणजे 'हरित क्रांति'. क्रांति म्हणजे शिघ्र परिवर्तन अथवा विकास असा अर्थ होतो. 1967-70 च्या कालावधीत भारतात आहार धान्याच्या उत्पादनात झालेल्या शिघ्र वाढीला 'हरित क्रांति' म्हणून ओळखले गेले. 1967 मध्ये 74 दशलक्ष टन एवढे आहार धान्याचे उत्पादन, 1970 च्या कालावधीत 108 दशलक्ष टन एवढे अधिक झाले आहे. केवळ तीन वर्षाच्या कालावधीत आहार धान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे, ही हिरव्या पीकांची प्रगती झाली म्हणून याला हरित क्रांती असे नाव देण्यात आले. तसे झाल्यास हरित क्रांतीची भूमिका कोणती? याला प्रेरणादायक घटक कोणकोणते?

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

हरित क्रांति ही जास्त उत्पादनाच्या बी-बियाणांचा परिणाम आहे. 1960 च्या सरुवातीला **डॉ. नॉरमन बोरलाग** म्हणणारा अमेरिकेचे कृषि वैज्ञानिक मेक्सिको देशात केलेल्या प्रयोगाच्या सफलतेने गव्हाचा जास्त उत्पन्न देणाऱ्या बी-बियाणांचे संशोधन झाले. या बी-बियाणाचा उपयोग करून मेक्सिको आणि तैवान देशाने गव्हाच्या उत्पादनात मोठी प्रगती केली आहे.

1965-66 च्या कालावधित भारतात झालेल्या भयंकर दुष्काळाच्या परिणामाने शेती उत्पादनात अत्यंत घट झाली होती. आहार धान्याची उणीव खुप मोठ्या प्रमाणात निर्माण

झाली होती. या समस्येच्या निर्मूलनाला भारत सरकारने 1966 मध्ये गव्हाच्या अधिक उत्पादनाची बि-बियाणे पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान आणि उत्तरप्रदेशाच्या पूर्व प्रांतात उपयोगात आणली. चांगल्या धाण्याच्या उत्पादनासाठी विशिष्ठ पोषक तत्वे, नियमित पाणीपुरवठा आणि रोगांपासून संरक्षणाची गरज आहे. त्यामुळे अधिक उत्पन्न देणाऱ्या बि-बियाणांच्या उपयोगासोबत, रासायनिक खते, जंतुनाशकाचा उपयोग केला गेला. पाणी पुरवठ्याच्या सूविधेत विस्तार केला गेला. यामुळे गव्हाच्या उत्पादनात अति वेगाने वाढ झाली. शेती उत्पादनात उपयोग केलेल्या सुधारित तंत्रज्ञानाला **''सुगीपूर्व तंत्रज्ञान''** (Pre-harvest Technology) असे म्हणतात. भारतातल्या शेती सुधारणेमध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास कृषि वैज्ञानिक डॉ.एम.एम.स्वामीनाथन यांचे योगदान प्रमुख आहे. त्यामुळे त्याना हरित क्रांतिचे **'पहिले संशोधक'** (Pioneer) असे म्हणतात. 28 सप्टेंबर 2023 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना पहीली **'जागतिक आहार प्रशस्ती'** देऊन 1987 साली गौरव करण्यात आला. त्याचबरोबर भारतीयांसाठी केलेल्या हरितक्रांतीची दखल घेऊन भारत सरकारने 2024 साली भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान **'भारतरत्न'** देऊन मरणोत्तर त्यांचा गौरव केलेला आहे.


**डॉ.एम.एस.स्वामीनाथन**

हरित क्रांतिच्या सुरूवातीला सुधारित तंत्रज्ञानाचा उपयोग फक्त गव्हाच्या पिकाला उपयोग करण्यात आला. त्याच्या यशस्वीतेमुळे प्रेरित होऊन भारत सरकार तांदूळ, ज्वारी, नाचणा, ऊस इ. पिकाला पण जास्त उत्पादन देणाऱ्या बि-बियाणांचा उपयोग करण्याची प्रेरणा दिली. सुधारित तंत्रज्ञानांचा सर्व पिकावर उपयोग करण्याचा प्रयत्न केला गेला. सोबतच हे देशभर विस्तार करण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यामुळे शेती उत्पादनात भरपूर प्रगती साध्य होऊ शकली. 80 च्या दशका दरम्यान भारत आहार धान्याच्या उत्पादनात स्वावलंबी बनला.

> **उपक्रम :**
> शेती उत्पन्नाला आधार किमत देण्याबद्दल आपल्या शिक्षकाबरोबर चर्चा करा आणि शेतकऱ्या सोबतही चर्चा करा.

हरित क्रांतीचा उपयोग फक्त मोठ्या आणि श्रीमंत शेतकऱ्यानी करून घेतला आहे. गरीब आणि अल्प भूधारक शेतकऱ्यानी अध्याप या आधुनिक तंत्रज्ञान, बि-बियाने, रासायनिक खते, जंतुनाशके इत्यादिचा उपयोग केला नाही. त्यासाठी सरकार खते,

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अवजारांवर अनुदान आणि कमी किंमतीत वितरण करण्यासाठी पुढे आले. याशिवाय शेतकऱ्यांना बँकेकडून आणि सहकारी संघाकडून कमी व्याज्याच्या दरात कर्ज देण्याला पूढे आले. यामुळे सुधारित शेती पद्धतीना सर्व वर्गाचे शेतकरी उपयोग करण्यासाठी पुढे आले आणि शेतीचे उत्पन्न वाढले.

शेतमालाचे उत्पादन वाढल्याने, शेतमालाचा भाव घसरल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती होती. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळणे गरजेचे होते. शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव मिळण्यासाठी कृषी बाजार सुधारणे गरजेचे होते. अतिरिक्त उत्पादनांवर प्रक्रिया करणे आणि त्यापासून विविध उत्पादने बनवणे यासाठी कारवाई करावी लागली. अतिरिक्त उत्पादनाची नासाडी न करता साठवण्यासाठी गोदामे आणि शीतगृहे बांधण्याची गरज होती. अशा प्रकारे, कृषी उत्पादनांच्या संकलन, प्रक्रिया आणि विक्रित वापरल्या जाणाऱ्या सुधारित तंत्रज्ञानाला 'सुगी नंतरचे तंत्रज्ञान' (Post-harvest Technology) म्हणतात. हरितक्रांतीला सुगी पूर्व आणि सुगी नंतरचे तंत्रज्ञान हे दोन्ही प्रेरक घटक आहेत.

नजीकच्या भविष्यात कृषी क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय म्हणून सरकार शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करत आहे. रासायनिक खतांऐवजी जैविक खतांना प्रोत्साहन दिले जात आहे. अशा प्रकारे सर्व प्रकारच्या पर्यावरणपूरक तंत्राचा वापर करून

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

**इंद्रधनुष्य क्रांती**

शेतकरी शेती सोबत पशुपालन, कुक्कटपालन, मासेमारी, रेशिम इ. शेतीसम्बधीत प्रक्रिया हाती घेत आहेत. शेती आणि शेतीसंबधीत प्रक्रियेच्या उत्पादनात झालेल्या मोठ्या वाढीला इंद्रधनुष्य क्रांती असे म्हणतात. इंद्रधनुष्य क्रांती ही विविध क्रांतीने सामावलेली आहे. ते कोणत्या प्रगतिला संबंधीत आहेत याची माहिती घ्या.

1) हरित क्रांती - आहारधान्यांचे उत्पादन
2) नीलि क्रांती - माशांचे उत्पादन
3) पिवळी क्रांती- तेलबियांचे उत्पादन
4) पांढरी क्रांती - दुधाचे उत्पादन
5) चांदीक्रांती - अंड्याचे (एससी) उत्पादन
6) सुवर्ण क्रांती - फळ/ फूलांचे उत्पादन
7) लालक्रांती - मांसाचे उत्पादन

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

शेतीचे उत्पादन दुप्पट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'दुसरी हरित क्रांती' किंवा 'एव्हर ग्रीन रिव्होल्यूशन' म्हणून ओळखली जात आहे. काही उत्साही शेतकरी सेंद्रिय शेती आणि शून्य भांडवली शेती यासारख्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करून लाभ घेत आहेत.

**नीती आयोग :**

नियोजन आयोगाच्या बद्दल 1 जानेवारी 2015 रोजी NITI आयोग (नॅशनल इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया) सुरू करण्यात आला.

नीती आयोग बॉटम-अप दृष्टिकोन वापरतो. त्याच्या उद्दिष्टांमध्ये 15 वर्षांचा मार्ग नकाशा (Road map), 7 वर्षांची दूरदर्शी योजना आणि कृती आराखडा यांचा समावेश आहे. त्याचे नेतृत्व देशाचे पंतप्रधान करतात. परंतु दैनंदिन कारभार उपाध्यक्षांकडून पाहिला जातो.

**उद्दिष्टे :**

1) राज्यांच्या सक्रिय सहभागासह राष्ट्रीय विकासाचे प्राधान्यक्रम, क्षेत्रे आणि धोरणांची सामायिक दृष्टी विकसित करणे.
2) तळागाळातील साधनसंपत्तीचा वापर करून आर्थिक धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेत भारतीय राज्य सरकारांच्या सहभागाद्वारे सहकारी संघराज्यवादाला प्रोत्साहन देतो.

**वैशिष्ट्ये :**

NITI आयोग अत्याधुनिक ज्ञान आणि कौशल्यांसह अत्याधुनिक संसाधन केंद्र म्हणून सरकारला अनियंत्रित समस्यांना सामोरे जाण्यास सक्षम बनवतो आणि संशोधन आणि नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी धोरणात्मक दृष्टी प्रदान करतो. त्याला अटल इनोव्हेशन मिशन आणि डेव्हलपमेंट मॉनिटरिंग आणि इव्हॅल्युएशन एजन्सी आणि दोन संलग्न कार्यालये, नॅशनल इंस्टिट्यूट फॉर लेबर इकॉनॉमिक्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट आणि एक स्वायत्त एजन्सी यांचे समर्थन आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

NITI आयोगाच्या उपक्रमांना चार मुख्य भागांमध्ये विभागले जाऊ शकते.

1. धोरण आणि कार्यक्रम फ्रेमवर्क
2. सहकारी संघ प्रणाली
3. निरिक्षण आणि मूल्यमापन
4. विचारवंत आणि ज्ञान आणि नाविन्यपूर्ण गटांचा मेळावा

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. 20 व्या शतकात, आर्थिक विकास सक्षम करण्यासाठी सरकारने ____________ अमलात आणले.
2. भारतातील पंचवार्षिक योजना तयार करणारी संस्था____________ .
3. 11 व्या पंचवार्षिक योजनेत ____________ ला प्राधान्य देण्यात आले.
4. हरित क्रांतीचे प्रणेते ____________ होते.
5. पर्यावरणास अनुकूल आणि व्यवस्था स्थिर करण्यासाठी सरकार शेतकऱ्यांना ____________ शेतीचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करते.
6. नीती आयोगाची स्थापना ____________ मध्ये झाली.

**II. पुढील प्रत्येक प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

7. 'आर्थिक नियोजन' म्हणजे काय?
8. भारतीय आर्थिक नियोजनाचे जनक कोण आहेत?
9. पंचवार्षिक योजना मंजूर करणारी संस्था कोणती?
10. 'हरितक्रांती' म्हणजे काय?
11. सुगी नंतरचे तंत्रज्ञान म्हणजे काय?
12. NITI आयोगाचे सध्याचे अध्यक्ष कोण आहेत?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**III. खालील प्रश्नांची 5-6 वाक्यात उत्तरे लिहा :**

13. कल्याणकारी राज्यांमध्ये सरकारची भूमिका कशी वाढली आहे?
14. पंचवार्षिक योजनांची उद्दिष्टे काय आहेत?
15. पंचवार्षिक योजनांच्या उपलब्धींची यादी करा.
16. हरितक्रांतीला कारणीभूत कोणते घटक आहेत?
17. कृषी क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्यांवर कोणते उपाय आहेत?
18. NITI आयोगाची उद्दिष्टे काय आहेत?

**IV. उपक्रम :**

1. तुमच्या परिसरात वापरल्या जाणाऱ्या विदेशी वस्तूंची यादी करा.
2. इंटरनेटच्या मदतीने, NITI आयोगाची ध्येय आणि उद्दिष्टांची यादी तयार करा
3. NITI आयोगाच्या कार्यांची माहिती गोळा करा आणि चर्चा करा.

**V. प्रकल्प :**

1. तुमच्या गावाजवळ/शहराजवळ प्रगतीशील शेतकऱ्यांच्या शेतीला भेट द्या, कृषीपद्धती आणि सुग्गिपूर्व आणि सुगी नंतरच्या तंत्रज्ञानाबद्दल जाणून घ्या आणि एक अहवाल तयार करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# व्यवहार अध्ययन

## प्रकरण - 16

# बँकेचे व्यवहार

K8H6Y6

**या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.**

- *बँकांचा अर्थ*
- *बँकेचे आणि पोस्टाचे आर्थिक व्यवहार*
- *बँकांची वैशिष्ट्ये*
- *बँकेत उघडता येणारी वेगवेगळी खाती*
- *बँकेत खाते उघडण्याच्या पद्धती*
- *बँक खात्याचे फायदे*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी बँकांची सुरुवात झाली. काळानुसार बँकांचे स्वरूप बदलत आहे. 'बँक' हा शब्द आर्थिक व्यवहारांशी संबंधित आहे. बँका या अशा आर्थिक संस्था आहेत की ज्या ग्राहकांनी गुंतवलेल्या ठेवींच्या स्वरूपातील पैसा वापरतात आणि त्यांच्या गरजेनुसार त्यांना तो परत करण्याची हमी देतात. बँका ग्राहकांना कर्जे देतात आणि त्यावर व्याज आकारतात. बँका निरनिराळ्या देशांच्या पैशांची (चलनांची) अदलाबदल (Exchange) करतात. एखाद्या देशाचा विकास हा त्या देशाच्या बँकींग पद्धतीवर अवलंबून असतो. बँका, शेती, कारखाने, व्यापारी आणि समाजातील इतर क्षेत्रांना आगावू कर्जे देतात. ही सर्व क्षेत्रे देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका निभावतात.

**बँक म्हणजे काय?**

'बँक' हा शब्द मूळ इटालियन शब्द 'Banco' किंवा फ्रेंच शब्द 'Banque' यावरून तयार करण्यात आलेला आहे. दोन्हीचा अर्थ 'बाक' (Banque) किंवा पैशांच्या देवाणघेवाणीचे टेबल (Money exchange table) असा आहे. जी कंपनी व्यवसायातील किंवा व्यापारातील आर्थिक व्यवहार सांभाळते, ती बँकींग कंपनी होय अशी बँकेची व्याख्या केली जाते. बँक जनतेकडून ठेवी स्वीकारते आणि गरजू लोकांना कर्ज देते. ज्यांना ठेवींच्या स्वरूपात बचत करावयाची असते त्यांच्या ठेवी बँक स्वीकारते व ज्यांना पैशांची

गरज असते त्यांना कर्जाच्या स्वरूपात पैसे देते. बँकेच्या देवाण-घेवाणीच्या या सेवांनाच 'बँक व्यवसाय' (banking) असे म्हणतात. बँका धनादेश (चेक), ड्राफ्टद्वारे (हुंडी) किंवा इतर स्वरूपात ठेवी परत करतात.

**बँकांची वैशिष्ट्ये :**

1. **पैशांशी संबंधित :** बँका या अशा आर्थिक संस्था आहेत की ज्या जनतेच्या पैशाशी संबंधित असतात.
2. **व्यक्ती/पेढी/कंपनी :** बँक ही एक व्यक्ती, पेढी किंवा कंपनी असू शकते. पैशांशी संबंधित असणारी संस्था म्हणजेच बँकींग कंपनी होय.
3. **ठेवींचा स्वीकार :** बँका जनतेकडून ठेवी स्वीकारतात आणि जेव्हा ग्राहक मागणी करतात तेव्हा किंवा ठराविक कालावधीनंतर त्या परत करतात. बँका या ठेवींना संरक्षण देतात. थोडक्यात सांगायचे तर बँका जनतेच्या ठेवींचे पर्यवेक्षक म्हणून काम पाहतात.
4. **कर्जे देणे :** औद्योगिक क्षेत्र, कृषी क्षेत्र, शिक्षणक्षेत्र, घरबांधणी आणि विविध इतर क्षेत्रातील अनेक गोष्टींसाठी बँका कर्जे देतात.
5. **पैसे देणे व काढणे :** बँका आपल्या ग्राहकांना चेक किंवा ड्राफ्टद्वारे ठेवी किंवा पैसे काढण्याची सुविधा देतात.
6. **एजंट अथवा एजंटची नेमणूक आणि उपयुक्त सेवा :** बँका आपल्या ग्राहकांना विविध बँकींग सुविधा उपलब्ध करून देतात. त्यामध्ये सामान्य उपयुक्त सेवा आणि एजन्सी सेवा यांचा समावेश होतो.
7. **फायदा आणि सेवाभावी संस्था :** बँका या फायदा मिळविणाऱ्या सेवाभावी संस्था असतात.
8. **कायम वाढणारी कार्ये :** बँका आपल्या कामामध्ये, सेवांमध्ये आणि कार्यक्षमतेमध्ये सतत फेरबदल आणि त्यांचा विस्तार करीत असतात.
9. **जोडणारा दुवा :** बँका ठेवीदार आणि कर्जदार यांना जोडणारा दुवा म्हणून काम करीत असतात. बँका ग्राहकांकडील शिल्लक असणारा पैसा गोळा करतात आणि गरजूंना कर्जरूपात देतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

10. **बँक व्यवसाय :** हे बँकेचे प्रमुख कार्य आहे. म्हणजेच ग्राहकांकडून ठेवी स्वीकारणे आणि कर्जे देणे. हा व्यवसाय इतर कोणत्याही व्यवसायाचा सहाय्यक किंवा मदतनीस नसतो. तो एक स्वतंत्र व्यवसाय असतो.

11. **नावाची ओळख :** बँकांना नेहमी स्वतःची अशी वेगळी ओळख असते. म्हणजेच प्रत्येक बँकेला एक विशिष्ट नाव असते. उदा : कॅनरा बँक, विजया बँक, युनियन बँक, कार्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ म्हैसूरु इ. यामुळे ग्राहकांना आपल्या पैशांचे व्यवहार नक्की कोणत्या बँकेशी आहेत हे समजण्यास मदत होते. आता सर्व स्टेट बँका 'स्टेट बँक ऑफ इंडिया'मध्ये विलीन झाल्या आहेत.

**बँकांचे कार्य :**

1. जनतेकडून आणि इतरांकडून ठेवी स्वीकारणे.
2. जनतेला आणि संस्थांना कर्ज देणे.
3. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठवणे. (Remittances)
4. चेक्स, ड्राफ्टस् आणि बिलाद्वारे पैसे वसूल करणे.
5. बिलांध्ये सूट देणे.
6. सेफ डिपॉझीट लॉकर्स भाड्याने देणे.
7. परदेशी चलनांची अदलाबदल (विनिमय) करण्याचे व्यवहार करणे.
8. अत्यंत मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवणे.
9. बँकेतील शिल्लक रक्कमेची आणि हमी देणारी पत्रे पाठविणे.
10. सरकारी व्यवहार करणे (केंद्र आणि राज्य)

**बँकेचे मालक आणि ग्राहक यांच्यातील नाते :**

बँकेचे मालक आणि ग्राहक यांचे नाते दोन प्रकारात विभागले जाते ते खालीलप्रमाणे -

1. **सामान्य नाते :**
   - प्राथमिक नाते (कर्जदार आणि ठेवीदार यांच्यातील नाते)
   - दुय्यम किंवा गौण नाते (विश्वस्त आणि लाभार्थी यांच्यातील नाते)
   - दलाल (Agent) आणि प्रमुखाचे नाते

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

2. **विशेष नाते :**

- चेक देण्या - घेण्याबद्दलची कर्तव्ये किंवा बंधने
- ग्राहक खात्यांची गुप्तता राखण्याबद्दलची कर्तव्ये किंवा बंधने.

**उपक्रम :**
*तुमच्या जवळच्या बँकेला भेट देवून उच्च शिक्षणाच्या कर्जाबद्दल व्यवस्थापकांकडून माहिती मिळवा.*

**बँकांकडून दिल्या जाणाऱ्या सेवा:**

1. क्रेडीट व डेबीट कार्डस् (उधारीने विकत घेण्यासाठीचे कार्ड)
2. वैयक्तिक कर्जे
3. गृह आणि वाहन कर्जे
4. म्युच्युअल फंडस् (Mutual Funds) (भागीदारीत परस्पर विनिमयासाठी गोळा केलेला निधी)
5. व्यवसाय कर्जे
6. सेफ डिपॉझिट लॉकर्स
7. विश्वस्त सेवा
8. सह्यांची खात्री किंवा हमी
9. ई बँकींग (E-Banking services)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## बँकिंग व्यवहार

**बँक आणि टपाल कचेऱ्या :**

बँका व टपाल कचेऱ्या पैशासंदर्भातील किंवा खात्यातील पैशांच्या देवाण घेवाणीच्या बाबतीतले कोणतेही कार्य म्हणजेच बँकेचे व्यवहार. बँका म्हणजे पैशांशी संबंधित असणाऱ्या संस्था होत. बँका ग्राहकांचा पैसा ठेवींच्या स्वरूपात ठेवतात आणि हा गोळा केलेला पैसा गरजू ग्राहकांना कर्ज म्हणून देतात. अशा प्रकारच्या कर्जानाच बँक कर्जे (Bank loans) म्हणतात. बँका कर्जे देतात आणि त्यावर व्याज आकारतात. व्याजाच्या स्वरूपात गोळा केलेल्या या पैशातीलच काही भाग ठेवीदारांच्या ठेवीवर व्याज म्हणून देतात. या व्याजामुळे ठेवीदारांना उत्पन्न मिळते. ग्राहकांचा हा पैसा बँका राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यवसायामध्ये गुंतवितात आणि त्यांचा निधी वाढवितात.

भारतातील सर्व बँकांचे व्यवहार हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) नियंत्रणाखाली असतात. रिझर्व्ह बँक ही 'बँकांची जननी' किंवा 'बँकाची बँक' किंवा 'मध्यवर्ती बँक' (Central Bank of India) म्हणून ओळखली जाते. रिझर्व्ह बँक पैशांविषयीची धोरणे ठरविते आणि इतर सर्व बँका त्यांचे अनुकरण करतात. आज आपल्या देशात पुढीलप्रमाणे बँकांचे समूह कार्यरत आहेत. 12 राष्ट्रीयीकृत बँका, 21 खाजगी बँका आणि 46 विदेशी बँका. बँकांच्या या जाळ्यामध्ये 1,62,904 शाखांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त ग्रामीण बँका, प्रादेशिक बँका, सरकारी आणि खाजगी बँकासुद्धा कार्यरत आहेत.

बँकींग क्षेत्रातील एक प्रगतीचे पाऊल म्हणजे नुकताच पोस्ट ऑफिसचा बँक व्यवहारात झालेला समावेश होय.

> **उपक्रम :**
> *पोस्टाला भेट देवून पोस्टल बँकिंग पद्धतीच्या कार्याची माहिती मिळवा.*

भारतीय पोस्ट खाते हे 'पोस्टल बँक ऑफ इंडिया' या नावाची बँक सुरू करण्याचा विचार करीत आहे. त्यापैकी 90% पोस्ट कार्यालये ही निमशहरी व ग्रामीण भागात आहेत. आतापर्यंत 1.55 लाख शाखांचा विस्तार झाला आहे. या खात्याद्वारे विविध आर्थिक सेवा दिल्या जात आहेत. त्या म्हणजे-पोस्ट ऑफिस बचत बँक, राष्ट्रीय बचत पत्रके (NSC), किसान विकास पत्रे, मासिक रिकरिंग डिपॉझिटस् (RD), पोस्टल लाईफ इन्श्युरन्स (PLI), निवृत्ती वेतन, पैसे पाठविणे (Money transfer) इ. पोस्ट खात्याने बँक व्यवहारासाठी 1000 कोटी रुपयांचे भांडवल गुंतविलेले आहे. पोस्ट खात्याला हे उत्पन्न पूरक व सहाय्यकारी ठरेल.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**बँकांचे प्रकार :** बँकांचे विविध प्रकार आहेत. प्रत्येक प्रकारची बँक ही वेगवेगळ्या प्रकारच्या कामामध्ये निपुण असते.

**बँकांचे महत्त्वाचे प्रकार :**

1. सेंट्रल बँक किंवा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
2. व्यापारविषयक बँका (Commercial Banks)
3. औद्योगिक विकास बँका (Industrial Development Banks)

4. भूविकास बँका (Land Development Banks)
5. स्थानिक बँका (Money Lenders or Sahukars) पतपेढ्या
6. सहकारी बँका (Co-operative Banks)

(या बँकाबद्दलची अधिक माहिती तुम्ही मागील वर्गात अर्थशास्त्र विभागात शिकला आहातच)

**बँक खात्यांचे प्रकार (Typers of Bank Accounts) :**

सर्वसाधारणपणे बँकेमध्ये चार प्रकारची खाती उघडली जावू शकतात. ती पुढीलप्रमाणे-

1. बचत खाते (Savings Bank Account)
2. चालू खाते (Current Account)
3. आवर्ती ठेव खाते (Recurring Deposit Account)
4. मुदत ठेव खाते (Term Deposit Account)

> खालील बँक खात्यावर बँकेकडून दिल्या जाणाऱ्या व्याजदराविषयी माहिती मिळवा
> 1) बचत खाते
> 2) चालू खाते
> 3) आवर्त ठेव खाते

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**1. बचत खाते (Savings Bank Account) :**

सर्वसाधारणपणे पगारदार व्यक्तीकरता किंवा नियमित उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्तींकरता बँका हे खाते उघडतात. ही सुविधा विद्यार्थ्यांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि निवृत्तीवेतन धारकांनाही दिली जाते. पैशांची बचत करून पैसे साठविणाऱ्या लोकांना प्रोत्साहन देण्याकरिता ही खाती उघडली जातात. ठेवींच्या संख्येवर आणि रक्कमेवर कोणतेही बंधन नसते. हे पैसे चेक द्वारे अथवा संबंधित बँकेकडे उपलब्ध असलेल्या स्लीपद्वारे (Withdrawl Slip) काढले जावू शकतात.

> वार्षिक शेकडा आठ टक्के दराने 50000 च्या मुदत ठेवीवर मासिक किती व्याज मिळेल ते शोधून काढा.

**2. चालू खाते (Current Account) :**

बँकांशी नियमितपणे व मोठया प्रमाणात व्यवहार करणारे व्यावसायिक किंवा उद्योजक हे खाते उघ्डतात. यामध्ये ठेवी, पैसे काढणे आणि परस्पर (Contra) व्यवहारांचा समावेश होतो. या खात्यामध्ये दिवसातून किती ही रक्कम कितीही वेळा ठेवली किंवा काढली जावू शकते. साधारणपणे बँका या ठेवीवर काहीही व्याज देत नाहीत. परंतु बँकेचा सेवाकर (Service Charge) आकारतात.

### 3. आवर्ती ठेव खाते (Recurring Deposit Account) :

सर्वसाधारणपणे हे खाते भविष्यातील तरतूद करण्याच्या उद्देशाने उघडले जाते. भविष्यातील गरजांसाठी या ठेवी मासिक हप्ता पद्धतीने नियमितपणे ठेवल्या जातात. (उदा. मुलांच्या लग्नखर्चासाठी, शिक्षणासाठी, जमीन, वाहने इ. महागड्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी. मुदत संपल्यानंतर संपूर्ण रक्कम ठेवीदाराला व्याजासकट परत केली जाते.

### 4. मुदत ठेव खाते (Term Deposit Account) :

विशिष्ट रक्कम विशिष्ट कालावधीकरीता ठेवण्यासाठी हे खाते उघडले जाते. या ठेवीचा कालावधी एक महिना, सहा महिने, एक वर्ष, पाच वर्षे, किंवा दहा वर्षे इ. असू शकतो. या ठेवीची रक्कम मुदतपूर्व काढली जावू शकत नाही मुदतीनुसार या खात्यावरील ठेवींचा व्याजदर जास्त असतो.

### बँक खाते उघडण्याची पद्धत (Opening of Bank Account) :

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

आज बँका महत्त्वाच्या आर्थिक संस्था म्हणून उदयास आल्या आहेत. आपले आर्थिक व्यवहार व्यवस्थित व सुरक्षितपणे करण्यासाठी बँका आपले योगदान देतात. बँकेच्या व्यवसायिक सेवांचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. बँकेत खाते उघडणे हे काही अवघड काम नाही. बँकेत खाते उघडण्यासाठी सात सोप्या पायऱ्या अवलंबल्या जातात. त्या खालील प्रमाणे.

1. **तुम्हाला कोणत्या बँकेत कोणते खाते उघडायचे आहे ते ठरवणे :** बँकेमध्ये विविध प्रकारची खाती असतात - बचत बँक खाते, चालू खाते, आवर्ती ठेव खाते, मुदतठेव खाते इ. यापैकी तुम्हाला कोणते खाते उघडायचे आहे ते ठरवा.

> **उपक्रम :**
> *जवळच्या बँकेला भेट देवून, तेथील कामाचे स्वरूप समजून घ्या.*

2. **तुमच्या पसंतीची बँक निवडल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांना भेटणे :** बँक आणि कोणत्या प्रकारचे खाते काढायचे हे निश्चित झाल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांना जावून भेटणे आणि आपण कोणते खाते उघडणार आहोत

> **तुम्हाला माहिती असू द्या :**
> *जॉईंट खाते - दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तींच्या नावाने खाते उघडून व्यवहार करण्याच्या खात्याला 'जॉईंट खाते' म्हणतात.*

याची माहिती देणे. बँकेचे संबंधित अधिकारी तुम्हाला आवश्यक फॉर्मस आणि त्यासंदर्भातील माहिती देतील.

3. **बँक खाते काढण्याचा फॉर्म भरणे :** या फॉर्ममधील सर्व माहिती - तुमचे नाव, पत्ता, व्यवसाय इतर माहिती दोन किंवा तीन नमुना स्वाक्षऱ्या (Signature) व्यवस्थितपणे कराव्यात नंतर ही सही बदलता येत नाही.

   जर जॉईंट खाते (दोन किंवा दोनापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावाने) उघडायचे असल्यास फॉर्म सर्वांच्या सहीने एकत्रितपणे भरला जातो. पण नमुना स्वाक्षऱ्या मात्र वेगवेगळ्या स्वाक्षरी कार्डवर केल्या जातात. ग्राहकाची पटकन ओळख पटावी म्हणून आजकाल बँका पासपोर्ट आकाराचे फोटो घेतात. ही सर्व माहिती व्यवस्थित भरून तो फॉर्म संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला जातो. सध्या स्वतःच्या सहीनिशी आधारकार्डची झेरॉक्स प्रत द्यावी लागते.

4. **बँक खाते उघडण्यासाठी संदर्भ देणे :** नवीन खातेदाराची ओळख पटविण्याकरिता त्याच बँकेतील एखाद्या खातेदाराचा संदर्भ द्यावा लागतो. बँकेत खाते असलेला खातेदार नवीन खातेदाराची ओळख पटवून देण्यासाठी संबंधित रकान्यामध्ये स्वतःची नमुना स्वाक्षरी करतो. बँकेच्या सुरक्षेसाठी हा ओळखीचा संदर्भ देणे आवश्यक असते.

5. **पूर्ण भरलेला फॉर्म सादर करणे :** सर्व माहिती भरून पूर्ण झालेला फॉर्म आणखी काही कागदपत्रांसह म्हणजेच रहिवासी दाखला, पॅनकार्ड, आधारकार्ड, फोटो इ. संबंधित अधिकाऱ्याकडे सुपूर्द करणे.

6. **सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची सत्यता अधिकाऱ्यांद्वारे पडताळणे :** आपण सादर केलेला फॉर्म बरोबर भरला आहे की नाही, सर्व कागदपत्रांची पूर्तता झाली आहे की नाही, तसेच त्या कागदपत्रांची सत्यता इ. गोष्टी अधिकारी पडताळून पाहतो.

7. **प्रारंभीची ठेव ठेवणे :** आपला फॉर्म जर वैध ठरला तर आपल्याला काही ठरावीक रक्कम ठेव म्हणून बँकेत भरावी लागते. त्यानंतर बँक आपल्याला पासबुक, चेकबुक

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आणि बँकेच्या काही स्लिप्स (Slips) सेव्हिंग्ज किंवा बचत बँक खात्याच्या संदर्भात देते. मुदत ठेव पावती बँक आपल्याला देते चालू खात्याच्या संदर्भात स्लीपबुक (Pay-in-slip book) आणि चेकबुक दिली जातात. आवर्ती ठेव खात्यासाठी जमाखात्याचे पासबुक आणि स्लीपबुक दिले जाते.

**बँक खाते उघडण्याचे फायदे :**

- बँक खाते आपल्याला आपले पैसे सुरक्षित ठेवण्याची सुविधा देते.
- बँक खाते दुसऱ्यांना पैसे देण्यासाठी उपयोगी आहे.
- बँक खाते पैसा गोळा करण्यासाठी (साठविण्यासाठी) उपयोगी आहे.
- बँक खातेदारांना बँकेकडून कर्ज मिळणे सुलभ होते.
- बँक खात्यामुळे आर्थिक व्यवहार सुरळीत होण्यास मदत होते.
- बँक खातेदारांना सेफ डिपॉझीट लॉकर्सची सुविधा मिळते.

**बँकेची कार्यपद्धती :**

खालील प्रमुख बाबी बँकेकडून पुरविल्या जातात.

- बचत ठेवी वाढविण्यासाठी बँक ठेव सुविधा पुरविते.
- ठेवी जमा करणे आणि त्या कर्जाने देण्यासाठी प्रयत्न करणे.
- ठेवींच्या संख्येवर कोणतेही बंधन नाही. 10 रू पेक्षा कमी ठेव न स्वीकारणे.
- फक्त खातेदाराच्या नावावरील चेक, ड्राफ्टस् आणि इतर गोष्टींचा स्वीकार करणे आणि संबंधित खात्यावर जमा करणे.
- चेकद्वारे किंवा पैसे काढण्याच्या फॉर्मद्वारेच रक्कम काढली जाणे. जर पैसे स्लीपद्वारे (withdraw) काढावयाचे असतील तर संबंधित खातेदारच ते पैसे काढू शकतो. पैसे काढतेवेळी पासबुक सादर करावे लागते. आजकाल ए.टी.एम. (A.T.M -Automated Teller Machine) डेबिट व क्रेडिट कार्डद्वारेही पैसे काढले जावू शकतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

- नियमित देणी देण्यासाठी म्हणजेच विमा हप्ता, आयकर, वीज, पाणी व फोन बिले इ. भरण्यासाठीची आवश्यक माहिती खातेदार बँकेला देवू शकतो व ही देयके नियमितपणे देण्याची विनंती बँकेला करू शकतो.
- खातेदाराच्या खात्यातील किमान शिल्लक रकमेवर आजच्या दराने प्रत्येक महिन्याचे व्याज दिले जाते व ते त्याच्या खात्यावर मासिक, तिमाही, सहामाही किंवा वार्षिक पद्धतीने जमा केले जाते. सर्वसाधारणपणे एप्रिल, ऑक्टोबर किंवा फेब्रुवारी आणि जुलैमध्ये हे व्याज जमा केले जाते.
- खातेदाराच्या विनंतीवरून बँकेच्या कोणत्याही शाखेत खाते हस्तांतरित (transfer) केले जाते. खातेदाराला आपले खाते बंद करायचे असेल. तर योग्य कारण नमूद करून बँकेला विनंती करावी लागते. खाते बंद करताना पासबुक व न वापरलेले चेक्स आणि ए.टी.एम. (A.T.M -Automated Teller Machine), क्रेडीट, डेबिट कार्ड इ. गोष्टी बँकेकडे परत कराव्या लागतात. ए.टी.एम. कार्डचे दोन तुकडे करून ते तोडून टाकले जाते).

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. 'बँक' हा शब्द ___________ या फ्रेंच शब्दावरुन घेतला आहे.
2. ___________ ही बँकांची बँक आहे.
3. राष्ट्रीयीकृत बँकेचे उदाहरण ___________ हे आहे.
4. राष्ट्रीय बचत पत्रके ___________ कडून वितरित केली जातात.
5. एकाच दिवशी बँकेशी कितीही वेळा कितीही व्यवहार ___________ या प्रकारच्या खात्याद्वारे केले जातात.
6. ___________ या खात्यात ठराविक मुदतीसाठी ठेवी ठेवल्या जावू शकतात.

**II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

7. बँक म्हणजे काय?
8. बँक व्यवहारांशी संबंधित असलेली वैशिष्ट्ये लिहा.

9. बँकेची कार्ये कोणती?

10. बँक व बँकेचे ग्राहक यांच्यातील नात्यांची माहिती लिहा.

11. 'बचत बँक खातेदारांची संख्या वाढत आहे'. कारणे द्या.

12. बँक खाते उघडण्याचे फायदे कोणते?

**III. उपक्रम :**

1. तुम्हाला माहित असलेल्या बँकांच्या नावाची यादी करा.

2. बँकेला भेट द्या आणि मुदत ठेवींवर मुदतीनंतर मिळणाऱ्या व्याजाबद्दलची माहिती गोळा करा.

**IV. प्रकल्प (Project Work) :**

1. बँकेला आणि बँकांच्या अधिकाऱ्यांना भेट देवून बँक खाते कसे काढायचे याबाबतचा अहवाल तयार करा व बँक खाते उघडा.

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

***